जानेवारी २०२३ ₹५०/-

# महानगरी वार्ताहर

संपादक : सतीश सिन्नरकर



# ए मैरे वतन के लोगों...

## देशभक्ती विशेषांक

महानगरी वार्ताहर आता ईकॉपी सुद्धा

Visit our website : www.mahanagarivartahar.com |

पितांबरी
अभिनव उत्पादने

# चौफेर पसरू दे तेज शौर्याचे, प्रकाश त्यागाचा !







**पितांबरी शायनिंग पावडर**
लखख पूजासामग्रीसाठी

**दीपशक्ती दिव्याचे तेल**
शांत प्रकाशासाठी

तांबा, पितळ, ॲल्युमिनियम, लोखंड, चांदी, स्टील
१५, ३०, ५०, १००, ५०० ग्रॅ. आणि १ किलो मध्ये उपलब्ध

१५०, ४५०, ९०० मिली मध्ये उपलब्ध

**Pitambari Products Pvt. Ltd.**
Mah: 8451907123, 7888002366, 9921001222.CRM No.:022-67035564. Toll Free: 18001031299.
CIN: U74110MH1989PTC051314. Now Shop Online On: www.pitambari.com/shop

ADITYA COLLEGE OF ARCHITECTURE
MUMBAI - INDIA
ISO 9001-2015 CERTIFIED

ADITYA COLLEGE OF DESIGN STUDIES

आमच्याकडे उपलब्ध असलेले अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना सध्या सर्वात जास्त मागणी असलेल्या क्षेत्रात अर्थात फॅशन डिझाईनिंग आणि इंटिरियर डिझाईन च्या क्षेत्रात अग्रेसर राहण्यास मदत करतील ज्यामध्ये विद्यार्थ्यांना सध्याच्या उद्योग विश्वात टिकून राहण्यासाठी त्यांच्यातील कल्पकता आणि व्यवस्थापकीय कौशल्यांचा वापर करावा लागेल. रंग, आकार, नक्षी आणि व्यवसायातील शिष्टाचार या चौसूत्राच्या जोरावर आजच्या आव्हानात्मक जगात ते एक यशस्वी कारकीर्द घडवू शकतील.

# वर्ष २०२३-२४ साठी प्रवेश सुरु

आताच नोंदणी करा.

**मर्यादित जागा उपलब्ध.**

## आमच्याकडील पदवी अभ्यासक्रम

१) **बॅचलर ऑफ व्होकेशनल स्टडीज (इंटिरियर डिझाईन)**
**३ वर्षांचा अभ्यासक्रम, मुंबई विद्यापीठ.**

* २) **बॅचलर ऑफ डिझाईनिंग (फॅशन डिझाईनिंग)**
**४ वर्षांचा पूर्णवेळ अभ्यासक्रम, मुंबई विद्यापीठ.**

* ३) **बॅचलर ऑफ इंटिरियर डिझाईन**
**४ वर्षांचा पूर्णवेळ अभ्यासक्रम, मुंबई विद्यापीठ.**

* मंजुरी येणे बाकी

**मोफत इंटिरियर डिझाईन आणि फॅशन डिझाईनची कार्यशाळा आणि समुपदेशन सत्र उपलब्ध**



**येथे नोंदणी करा...**

पत्ता : आदित्य एज्युकेशनल कॅम्पस, आर. एम. भट्टड मार्ग, राम नगर, बोरिवली (पश्चिम), मुंबई 400092
अधिक माहितीसाठी संपर्क करा 022 35206111 या दूरध्वनी क्रमांकावर. किंवा
www.adityacampus.org या संकेतस्थळाला भेट द्या.

# अंतरंग...


- संपादकीय - पराक्रमाची गाथा - सतीश सिन्नरकर ५
- बाळासाहेबांची कलासक्ती आणि तेव्हढीच अंतर्बाह्य राष्ट्रीयता - सुभाष देसाई ६
- सुभाष बाबू यांची जयंती.... पराक्रम दिवस - अरविंद श्रीधर जोशी १०
- राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब ११
- विवेकानंद केंद्र : एक चळवळ १४
- नव भारताचे मंत्रगुरू स्वामी विवेकानंद - सौ. कांचन जोशी १९
- देशभक्ती - द.तु. नन्दापुरे (गुरुजी) २२
- पुस्तक परिक्षण कवींसाठी मार्गदर्शक गाईड २६
- पाकिस्तानी लष्कराची भारत विरोधी भूमिका यापुढेही कायम राहील, देवशर यांची भूमिका २७
- 'भारत @१००'साठी सप्तसूत्री ३०
- श्रेष्ठ भारत! ३२
- जगण्याची कारणं (purpose) हरवत चालली आहेत का? ३२
- 'ट्रायल बाय फायर' - राजीव जतकर ३५
- रोगांशी लढण्यासाठीची नवी उपचार पद्धती - डॉ. अशोक कुमार ३८
- चित्रपट अभ्यासक सुधीर नांदगावकर यांचे निधन - सतीश सिन्नरकर ४३
- वर्ष २०२२ मधील सर्वात मोठे ६ सुपरहिट चित्रपट. ४४
- सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील भारताचा भविष्यकाळ कसा असेल? ४७
- के. अण्णामलाई : मॅन ऑफ दि ईयर! - धनंजय कुरणे ५०



• **सतीश सिन्नरकर**, मुख्य संपादक
• **आशिष राजेशिर्के**, संयोजक

अंतर्गत सजावट
यतिन पावशे

जाहिरात विभाग
रिमा मुळ्ये | सुभाष जाधव


**महानगरी वार्ताहर आता ईकॉपी सुद्धा**

**Visit our website : www.mahanagarivartahar.com**

हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक शहाजहाँ शेख यांनी अराफत पब्लिकेशनसाठी युनिटी आर्ट ऑफसेट, 302, वडाळा उद्योग भवन, वडाळा, मुंबई-31 येथे छापून तेथेच प्रसिद्ध केले.
**RNI No.** 54861/93 ***प्रधान कार्यालय व पत्रव्यवहाराचा पत्ता :*** 311, ३रा मजला, श्रीकृष्ण कमर्शियल सेन्टर, उद्योग नगर, स्वामी विवेकानंद रोड, गोरेगाव (पश्चिम), मुंबई - 400 104. मोबाईल : 9821039722 ● Email : mahanagarivartahar@gmail.com ***संचालक संपादक*** - सतीश सिन्नरकर

## संपादकीय



# पराक्रमाची गाथा !

सतीश सिन्नरकर

प्रत्येक वर्षाचा जानेवारी महिना आपणा सर्वांसाठी प्रेरणा देणारा असतो. वास्तविक 'पराक्रम' हा विषय वर्षाच्या प्रत्येक दिवशी साजरा करता येईल एवढा समृद्ध आपला इतिहास आहे. जसजसा खरा इतिहास समोर येत आहे, तसतसा नवीन व्यक्ती व त्यांचे पराक्रम वाचायला, ऐकायला मिळत आहेत. देशाच्या बदलत्या जागृततेमुळे थोर, पराक्रमी पण विस्मृतीत गेलेल्या महापुरुषांची माहिती उपलब्ध होत आहे. त्यामुळे आत्मगौरवाची भावना वृद्धिंगत होत आहे, ही मोठी जमेची बाजू आहे.

स्व. सुभाषचंद्र यांची जयंती आता 'पराक्रम दिन' म्हणून साजरी होते. शिवाय याच महिन्यात शिवरायांची जननी 'जिजाऊ', हिंदुहृदयसम्राट कै. बाळासाहेब ठाकरे, संन्यस्त योगी स्वामी विवेकानंद यांच्या पराक्रमाचे स्मरण करून त्यांना आपण वंदन करतो.

स्व. बाळासाहेब यांचा 'ठाकरी' बाणा, त्यांच्या गर्जना, रोखठोक विचार ही जशी त्यांच्या व्यक्तित्वाची एक जाज्वल्य बाजू आहे. तशीच कलेची आसक्ती, कलाकार, खेळाडू यांच्याबद्दल प्रचंड आपुलकी, ही त्यांच्या व्यक्तित्वाची तितकीच प्रेरक दुसरी बाजू आहे. महाराष्ट्रातच नव्हे तर पूर्ण देशात 'हिन्दुत्वा'ची बाजू कोणी सुस्पष्टपणे मांडली असेल तर ते फक्त आणि फक्त बाळासाहेब ठाकरे हेच होते. समस्त हिन्दु समाजावर हे त्यांचे न फिटणारे उपकार आहेत. महाराष्ट्रात मात्र 'मराठी एकजूट' याबाबत ते अत्यंत आग्रही होते. जाती आणि वाद गाडून मराठी माणूस एकवटला तर तो संपूर्ण जग गाजवेल असे ते सांगायचे. बाळासाहेबांचे आयुष्य म्हणजे एक पराक्रमाची गाथाच बनले आहे.

याचप्रमाणे नेताजी सुभाष यांचे जीवन म्हणजे देश स्वतंत्र करण्यासाठी जीवावर उदार होऊन सशस्त्र क्रांतीची अमर कहाणी आहे. 'तुम मुझे खून दो, मैं तुम्हें आजादी दूंगा' हे त्यांचे वचन इतिहासात अमर झालेले आहे. दुर्दैवाने त्यांच्यावर खूप अन्याय झाला. स्वतंत्र भारताच्या इतिहासात मानाचे पान मिळविण्यासाठी त्यांना अनेक वर्षे अज्ञातवासात ठेवण्यात आले. पण आता मात्र त्यांची स्मारके व त्यांच्या जन्मदिवशी 'पराक्रम दिन' साजरा करण्याची प्रथा निर्माण करून विद्यमान सरकारने एक मोठी उणीव भरून काढली आहे.

या वर्षी अंदमान निकोबार भागातील अनेक बेटांना परमवीरचक्र, महावीरचक्र मिळालेल्या शूर जवानांची नावे देऊन देशभक्तीचा नवा अध्याय लिहिण्यात आला आहे.

आध्यात्मिक व सांस्कृतिक क्षेत्रात पराक्रम गाजविणाऱ्या स्वामी विवेकानंदांची जयंती याच महिन्यात येते. युवा पिढीचे आदर्श असलेल्या स्वामींचे जीवन म्हणजे संपूर्ण हिन्दु समाजाला ग्लानीच्या खाईतून बाहेर काढण्याचा पराक्रमी अध्याय आहे. सनातन धर्माची ध्वजा विश्वात फडकवणाऱ्या स्वामींनी आपल्या गरीब, अज्ञानी व दुर्बल बांधवांसाठी सेवेचा आदर्श घालून दिला. आधी पोटोबा, मग विठोबा या धर्तीवर त्यांनी रामकृष्ण मिशनची मुहूर्तमेढ रोवली.

अशा दिव्य पुरुषांची चरित्रे जेव्हा डोळ्यांसमोर येतात तेव्हा एवढेच म्हणावेसे वाटते की 'तुझे तेज अंगी शतांशे जरीही, उजाळून टाकू दिशा दाहीदाही'.

'महानगरी वार्ताहर'च्या या अंकाला 'देशभक्ती' असे नाव दिले आहे. या देशावर प्रेम, भक्ती म्हणजे काय? या देशाचे जे बाह्य रूप आहे, नद्या, पर्वत, तीर्थस्थळे यांच्यावरील प्रेम ? की या देशाच्या कानाकोपऱ्यात राहणाऱ्या कोट्यवधी लोकांच्या हृदयातील सुप्त अशी एकत्वाची भावना म्हणजे प्रेम? काटा टोचला तर संपूर्ण शरीराला जाणवणारी वेदना म्हणजे जिवंत शरीराचे लक्षण मानले जाते. तसा जिवंत समाज असेल आणि आपण त्याचे अंगभूत घटक आहोत ही स्पष्ट जाणीव ज्याला आहे तो खरा देशप्रेमी! कर्तव्याची भावना हेच देशप्रेम असते. यादृष्टीने आपला देश हळूहळू प्रगती करीत असला तरी अद्याप फार मोठी मजल आपणास मारायची आहे, हे रोजच्या जीवनात पदोपदी जाणवते. म्हणूनच जागृत व तत्पर नागरिक हीच खरी देशाची शक्ती असे म्हटले पाहिजे.

या अंकात मान्यवरांचे लेख आहेत. वाचकास अंतर्मुख करणारे त्यांचे विचार हे आत्मसात करण्यासारखे आहेत.

सर्वांना भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !



# बाळासाहेबांची कलासक्ती

## आणि तेव्हढीच

# अंतर्बाह्य राष्ट्रीयता


शिवसेनेचे ज्येष्ठ नेते, महाराष्ट्राचे माजी उद्योगमंत्री आणि अनेक सामाजिक उपक्रमांचे प्रणेते **श्री. सुभाष देसाई** यांना संपूर्ण महाराष्ट्र ओळखतो. 'महानगरी वार्ताहर'च्या या अंकासाठी त्यांनी स्व. बाळासाहेबांच्या हृद्य आठवणी सांगणारा लेख लिहिला आहे.





- सुभाष देसाई

माननीय बाळासाहेबांना एका गोष्टीचा अभिमान होता की, मी एक व्यंगचित्रकार म्हणून जन्माला आलो आणि माझी जगाला एक व्यंगचित्रकार म्हणून ओळख झाली. त्यांची व्यंगचित्रे जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचली होती. त्या काळात 'असाही सिंबून' नावाच्या जपानमधील पहिल्या क्रमांकाच्या दैनिकामध्ये त्यांची व्यंगचित्रे प्रसिद्ध झाली होती. विन्स्टन चर्चिल यांचे चित्रमय चरित्र प्रसिद्ध करीत असताना त्यावेळी बाळासाहेबांनी चर्चिल यांच्यावर काढलेली व्यंगचित्रे मागवून घेऊन त्या व्यंगचित्रांचा विन्स्टन चर्चिल यांच्या चित्रमय चरित्रामध्ये समावेश करण्यात आला होता. अशा प्रकारे भारतातून फक्त बाळासाहेबांना त्या काळात मान देण्यात आला होता.



पूर्वीच्या काळात बाळासाहेब 'फ्री प्रेस' मध्ये व्यंगचित्रकार म्हणून नोकरी करीत होते. त्यावेळी देशात 'शंकर्स विकली' नावाचे व्यंगचित्र साप्ताहिक होते. शंकर हे जगप्रसिद्ध व्यंगचित्रकार होते. ते एकदा बाळासाहेबांना भेटण्यासाठी आले होते. त्यावेळी त्यांनी असे सांगितले की, मी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या समवेत रशियाच्या दौऱ्यावर जात आहे. माझ्या पश्चात माझे सहकारी साप्ताहिक प्रसिद्ध करतील. परंतु त्या साप्ताहिकाच्या मुखपृष्ठावर आपण काढलेली व्यंगचित्रे द्यावीत. त्यांनी बाळासाहेबांना असा आग्रह केला आणि मोठ्या बहुमानाने बाळासाहेबांनी काढलेली व्यंगचित्रे 'शंकर्स विकली' या साप्ताहिकाच्या मुखपृष्ठावर प्रसिद्ध झाली.

बाळासाहेबांना आपल्या पेशाचा व कलेचा अतिशय अभिमान होता. बाळासाहेबांच्या निवडक व्यंगचित्रांचे 'फटकारे' नावाचे पुस्तक श्री. उद्धवजी ठाकरे यांनी प्रसिद्ध केले. त्या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर 'फटकारे' हे नाव व त्याखाली 'बाळ केशव ठाकरे' असा मजकूर छापण्यात आला होता. ते पुस्तक पाहिल्यानंतर बाळासाहेबांनी असे सांगितले की, ''या पुस्तकावर माझी व्यंगचित्रकार म्हणून ओळख असली पाहिजे म्हणून व्यंगचित्रकार बाळ केशव ठाकरे असे लिहा.'' त्यांचा आपल्या कलेवर विश्वास आणि प्रेम असल्याचेच त्यांच्या या कृतीतून दिसून येते.

बाळासाहेबांना संगीत फारच प्रिय होते. आणि कलाकारांविषयी ममत्व व आदर होता. माझे मित्रवर्य सतीश सिन्नरकर यांनी भारतरत्न बिस्मिल्लाखान यांचा नेहरु सेंटरमध्ये शहनाई वादनाचा कार्यक्रम आयोजित केला. सिन्नरकरांनी उद्धवजींना व मला आग्रहाने बोलावले. त्या बहारदार कार्यक्रमाने आम्ही सर्व खुष झालो.



उद्धवजींनी सिन्नरकरांना विचारले, बाळासाहेबांसाठी बिस्मिल्लाजी येऊन एक मैफिल करतील का? बिस्मिल्लासाहेबांना विचारताच ते हसत हसत हो म्हणाले. ते सदैव स्मित हास्य करतानाच दिसत. मग आम्ही एमआयजी क्लब, वांद्रे येथे विशेष निमंत्रितांसह बाळासाहेबांसाठी खास शो ठेवला. साहेबांनी अमिताभ बच्चन, श्रीकांतजींनाही स्वत: फोन करून बोलावले. मैफिल बहारदार झाली हे वेगळे सांगायला नकोच. त्यांनी स्वत:च बिस्मिल्लाजी यांना उद्या मातोश्रीवर या असा आग्रह केला. मी आणि सिन्नरकर बिस्मिल्लाजींना घेऊन मातोश्रीवर हजर झालो.

खोलीच्या दारात ते दिसताच साहेब उठून समोर गेले व हात धरून बिस्मिल्लाजींना आत आणले व आसनावर बसवले. मुक्तकंठाने कालच्या कार्यक्रमाची प्रशंसा केली. चहापान झाल्यावर एक जाडजूड पाकिट त्यांना दिले व ही माझी प्रेमाची भेट ठेवा असे म्हणाले. बरीच मोठी रक्कम असावी. एका महान कलाकाराने दुसऱ्या महान कलाकाराला केलेले ते अभिवादन होते. तेवढ्यावरच हा हृद्य सोहळा संपला नाही.



बिस्मिल्लाजी निघाले तेव्हा साहेब मोटारीपर्यंत त्यांच्या सोबत रस्त्यावर गेले. बिस्मिल्लाजींची मोटार हलली. आम्ही सर्व पुन्हा साहेबांच्या मागोमाग मातोश्रीत आलो. माझे सहज लक्ष गेले. शिवसेनाप्रमुखांच्या पायात चप्पल नव्हती! आपल्या घरी आलेल्या ह्या मोठ्या कलाकाराबद्दल त्यांचे मन किती उचंबळून आले असेल याची साक्ष त्यांचे अनवाणी पाय देत होते.




महान कलाकारांविषयी बाळासाहेबांच्या मनात भक्तिची भावना होती हे वेळोवेळी त्यांनीच नोंदवले आहे. भाषणे, मुलाखतींमधून कलेविषयी आणि गुणी कलाकारांविषयी त्यांनी आदरभाव प्रकट केलेला दिसतो. पुण्यात दैनिक सामनाची आवृत्ती सुरु करताना उद्‌घाटनाच्या व्यासपीठावर नेहमी आयोजित केला जाणारा जाहीर सभेसारखा रुळलेला कार्यक्रम न करता उद्धवजींच्या सल्ल्याने मी बालगंधर्वमध्ये बाळासाहेबांची सुधीर गाडगीळ आणि रवी परांजपे यांनी मुलाखत घ्यावी असा कार्यक्रम ठेवला. रवी परांजपे यांच्या कलेविषयी साहेबांच्या मनातला आदर आणि प्रेम आम्ही सर्वच जण जाणून होतो. मुलाखतीच्या ओघात चित्रकलेविषयीच्या प्रश्नावर बोलताना बाळासाहेब भरभरून बोलले. एस.एम.पंडितांसारखा कलाकार होणे नाही असे म्हणाले आणि पंडितांनंतर आता तुम्हीच एक कलाकार असे आहात की दाद द्यावी. बाकी काही दिसत नाही. असे रवी परांजपेंचे भरभरून कौतुक केले. सामनाच्या सुरुवातीच्या काळातील दिवाळी अंकांचे मुखपृष्ठ रवी परांजपे यांच्याकडून करुन घे असे त्यांनी उद्धव यांना सांगितले. एकदा मुखपृष्ठ झाल्यावर ते बाळासाहेबांना दाखवायला रवी परांजपे घेऊन आले. महिषासूर मर्दिनीचे अप्रतिम चित्र झाले होते. साहेब उत्स्फूर्तपणे म्हणाले, देवीने मारलेल्या रेड्याच्या जागी रामकृष्ण हेगडे दाखव. त्यासुमारास महाराष्ट्र-कर्नाटक प्रश्न विकोपाला गेला होता आणि मुख्यमंत्री रामकृष्ण हेगडे आगीत तेल ओतत होते. रवीजी म्हणाले साहेब, आडवा पडलेला हेगडे मला नाही काढता येणार. साहेब सहज म्हणाले, चित्र दे. ड्रॉईंगबोर्ड मागवला. पेन्सिलीने देवीच्या पायांखाली पडलेला हेगडे काढला. हुबेहुब रामकृष्ण हेगडे काही क्षणात प्रकटला. रवी परांजपेही खुलले आणि मान डोलावली. दोन मोठ्या कलाकारांचे मनोमिलन आणि परस्पर सहकार्य पहायला मिळणे हे माझ्यासारख्यांचे भाग्य म्हटले पाहिजे.



**अंतर्बाह्य राष्ट्रीयता** – सन २०१० हे महाराष्ट्राचे सुवर्णमहोत्सवी वर्ष होते. राज्यातील विविध संस्था, संघटना आणि शासन सुवर्णमहोत्सवी कार्यक्रम साजरा करण्यासाठी कामाला लागले होते. शिवसेना पक्षानेही सुवर्णमहोत्सव साजरा करण्याकरिता निरनिराळ्या कल्पना तयार केल्या. परंतु ज्यावेळी यासंबंधी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्याकडे जाऊन अंतिम निर्णय घेण्याची वेळ आली, त्यावेळी एक अशी सूचना आली की, आपण



शिवसेनाप्रमुखांची सुवर्णतुला करून त्यातून मिळालेले सोने जनतेच्या हितार्थ सोयी सुविधा निर्माण करण्याकरिता वापरू. जनहिताच्या, आदिवासींकरिता निरनिराळ्या सोयीसुविधा मिळण्याकरिता प्रकल्प उभारणीकरिता या सोन्यातून येणारे पैसे खर्च करू. शिवसेनाप्रमुखांनी या सूचनेला तत्क्षणीच नकार देत असे म्हटले की, माझी सुवर्णतुला करण्यापेक्षा आज महाराष्ट्रामध्ये वेळेवर रक्त न मिळाल्यामुळे अनेक जणांना आपले प्राण गमवावे लागतात. महाराष्ट्र राज्याच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त रक्तदान महायज्ञ आयोजित करा.

सन २०१० च्या २५ एप्रिल रोजी रक्तदान महायज्ञ आयोजित करण्यात आला होता. उद्धवजींच्या नियोजनाखाली गोरेगावच्या नेस्को संकुलातील या महायज्ञाला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून व समस्त शिवसैनिकांकडून भरभरून व उदंड प्रतिसाद मिळाला. या रक्तदान महायज्ञातून एकूण २५,०६५ पिशव्या रक्त प्राप्त झाले. या रक्तदानाचा महाविक्रम 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये नोंदविण्यात आलेला आहे. रक्तदान महायज्ञाचा तो एक जागतिक विक्रमच झाला होता. या जागतिक महाविक्रमाला बाळासाहेबांचीच प्रेरणा होती. महाराष्ट्र राज्याच्या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने बाळासाहेबांची ती जणु एक रक्ततुलाच झाली होती. जनहिताचा विचार करून बाळासाहेबांनी सुवर्णतुलेच्या ऐवजी रक्तदान महायज्ञाची संकल्पना मांडली हे त्यांचे वेगळेपण!

बाळासाहेब त्यांचे विचार लोकांसमोर प्रभावीपणे मांडत होते. परंतु त्या विचारांना कृतीचीही जोड असायची हे आपण सर्वांनी आचरणात आणण्यासारखे तत्त्व आहे. शिवसेनाप्रमुखांची हिंदुत्वाची भाषणे ऐकून सर्वजण नेहमी प्रभावित होत. बाळासाहेबांनी ज्या ज्या वेळी प्रसंग आले, त्या त्या वेळी हिंदूंचे रक्षण करण्याकरिता मागेपुढे पाहिले नाही. ज्यावेळी मुंबईत दंगे झाले, त्यावेळी गोल देऊळ भागातून

अनेक फोन आले. काही लोक तेथे अडकलेले आहेत, हे शिवसेनाप्रमुखांच्या लक्षात आले. त्यावेळी त्यांनी लाल दिव्याची गाडी असलेल्या विरोधी पक्षनेत्यांना म्हणजे श्री. गोपीनाथजी मुंडे यांना सांगितले की, तुम्ही गोल देऊळ या भागामध्ये जाऊन तेथे जे अडकलेले व भयभीत झालेले लोक आहेत, त्यांना मोकळे करा आणि श्री. गोपीनाथ मुंडे यांनी संबंधित ठिकाणी जाऊन त्या अडकलेल्या लोकांना मोकळे केले. अशाप्रकारे शिवसेनाप्रमुखांनी सामान्य माणसांची काळजी घेतली. त्यांचे प्राण वाचविण्याकरिता प्रयत्न केले. दंग्यात सामान्य माणूस मरता कामा नये, याची यथोचित काळजी घेतली.

काश्मिरी पंडित देशोधडीला लागले, त्यांचे शिक्षण व व्यवसाय सगळे गेले. युतीचे सरकार असताना त्या काश्मिरी पंडितांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय शिवसेनाप्रमुखांनी वेगळा नियम करुन केली. काश्मिरी पंडितांच्या मुलांना महाराष्ट्रातील




मेडिकल व इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये आरक्षण ठेवण्याचे ऐतिहासिक काम बाळासाहेबांनी केले. केवळ भाषण करून, विचार देऊन ते थांबले नाहीत. त्यांच्या विचारांना त्यांनी सदैव कृतीची जोड दिली.

बाळासाहेबांचे एक ऐतिहासिक काम मला व आपणा सर्वांनाच सगळ्यात जास्त आवडलेले आहे. बाळासाहेबांनी जातीभेदांना गाडून टाकले. जातीभेद मिटविण्याविषयी ते केवळ उपदेश देत बसले नाहीत, खरोखर आचरणामध्ये तो विचार आणला. मला आठवते की, एका लोकसभेच्या निवडणुकीत युतीच्या उमेदवारांची चर्चा चालू होती. प्रमोद महाजन व गोपीनाथ मुंडे यांनी बाळासाहेबांना सांगितले की, बाळासाहेब हा जो एक उमेदवार तुम्ही संबंधित मतदारसंघाकरिता ठरवित आहात, त्याच्या जातीचे शंभर लोकसुद्धा या लोकसभा मतदार संघात नसतील. अशा परिस्थितीत तो कसा निवडून येईल? तत्क्षणी बाळासाहेबांनी सांगितले की, जय-पराजयाचा विचार करू नका. आपण जर अशा प्रकारे जातीचे विचार करायला लागलो तर महाराष्ट्रातून जातीभेद कधीच संपणार नाही. या माणसासाठी मी एक जास्त सभा घेईन. लोकसभा मतदारसंघाकरिता निवडलेला हा उमेदवार जातीच्या तत्त्वावर मी बदलणार नाही. त्यांनी त्यांचा शब्द खरा केला. त्या उमेदवाराकरिता जास्त सभा दिल्या व त्याला निवडून आणले. आश्चर्याची गोष्ट अशी की, खरोखरच त्याच्या जातीची शंभर माणसेही त्या लोकसभा मतदारसंघात नव्हती. तरीही तो त्या मतदारसंघातून खासदार म्हणून निवडून आला. असे हे ऐतिहासिक कार्य करण्याचे सर्वच पक्षांनी व नेत्यांनी मनावर घेतले असते तर आज महाराष्ट्रात जातीभेद नष्ट झाला असता.

मी शिवसेनाप्रमुख बाळासाहेबांच्या स्वभावाची जवळून ओळख व्हावी याकरिता एक आठवण मुद्दाम सांगतो. माजी राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांना पाठिंबा दिला त्यावेळी त्यांनी दुसरातिसरा कसलाही विचार केला नाही अथवा होणाऱ्या टीकेची पर्वाही केली नाही. त्या महाराष्ट्रातील महिला म्हणून त्यांना पाठिंबा जाहीर केला.

त्या राष्ट्रपतीपदावर विराजमान झाल्यानंतर पायउतार होण्याच्या मागेपुढे बाळासाहेब ठाकरे यांना भेटायला गेल्या आणि त्यांनी त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. बाळासाहेबांनी त्यांना बसा म्हणून सांगितले आणि त्यांना सांगितले की, माझी तुम्ही दोन कामे केली नाहीत. आजुबाजूला मोजके लोक होते. त्यांनी कान टवकारले की, काय सांगितले असणार? राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी विचारणा केली की, कोणती दोन कामे? तेव्हा त्यांनी सांगितले की, एक काम अफजल गुरुला फाशी दिली नाही आणि दुसरे काम श्रीमती सुलोचना दीदींना फाळके पुरस्कार दिला नाही. त्यांनी त्या दोन कामांचा उल्लेख 'माझी कामे' असा केला. वास्तविक पाहता हे महाराष्ट्राचे, देशाचे काम होते. परंतु बाळासाहेबांनी माझी ही दोन कामे केली नाहीत, असा उल्लेख केला. त्यांनी स्वत:साठी काही मागितले नव्हते. त्यांनी भूखंड, जमीन किंवा कोठल्याही संस्था मागितल्या नव्हत्या. तरी त्या दोन कामांचा त्यांनी माझी कामे म्हणून उल्लेख केला. लोकसभेवर हल्ला करून भारतीय जवानांची हत्या केली, त्या कटाचा सूत्रधार आतंकवादी अफजल गुरुला फाशी देण्याचे काम हे त्यांनी स्वत:चे काम मानले. तसेच श्रीमती सुलोचना दीदींना फाळके पुरस्कार दिला नाही हे देखील त्यांनी स्वत:चे काम मानले. यापेक्षा मोठ्या मनाची, दिलदारपणाची दुसरी व्यक्ति असूच शकत नाही.





# सुभाष बाबू यांची जयंती.... पराक्रम दिवस

**- अरविंद श्रीधर जोशी**



सुभाष बाबू...., सुभाषचंद्र बोस.... भारतीय स्वातंत्र्य इतिहासातील अत्यंत जाज्वल्य व्यक्तिमत्व. कर्तृत्व असे की ज्यांच्यामुळे पेटलेल्या असंतोषाला घाबरून खरं म्हणजे इंग्रजांनी भारत सोडण्याचा निर्णय घेतला!! पण या राष्ट्रनायकाची आठवण कोण ठेवतय....? आपल्याला किती जणांना नेताजींच्या बद्दल माहिती आहे?.... मी कोलकाता येथे नेताजींच्या घरी जाऊन आलो. तिथे त्यांचा जीवनपट मांडला आहे, वस्तुसंग्रह आहे. त्या जननायकाचा थरारक जीवनपट पाहायला मिळतो.... दुर्दैवाने ते स्थान हे पर्यटकांना दाखविण्याचे सौजन्यही तेथील सरकार घेत नाही. आजही ते स्थान दुर्लक्षित आहे.

१९२० च्या आसपास राजकारणात सक्रिय झालेले नेताजी.... १९३०-३१ साली कोलकात्याचे मेयरही होते, १९३८ साली काँग्रेसचे अध्यक्ष झाले, १९३९ साली पुन्हा निवडणूक लढवून प्रचंड बहुमताने कांग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडून आले होते. महात्मा समजल्या जाणाऱ्या गांधी यांनी ती स्वत:ची हार मानली आणि प्रतिष्ठेचा आणि मान अपमानाचा प्रश्न केला.... दबावामुळे बहुमताने निवडून आलेल्या नेताजींनी पदाचा राजीनामा दिला.... नव्हे घेतला गेला.... त्यांना अक्षरश: बाजूला करण्यात आले!!.... नंतर ते फॉरवर्ड ब्लॉकचे अध्यक्ष झाले. त्यांना ब्रिटिशांनी नजरकैदेत ठेवले आणि तिथून १९४० च्या सुमारास त्यांनी नजरकैदेतून पोबारा केला. तो एक चित्तथरारक प्रसंग आहे. नंतर जर्मनी आणि जपान यांचे साहाय्य घेऊन भारतीय सैनिकांमधील राष्ट्रीय भावना जागृत करून आझाद हिंद सेनेची स्थापना... इंग्रजी लष्कराच्या बाजूने लढणाऱ्या भारतीय जवानांना आणि भारतीय तरुणांना साद घातली.... 'तुम मुझे खून दो, मै तुम्हे आझादी दुंगा'. या सेनेत महिलांची सुद्धा पलटण होती....

नेताजींच्या आणि भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील सर्वात चित्तथरारक आणि प्रेरणादायी कालावधी हा आझाद हिंद सेनेची स्थापना आणि जोरदार चढाई!!.... ३० डिसेंबर १९४३ रोजी पोर्टब्लेअर - अंदमान निकोबार बेटे - येथील जिमखाना मैदान येथे त्यांनी अंदमान निकोबार बेटे हा भाग ब्रिटिश राजवटीपासून मुक्त आणि स्वतंत्र झाल्याचे घोषित केले होते. त्याआधी २१ ऑक्टोबर १९४३ रोजी त्यांनी स्वतंत्र भारताच्या सरकारची घोषणा केली होती.... भारताचे प्रथम घोषित पंतप्रधान - नेताजी सुभाषचंद्र बोस....!!

नेताजींच्या या प्रयत्नांनी सर्व भारतवर्षात एक चेतना निर्माण केली, एक प्रेरणा स्थान म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाऊ लागले..... त्यांच्या या सैनिकी उठवामुळे इंग्रज सरकार भयभीत झाले होते आणि यातूनच प्रेरणा घेऊन पुढे भारतीय सैनिकांनी बंडाचा झेंडा फडकवला होता आणि ते इंग्रजांच्या भारत सोडण्याच्या निर्णयाला कारणीभूत ठरले होते.... असे पराक्रमी नेताजी......नंतर जपान ने युद्धातून माघार घेतली आणि आझाद हिंद सेनेच्या बऱ्याच जणांना पकडण्यात आले, त्यांच्यावर मिलिटरी ट्रायल झाली. भारतीय राजकारणाचे एक दुर्दैव म्हणजे स्वतंत्र भारताच्या सत्ताधारी काँग्रेस राजकारण्यांनी सुभाष बाबू आणि आझाद हिंद सेनेच्या सैनिकांना स्वातंत्र्य सैनिकांचा दर्जा नाकारला.... स्वातंत्र्यासाठी प्राणांची बाजी लावणाऱ्या या सुपुत्र/सुपुत्री यांच्या त्यागाला नाकारणारे सुडाचे राजकारण स्वतंत्र भारताच्या तथाकथित लिबरल सत्ताधाऱ्यांनी केले.... क्रांतीकारकांना वाट चुकलेले देशभक्त म्हणणारे तत्वज्ञान पुढे चालवणारी काँग्रेस यांच्याकडून यापेक्षा अधिक अपेक्षा काय ठेवणार.....

ऑगस्ट १९४५ मध्ये जपानच्या एका विमानातून जाताना नेताजी यांचा विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाल्याचे आपल्याला इतिहास सांगतो.... पण नेताजी जिवंत आहेत असेही बरेच जण म्हणत!!!.... असेही म्हणतात की नेहरू सरकारने इंग्लंड बरोबर एक करार केला होता.... नेताजी जर सापडले तर तुमच्या हवाली करू.... काँग्रेसने नेताजींचा कायम दु:स्वासच केला आणि नेताजींच्या आयुष्यातील बराच जाज्वल्य इतिहास आपल्यापासून लपवला गेला!!! परंतु कांग्रेसने नाकारले असले तरी भारतीयांच्या मनात नेताजी यांच्यासाठी आदराचा एक कोपरा आजही आहे. त्यांच्या शौर्य गाथा आजही भारतीय मनावर गारुड घालतात.... प्रमाण थोडे कमी आहे.... पण आहे ही वस्तुस्थिती!!

नेताजींची जयंती हा भारत सरकारने पराक्रम दिवस म्हणून घोषित केला आहे! आता गणतंत्र दिवसाच्या कार्यक्रमांची सुरवात २३ जानेवारीपासून होणार आहे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे २६ जानेवारीच्या परेडची सुरवात नेताजींना इंडिया गेट वर मानवंदना देऊन होईल!!!

# राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब

## स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आई

सर्वात आधी स्वराज्याचे स्वप्न पाहणारी स्त्री आणि आपल्या सपुत्राला त्या स्वराज्याकरिता लढण्यासाठी तयार करणारी वाघीण म्हणजे माँ जिजाऊ.

ज्याप्रमाणे वाघिणीच्या पोटी छावा जन्माला येतो त्या प्रमाणे जिजाऊ माँ साहेबांच्या पोटी छत्रपती शिवाजी नावाचा छावा जन्माला आला.

बाळंतपणात असतांना माँ साहेबांनी रामायण महाभारत यांचे वाचन आणि चिंतन केले. त्यानंतर त्यांनी ठरवले की होणाऱ्या मुलाने स्वराज्य स्थापन करून रयतेला सुखी ठेवावे. माँ साहेब जिजाऊ यांचे गुणगान करावे तेवढे कमीच, कारण ज्या स्त्रीने स्वराज्य स्थापन करणाऱ्या राजाला जन्म दिला ती माता धन्यच!









जयंती निमित्त मानाचा मुजरा!

agile Electricals
Licenced Electrical Contractor

4, Matruchhaya, Raja Chhatrapati Shivaji Marg, Virar (W), Thane - 401 303.
Tel.: 95250-2502246, Mob. : 9322596250





'तुम्ही नसता तर नसते झाले शिवराय नि शंभूछावा, तुम्ही नसता तर नसता मिळाला स्वराज्याचा ठेवा, तुम्ही नसता तर नसते लढले जिद्दीने मावळे, तुम्ही नसता तर नसते दिसले स्वराज्याचे सोहळे.'





'एका स्त्रीची जबरदस्त इच्छाशक्ती जगातल्या ५-५ महाकाय साम्राज्ये उद्धवस्त करू शकते हे आई जिजाऊंनी पूर्ण जगाला दाखवले.'





आजच्या काळातील प्रत्येक स्त्री ने माँ साहेबांसारखं असणं आवश्यक आहे, जेणेकरून प्रत्येक स्त्रीच्या उदरात शिवाजी राजासारखे वीर पराक्रमी जन्माला येतील आणि समाजाला योग्य दिशेने घेऊन जातील. माँ साहेबांकडून शिकण्या सारख्या बऱ्याच गोष्टी होत्या, राजांना ज्यांनी लहानपणीच एक योग्य राजा कसा असतो आणि राजाने आपल्या रयतेसाठी काय करणे गरजेचे असते हे शिकवल होतं. प्रत्येकाची माता ही माँ जिजाऊ साहेबांसारखी असो आणि पुत्र हा राजांसारखा असो,




'महाराष्ट्राच्या मातीमध्ये रोवलेली पहार काढून ज्या माउलीने गुलामगिरीच्या छाताडावर प्रहार केला त्या विश्वमाता राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माहासाहेबांना मानाचा मुजरा.'



हिंदू हृदयसम्राट
शिवसेनाप्रमुख सरसेनापती
मा. बाळासाहेब ठाकरे यांच्या
जयंती निमित्त
मानाचा मुजरा!
REALTY LTD.
Shaping the future for generations
2nd Floor 202, Orion, Nehru Road, Near Santacruz Station,
Santacruz (E), Mumbai 400 055.
Tel.: 26108666 / 26108667
26108676 / 26338930
E-mail: approperties@ymail.com
Website: www.aprealty.in

# विवेकानंद केंद्र : एक चळवळ

## आपल्या चळवळीचे विचार स्वामीजींच्या संदेशाभोवती केंद्रित आहेत

स्वामी विवेकानंदांना आलेले अनुभव आणि त्यांच्या विचारप्रक्रियेचा परिपाक याभोवती आपल्या चळवळीचे विचार स्वाभाविकपणे केंद्रित आहेत. देशातील तत्कालीन स्थिती आणि ती बदलण्यासाठी काय करावे या विचाराने स्वामीजी अत्यंत बेचैन होते. त्यांच्या गुरूंच्या महानिर्वाणानंतर जीवनाची क्षणभंगुरता आणि देशाची स्थिती यावर त्यांचे लक्ष केंद्रित झाले. प्रत्येक क्षेत्रात काम करण्याची आवश्यकता होती. कुठेही नजर टाकली तर सगळीकडे उलथापालथ झालेली होती. राजकीय जीवन, सामाजिक जीवन, धार्मिक जीवन, समाजवस्त्राचा सारा धागाच उसवला गेला होता. काय करावे आणि कोठून सुरुवात करावी? त्यांच्या मनात विचार आला, कोलकात्यात बसून मला वृत्तपत्रे मिळू शकतात, इतरही माध्यमांचा उपयोग होईल आणि सगळीकडे काय घडत आहे ते कळू शकेल. परंतु मी देशभरात फिरलो आणि स्वतः सगळे पाहिले तर ते जास्त चांगले होईल. मला जनतेची नस जाणता येईल. म्हणून त्यांनी देशभर भ्रमण करण्याचा निर्णय घेतला कारण जीवितकार्य म्हणून कोणत्या प्रकारचे कार्य करणे योग्य राहील ते त्यातूनच स्पष्ट होईल असे त्यांना वाटले.



या एकाच उद्देशाने त्यांनी सारा देश पालथा घातला व अखेर ते कन्याकुमारीला पोहोचले. महासागरातील शिलाखंडावर ते गेले व ध्यानमग्न झाले. तेथे त्यांना काही सत्यांचा साक्षात्कार झाला. देशभक्त, संत आणि आध्यात्मिक मार्गदर्शकात त्यांचे परिवर्तन झाले. आपल्या देशाच्या ऱ्हासाची कारणे त्यांना उमगली. भारत ही आध्यात्मिक भूमी होती. देशभरात धर्मावर चर्चा होत होत्या, येथील लोक धार्मिक कार्यक्रमात मग्न होते. सारा देश ईशचिंतन करणारा होता. लोकांची ईश्वरावर आणि परंपरेवर श्रद्धा होती. तरीही देशाची आर्थिक व अन्य स्थिती फारच दारुण होती. या अधःपतनाचे कारण काय?

**स्वामीजींचा संदेश : जित्याजागत्या ईश्वराची सेवा**

ज्या देशाने संत, साधू आणि विद्वत्जनांचे तारकामंडल निर्माण केले, देश एके काळी स्वर्णभूमी होता, त्या भारतभूमीला हे काय झाले आहे? स्वामी विवेकानंद या प्रश्नाच्या अगदी मुळाशी गेले. त्यांना जाणवले की भारताचा पाया आहे धर्म. येथील सारे लोक धर्म, ईश्वर, पुनर्जन्म आणि मृत्यूनंतरचे जीवन या संदर्भातच विचार करत असतात. या देशातील जीवनाचा पाया धर्म असून तोच विकृत झाला आहे आणि लोक या विकृत धर्माचे अनुसरण करत आहेत. खऱ्या धर्माची, आध्यात्मिकतेची लोकांपासून फारकत झालेली आहे. दुर्दैवाने लोक खऱ्या धर्माचरणापासून पूर्णतः बाजूला गेले असल्याचे त्यांना दिसून आले. इथला माणूस धर्म अनुसरत असला तरी तो इतर लोकांशी काही जोडला गेलेला नाही. जणू काही ते लोक वा तो समाज अस्तित्वातच नाही. प्रत्येकजण आपल्या व्यक्तिगत प्रयत्नात गर्क असून हाच अध्यात्माचा व धर्माचा प्रयत्न आहे, तो ईश्वरप्राप्तीचा प्रयत्न आहे अशी त्याची धारणा आहे. यात परिवर्तन आणले पाहिजे याची स्वामीजींना जाणीव झाली.

त्याचे उत्तर म्हणजे लोकांना धर्माचे संपूर्ण ज्ञान होणे गरजेचे आहे. स्वामीजींनी उद्घोष केला, की जर तुम्हाला ईश्वराची भक्ती करायची असेल, ईश्वराप्रत पोहोचायचे असेल, खरोखरच ईश्वराचा साक्षात्कार करून घ्यायचा असेल, तर तुमच्या सभोवती असलेल्या जित्याजागत्या ईश्वराची तुम्ही सेवा करायला हवी. हे लोक म्हणजे असा ईश्वर आहे जो तुम्ही बघू शकता, त्याचा अनुभव घेऊ शकता आणि त्यांची सेवा केल्यानेच तुम्ही सुलभपणे ईश्वराप्रत पोहोचू




शकता, किमान या देशातील लोकांसाठी तरी केवळ हाच मार्ग आहे. आणि म्हणून ते म्हणतात, 'मनुष्यातील ईश्वराची पूजा करा.' त्यांना दिसत होते, की करोडो लोकांची शक्ती केवळ तथाकथित धार्मिक कृत्ये करण्यात, देवळांमध्ये जाण्यात, सर्व प्रकारच्या पूजांमध्ये सहभागी होण्यात, नामसंकीर्तन आणि अखंडपाठात, तीर्थयात्रा करण्यात, पवित्र नद्यांमध्ये स्नान करण्यात आणि सभोवताली जे घडत आहे त्याविषयी उदासीन राहण्यात खर्च होत आहे.

**आध्यात्मिक प्रेरणा समाज धारणेत प्रवाहित करण्याचा स्वामीजींचा प्रयत्न**

स्वामीजींनी आपल्या साऱ्या शक्तीनिशी हे आग्रहपूर्वक सांगितले आणि लोकांच्या कानापर्यंत ते पोहोचविण्याची मोहीम हाती घेतली. कधीकधी तर ते म्हणत, आगामी ५० वर्षांसाठी आपली महान भारतमाता हीच आपली मुख्य देवता असू द्या. इतर सारे देव सध्यातरी आपल्या मनातून अदृश्य होऊ द्या. ही एकच देवता जागृत आहे, आपला समाज. सगळीकडे त्याचेच हात आहेत, सगळीकडे त्याचेच चरण आहेत. त्याचेच कान आहेत, त्यानेच सर्व आच्छादले आहे. 'बाकी सगळ्या देवता निद्राधीन झाल्या आहेत. आपण त्या देवतांच्या मागे व्यर्थ कशाला जायचे? आपण आपल्या भोवताली असलेल्या या परमेश्वराची, या विराटाची पूजा करू शकणार नाही काय? आपण त्याची पूजा करू शकलो तर आपण इतर सर्व देवतांची पूजा करू शकू.' धर्माची समाजापासून फारकत होता कामा नये हे स्वामीजींनी शक्य तितक्या पद्धतींनी समाजमनावर बिंबवण्याचा प्रयत्न केला. तुम्ही जेवढी जनतेची सेवा कराल, तेवढे तुम्ही परमेश्वराचे दास बनू शकाल. त्या पवित्र शिलाखंडावर स्वामीजींना जो हा संदेश प्राप्त झाला तो त्यांनी जीवनभर शक्य तेवढा प्रसारित करण्याचा प्रयत्न केला.

आध्यात्मिक आस्था समाजसेवेत आणि ईश्वराप्रती असणारी भक्ती मानवप्रेमात रूपांतरित करण्याचा त्यामागे उद्देश होता. या देशात लोकांमध्ये ईश्वराप्रती भक्ती निश्चितच आहे. आपल्या देशात एखादी व्यक्ती वरवर पाहता ऐहिक सुखाच्या मागे लागलेली असली तरी प्रत्येकजण अंतर्यामी मुक्ती, स्वातंत्र्य, मोक्ष याचाच विचार करत असतो. तो ऐहिक गोष्टींमध्ये वेड्यासारखा धावत असला तरी ही मूल्ये त्याच्या मनात घर करून असतातच. मनात खोलवर कुठेतरी तो जाणून असतो, की हे काही जीवनसर्वस्व नव्हे. मी विवाह करत असलो तरी खरी गोष्ट मोक्षच आहे. जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून मला स्वतःची सुटका करून घ्यावयाची आहे. मला त्या परमेश्वराशी एकरूप व्हावयाचे आहे. मला ईश्वरी साक्षात्कार करून घ्यावयाचा आहे. ते माझे ध्येय आहे. माझी त्याच्याप्रती निष्ठा आहे. तो माणूस हा रस्ता अनुसरताना दिसत नसला तरी ते त्याच्या मनात स्पष्ट असते. या देशातील प्रत्येक विवेकी माणसाला बुद्धीने आणि हृदयातून या मूल्याचे पारंपरिक ज्ञान असते.

**आपला राष्ट्रीय गुणविशेष : मुक्तीचा ध्यास**

या जीवनात सर्वात मौल्यवान जर काही असेल तर ती आहे मुक्ती, मोक्ष, स्वातंत्र्य. त्यामुळे आपण सहज असे म्हणू शकतो की ते आपले राष्ट्रीय गुणविशेष आहेत. मुक्तीची आस! प्रत्येक साहित्यात आपल्याला ते प्रतिबिंबित झालेले दिसते. अशा आस्थेमध्ये प्रचंड शक्ती असते. ज्याला मुक्तीची तळमळ लागलेली आहे, त्याला योग्य वाट मिळाली, तर त्यातून आश्चर्यकारक कामे उभी राहतील. मुक्तीच्या तळमळीतून ऊर्जा निर्माण होत असते. ही ऊर्जा अनेक प्रकारे व्यक्त होऊ शकते. काहीजण जप करतात. काही प्राणायाम करतात. काहीजण गिरिकंदरी भ्रमण करतात. एका ठिकाणाहून दुसरीकडे तीर्थयात्रा करतात, काहीजण योगी आणि साधूंचा शोध घेतात आणि कितीतरी गोष्टी करतात. कारण त्यांना संसारातील क्षणभंगुरता कळून चुकलेली असते. कुठे एखाद्या भिंतीवर लिहिलेले असते, 'ही काही इतिश्री नाही. आपण आज जे पाहत आहोत, ते उद्या नसेल. हे सारे क्षणभंगुर आहे'. या क्षणिकतेमुळे, निरर्थकतेच्या भावनेमुळे काहीतरी शाश्वत मिळविण्याच्या मागे लागण्याची ही भावना कायमच असते. परंतु त्या तळमळीतून निर्माण झालेली ऊर्जा अनेक निष्फळ प्रकारातून वाया जाते आणि त्या व्यक्तीला ईश्वराप्रत जाण्याच्या मार्गावर एक पाऊल सुद्धा पुढे जाता येत नाही. जर मनुष्याला गरीब आणि पतितांमधील जिवंत परमेश्वर बघण्यास शिकवले, जर त्याला या विराटाची पूजा करण्यास शिकवले, तर ही सारी ऊर्जा आणि तळमळ, बंधुभाव, सेवा व परोपकारासाठी स्वार्थत्याग या रूपात अभिव्यक्त होईल. स्वामी विवेकानंदांच्या समोर असे चित्र होते.

**संन्यासी संघटनेला पूरक अशी कार्य करणारी गैरसंन्यासी संघटना**

स्वामी विवेकानंदांनी त्यांच्या एका गुरुबंधूंना लिहिलेल्या पत्रात म्हटले होते, 'पावित्र्याच्या तेजाने तळपणारे, ईश्वरावरील श्रद्धेचे शुभकवच ल्यालेले, दीनदलितांबद्दल हृदयात अपार करुणा असलेले, मृगेंद्राचे सामर्थ्य नसानसात स्फुरत असलेले लाखो युवक-युवती देशाच्या कानाकोपऱ्यात संचार करतील, मुक्ती, सेवा, सामाजिक उत्थान आणि सर्वप्रकारच्या समानतेचे आवाहन करतील आणि हा देश पौरुषाने मुसमुसून उठेल!' गरीब आणि

PM®
CONA®

SWITCHES | LED | WIRE | MCB




54 Years of Reliability

SWITCH ON TO A BRIGHT FUTURE

HO.-022-61249400 | www.pmcona.in | info@pmcona.in | facebook.com/pmcona

पतितांविषयी त्यांना वाटणाऱ्या सहानुभूतीमुळे ते म्हणतात, कदाचित हे साध्य करण्यासाठी गैरसंन्यासी संघटना उपयुक्त ठरू शकेल आणि म्हणूनच बराच विचार केल्यानंतर आम्ही देशात ही गैरसंन्यासी संघटना उभी करण्याचे ठरवले. रामकृष्ण मिशन वा अन्य नावाने देशात यापूर्वीच कार्यरत असलेल्या संन्यासी संघटनांना पूरक म्हणून ती काम करेल.

काही लोक विचारतात की गैरसंन्यासी संघटनेला तुम्ही एका संन्याशाचे नाव कसे काय दिले? स्वामी विवेकानंदांचे गुरू श्रीरामकृष्ण परमहंस हे काही संन्यासी नव्हते, ते गृहस्थ होते. विवेकानंदांनी संन्यासी नसलेल्या श्रीरामकृष्णांच्या नावाने संघटना स्थापन केली. आम्ही संन्यासी असलेल्या विवेकानंदांच्या नावाने गैरसंन्यासी संघटना स्थापन करण्याचा विचार केला. ते आपल्या संन्यासी संघटनेसाठी रामकृष्णांचे नाव देऊ शकतात. आम्हीही आमच्या गैरसंन्यासी संघटनेला स्वामी विवेकानंदांचे नाव देण्यास काय हरकत आहे!

परंतु स्वप्न तेच आहे. देशाच्या कानाकोपऱ्यात जा आणि मुक्तीचा, समाजोत्थानाचा, मदतीचा आणि समतेचा संदेश द्या. या अथवा त्या मार्गाने स्वप्न प्रत्यक्षात उतरवावे लागेल म्हणून आम्ही कार्यकर्त्यांची फळी तयार करण्याचा प्रयत्न करीत आहोत. यातील मुख्य गाभा जीवनव्रती असतील, पण ज्याच्या मनात सेवाभाव आहे आणि जो काहीतरी देण्यास तयार आहे असा प्रत्येकजण काम करू शकेल. आम्ही देशभरात फिरून लोकांना विचारत आहोत. 'तुम्ही काय देऊ शकता, तुही जे काही द्याल, त्याची गरज आहे. तुम्ही वेळ देऊ शकता, की शक्ती देऊ शकता?' आम्ही असे म्हणतो की ठीक आहे. जे सर्वसंग परित्याग करू शकतील असे संन्यासी कदाचित मिळणार नाहीत म्हणून आम्ही एक पायरी खाली आलो आहोत. ठीक आहे, तुम्हाला विवाह करायचा असेल तर वैवाहिक जीवन स्वीकारा आणि पती-पत्नी दोघांनी मिळून काम करा.

वस्तुतः एखादी व्यक्ती विवाह करते, तेव्हा एकाचे दोन होतात. त्यामुळे कामही दुप्पट होईल, परंतु असे अंकगणित काही तेथे कामी येत नाही. जरी ते दुप्पट होतात, तरी त्यांची काम करण्याची क्षमता अर्धी होते किंवा त्यापेक्षाही कमी होते. जगात अनेक त्रुटी आहेत. त्यापैकीच ही एक आहे. प्रत्यक्षात एक अधिक एक म्हणजे दोन असे होत नाही. परंतु जीवनाचा दृष्टिकोन तसा असेल, तर कदाचित एक अधिक एक दोन होतीलही, त्याहून जास्तही होतील. आम्ही जेव्हा गैरसंन्यासी संघटना असे म्हणतो, तेव्हा ते प्रतीकात्मक असते, म्हणजे आमचा सर्वसंग परित्यागाचा आग्रह नाही. जे भागशः त्याग करायला तयार आहेत, त्यांच्याकडून काम करून घ्यायला आमची तयारी आहे. पण त्याग तर करावाच लागेल. म्हणून आम्ही एक साधा प्रश्न विचारतो, 'तुम्ही काय देऊ शकता? थोडेही चालेल. थोडा वेळ देणार असलात तर सध्या तेही पुरे. जोपर्यंत तुम्ही हे वाढवत नाही तोवर हेही पुरे आहे.' ही चळवळ देशभरातील अशा लोकांचा शोध घेण्यासाठी आहे जे पुढे येऊन आपला वेळ व शक्ती देऊ इच्छितात.

### विवेकानंद केंद्र लोकांना वेळ व शक्ती देण्यासाठी आवाहन

जीवन म्हणजे काय? गणिती भाषेत बोलायचे तर वेळ + शक्ती म्हणजे जीवन असे मी नेहमी म्हणतो. तुम्ही त्याचे प्रमाण तपासून पाहा. वेळ आणि शक्ती यांची बेरीज म्हणजे जीवन, जेव्हा मी असे म्हणतो की मी माझे जीवन या कार्यासाठी देत आहे. तेव्हा मी नक्की काय देत असतो? या मानवी शरीरातील इंद्रियांच्या विद्युतजनित्राने निर्माण केलेली शक्ती आणि वेळ मी देत असतो. ज्ञानेंद्रिय आणि कर्मेंद्रिय ही परमेश्वराने काही कालावधीसह दिलेली साधने होत. जेव्हा कोणीही या जगात येतो तेव्हा काय होते? तो एक ऊर्जा निर्माण करणाऱ्या जनित्रासह या जगात प्रवेश करतो. हे जनित्र ६०, ७०, ८० वा ९० वर्षे कार्यरत राहते. तो एका तऱ्हेने टाईमबाँब आहे. तो ७० वा ८० वर्षानंतर फुटणार आहे. वेळ निर्धारित आहे, तेव्हा मनुष्याचे जीवन वेळ आणि शक्ती यापेक्षा अधिक काही नाही. तुमच्या या वेळ व शक्तीचा काही भाग आमच्यासाठी खर्च करावा अशी आमची अपेक्षा आहे. तुम्ही वेळ दिल्याशिवाय काम करू शकत नाही. ते अत्यावश्यक आहे. वेळेशिवाय तुम्ही शक्तीचा वापर करू शकणार नाही. म्हणून मानवी जीवन म्हणजे वेळ आणि शक्ती. आम्ही जनतेला आवाहन करतो, की तुम्ही तुमचा काही वेळ व काही शक्ती घेऊन या. ही गैरसंन्यासी संघटना आहे असे आम्ही म्हणतो ते प्रतीकात्मक आहे. हा सर्वसंगपरित्याग नव्हे. तुम्ही तुमचा सगळा गाशा गुंडाळून या असे आमचे म्हणणे नाही. तुम्ही आयुष्यातील काही भाग द्या. कार्यकर्त्यांची फळी म्हणणे ही प्रतीकात्मक आहे, तुम्हाला जी इच्छा असेल, ज्याचा तुम्ही त्याग करू शकता आणि तुम्ही जे काही देऊ शकता ते या कार्यासाठी द्या. त्यातून आम्हाला प्रचंड बळ मिळेल. तुम्ही जे द्याल त्यातून आम्ही काही कार्य करू. त्याच्या साहाय्याने देशाचे पुनरुत्थान घडवून आणू, विवेकानंद केंद्र चळवळीची ही व्यापक रूपरेषा मांडण्याचा मी प्रयत्न केला आहे.

'सेवा समर्पण' या पुस्तकातील श्रद्धेय एकनाथजी रानडे यांचे विचार.



# नव भारताचे मंत्रगुरू स्वामी विवेकानंद

**- सौ. कांचन जोशी**

स्वामी विवेकानंद सामर्थ्यशाली नव भारताचे मंत्र गुरु आहेत.

कोणता मंत्र दिला त्यांनी?

उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्यवरान्निबोधत!!!

त्यांना हा मंत्र कुठे, कधी आणि कसा मिळाला ?

संपूर्ण भारताचे परिभ्रमण करून स्वामीजी कन्याकुमारीला पोचले होते. तेव्हा अत्यंत अस्वस्थ होते. ते विचार करत होते. 'श्री गुरूंच्या आदेशाप्रमाणे भारतभ्रमण झाले. गरीब, श्रीमंत, उच्च नीच अनेकांना भेटलो. मिळालेल्या ज्ञानाचा यथाशक्ती प्रसार केला. पण अजूनही मला समाधान वाटत नाही.'

याच अस्वस्थतेमध्येच ते सागर पार करून मोठ्या शिलाखंडावर जाऊन पोचले. त्या शिलेवर प्रत्यक्ष पार्वतीमातेनं तप केलं होतं. अशा तपोभूमीवर स्वामीजी पोचले. आपल्या अस्वस्थतेचं कारण शोधण्यासाठी डोळे मिटून ध्यान करू लागले. पुन्हा एक तप सुरु झालं. पण हे तप वेगळं होतं, त्यात काही मिळावं ही अपेक्षा नव्हती. उलट आपलच कार्य अपूर्ण असल्याची जाणीव होती, ते पूर्ण करण्यासाठी मार्ग हवा होता. त्यासाठी चिंतन सुरु झालं. स्वत:साठी नाही, राष्ट्रासाठी..... ' राष्ट्र चिंतन पर्व'

का ते एवढे अस्वस्थ होते?

केल्याने देशाटन ....

देशाटनाने माणूस शिकतो, देशाटन हे .. पर्यटन नव्हे.

सावधपणे, जागृत राहून, डोळे उघडे ठेवून प्रवास ..... त्यातून देश कळतो.

चरैवेति चरैवेति ......या पद्धतीने परिभ्रमण केल्याने स्वामीजींना भारत समजला होता.

त्या शिलेवर स्वामीजींना साक्षात्कार झाला, साक्षात भारतमातेनेच दर्शन दिलं. भारतमातेने आपल्या मनीचं गुज तिच्या लाडक्या मुलाला सांगितलं. त्याच्या देशप्रेमाची, शक्तीची, संघर्षाची आणि सामर्थ्याचीही कल्पना तिला होती. म्हणूनच मनातलं सगळं सगळं ती त्याच्याजवळ बोलली. कन्याकुमारीला तिच्या चरणांपाशी बसून स्वामीजी तिच्याकडे बघत होते आणि त्यांच्या मस्तकावरून मायेन हात फिरवत ती त्यांना तिच्या गतवैभवाच्या रम्यकथा सांगत होती..... तो दिवस होतं २५ डिसेंबर १८९२.

हजारो वर्षापासूनच्या; सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि भौतिक वैभवाच्या, समृद्धतेच्या खाणाखुणा स्वामीजींच्या डोळ्यासमोर येत होत्या. संपूर्ण विश्वात भरून राहिलेल्या त्या परमेश्वराशी एकरूप होण्याचं ध्येय समोर ठेऊन त्यासाठी अध्यात्म जगणारा हिंदू समाज. अनेक पंथ, उपपंथ, संप्रदाय असले तरी त्यांच्यातील सुसंवाद, सर्वसमावेशकता. ढळू नये म्हणून ज्ञानी ऋषीमुनींनी निर्माण केलेली नैतिकतेला प्राधान्य देणारी समाजव्यवस्था. चराचर सृष्टीतला भगवंत पाहायला शिकवणारी, निसर्गाची पूजा करणारी संस्कृती आणि निसर्गाचा समतोल कुठेही ढळू न देता केलेली भौतिक प्रगती. या सर्वामुळे एकेकाळी एखाद्या ज्ञानसंपन्न गुरूप्रमाणे हा भारत, विश्वाला बंधुत्वाचा, एकात्मतेचा, खऱ्या ज्ञानाचा संदेश देत होता.

अहोरात्र स्वामीजी तिथे बसून आपल्या आईचं ते वैभवशाली रूप पाहात होते. घराघरातून सोन्याचा धूर निघावा अशी संपन्नता. पाहता पाहता भारतमातेशी एकरूप झाले. अभिमानानं उर भरून आला होता. आपण या भूमीत जन्म घेतलाय हे केवढं भाग्य आहे या कल्पनेनं आनंदविभोर झाले.....रात्रभर त्याच अवस्थेत बसून होते.......

रात्र संपून दुसरा दिवस उजाडला, भारताच्या वैभवाचा मागोवा घेता घेता लक्षात आलं, या सगळ्याचं जतन करण्यात, रक्षण करण्यात कुठेतरी आपण कमी पडलो.

स्वधर्माचं आचरण करत असताना राष्ट्रधर्म विसरलो. सज्जनतेला सामर्थ्याची जोड द्यायचं विसरलो. भारताच्या वैभवाला भुलून ते नष्ट करायला आलेल्या परकीय आक्रमकांचा

दुष्ट हेतू लक्षात यायला फार वेळ लागला. वैभवाच्या शिखरावर सावधानता आणि सजगता कमी पडली. वेदांताची शिकवण विसरलो. आपले सामर्थ्य कशात आहे हे आपण विसरलो, पण परकीयांनी ते ओळखलं. आणि ते नष्ट करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. आपली श्रद्धास्थानं, राष्ट्रीय अस्मिता, ज्ञानार्जनाच्या व्यवस्था नष्ट केल्या. या भूमीच्या कणाकणात असलेल्या देवत्वाच्या शुभंकर प्रतीकांचा योजनाबद्ध पद्धतीने विध्वंस झाला. आणि भारतीय समाज पोखरला गेला. जी विविधता भारतवर्षाचं भूषण होती, त्या विविधतेतील एकात्मता लोपली आणि आपसातील कलहांनी अवनतीत भर पडली. एकामागून एक राजकीय आणि सांस्कृतिक आक्रमणे होत राहिली आणि राष्ट्र हळूहळू आपले सामर्थ्य, समृद्धता, वैभव हरवून बसले. या अवनतीमुळे भारतीय समाज आपला आत्मविश्वास गमावून बसला. नैराश्याने, खचून गेल्यामुळे दुष्काळ, महापूर, साथीचे आजार अशा नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्याची ताकदच उरली नाही. स्वामीजींना डोळ्यांसमोर दिसत असलेला भारताचा वर्तमानकाळ अत्यंत वेदनादायक होता. दैन्य, दु:ख, गरिबी यांनी पिचून गेलेले लोक सनातन धर्मावरची श्रद्धा हरवून बसले आहेत. धर्म म्हणजे कर्मकांड आणि खुळचट समजुती असा समज झाल्यामुळे आणि पाश्चात्य शिक्षणाच्या प्रभावामुळे सुशिक्षित लोक नव्या नव्या समाजांची , संप्रदायांची स्थापना करून हिंदुधर्मालाच शिव्याशाप देत आहेत. काही लोक तर भारताच्या या जर्जर अवस्थेसाठी हिंदूधर्मालाच दोष देऊन धर्मांतर करायला तयार होत आहेत. हे पाहून स्वामीजी अत्यंत व्यथित झाले होते. अज्ञानाच्या अंधकारात चाचपडत खोल गर्तेत सापडलेल्या बांधवांची केविलवाणी अवस्था बघून मन विव्हल झालं. मातृभूमीवरच्या नितांत प्रेमामुळे अंत:करणाला असह्य यातना होत होत्या. स्वत:च भारत होऊन भारतमातेचं दु:ख, तिच्या यातना, तिचे क्लेश जणू ते स्वत:च भोगत होते. कारुण्यानं त्याचं हृदय भरून आलं होतं.

पण गुरुकृपेने पुरुषार्थ जागृत होता. आपण दु:ख करत न बसता भारतमातेचं हरवलेलं सामर्थ्य, वैभव परत येण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. जर्जर अवस्थेत कसंतरी आयुष्य कंठणाऱ्या आपल्या बांधवांना त्यांचा स्वाभिमान, आत्मविश्वास परत मिळवून देण्यसाठी उपाय केला पाहिजे. हे त्यांना कळत होतं. पण नक्की काय करावं या विचारात मग्न होऊन ते रात्रभर तिथेच बसून होते..............

मार्ग निश्चित सापडणारच होता.......

ध्यानाच्या तिसऱ्या दिवसाची पहाट मांगल्याचं वस्त्र लेऊन आली होती. पूर्वेकडून होणारा सूर्योदय पूर्वेकडच्या सर्वात प्राचीन भूमीसाठी शुभसंकेत घेऊन आला होता. अंध:कार संपल्याची वार्ता घेऊन आला होता. स्वामीजींना ती प्रसन्नता जाणवली. आणि त्यांच्या अंत:चक्षुंपुढे भारतमाता पुन्हा तिच्या सर्व सामर्थ्याने जागृत होऊन गौरवाने उभी राहिली. तिचं ते रूप पाहून त्यांचे जीवितकार्य स्पष्ट झाले. मातृभूमीला पुन्हा तिचे स्थान प्राप्त करून देण्यासाठी  अहोरात्र झटणे हेच आता ध्येय. पण एकट्याने हे होणार नाही. प्रत्येक भारतीय त्यासाठी पूर्ण सामर्थ्याने उभा राहिला पाहिजे. आपल्याला जे जे सर्व समजले त्याचा प्रसार करून भारतीय समाजाचा हरवलेला आत्मविश्वास पुन्हा मिळवावा लागेल. त्याग आणि सेवा हे भारतीय संस्कृतीचे दोन महत्त्वाचे आधारस्तंभ. ते पुन्हा बळकट करावे लागतील. त्यांचा पुन्हा पुन्हा जागर करावा लागेल. त्यागावाचून हे श्रेष्ठ कार्य पूर्ण होणार नाही. त्यासाठी प्रत्येक मनुष्यमात्राने त्याचे देवत्व ओळखून आत्मबल प्राप्त करून घ्यावे लागेल. अशी बलसंपन्न प्रजा असल्यावर राष्ट्र पुनरुत्थान अवघड नाही.

पण हे सगळं आपल्या लोकांना सांगणार कसं? त्यांच्या मनातला उपेक्षित भाव काढून टाकून त्यांच्या सुप्त क्षमता कशा जागृत करायच्या? नकारात्मकता, भोळसटपणा, नैराश्य, संकुचितपणा हे सगळं निपटून टाकून सत्याचे, ज्ञानाचे स्वागत करायला माझ्या सर्व बांधवांना तयार करण्यासाठी मला आता उठून उभे राहिले पाहिजे.

आता ध्येयसिद्धी झाल्याशिवाय थांबणे नाही ....हो....यासाठी आपल्या हिंदुसंस्कृतीचा महिमा सगळ्या जगाला सांगावा लागेल. भारतमाता जगद्गुरू पदावर आरूढ होणार आहे. त्याची ग्वाही त्रिभुवनाला दिली पाहिजे. जगभरात तिच्या आध्यात्मिक वैभवाची चर्चा व्हायला हवी. जगासमोर तिची मलीन प्रतिमा उभी केली गेली आहे. ती उजळवून तिचे सत्यस्वरूप दाखवायला हवे. मग आपोआपच तिच्या लेकरांना अभिमान वाटेल, आणि पुन्हा आपला समृद्ध वारसा जतन करून ते राष्ट्रपुनरुत्थानाच्या कार्यात स्वत:ला झोकून देतील.

बस! ठरलं !!

काय करायचं तेही ठरलं !!!

उत्तिष्ठत जाग्रत प्राप्यवरान्निबोधत !!!!

स्वामीजी उठून उभे राहिले. नैष्ठिक ब्रह्मचर्य, साधना, सद्गुरुकृपा, उत्कट देशप्रेम, भारताचे परिभ्रमण, अवलोकन, परीक्षण, चिंतन आणि तपश्चर्या, योग्य मार्ग सापडल्यावर निर्माण झालेला दुर्दम्य आत्मविश्वास, या सगळ्यातून निर्माण झाला एक तेजस्वी झंजावात........


हा झंजावात मार्गातले सगळे अडथळे पार करून शिकागोच्या सर्वधर्मपरिषदेत जाऊन पोचला. जगभरातून आलेल्या धर्मगुरूंसमोर, प्रतिष्ठितांसमोर हिंदुधर्माचे माहात्म्य गर्जना करून सांगितले.

पाश्चात्य भूमीत पोचल्यावर स्वामीजींचे भारतप्रेम अधिकच दृढ झाले. जगाला भारताच्या संदेशाची किती गरज आहे हे जास्त प्रकर्षाने जाणवले. म्हणूनच त्यांनी पुन्हा पुन्हा साद घातली.., स्वत: जगलेला मंत्र नवभारताला दिला.

'हे भारता उठ, जागा हो, ध्येय सिद्धी झाल्याशिवाय थांबू नकोस.. मी भविष्यात डोकावून पाहत नाही. पण एक चित्र मला स्पष्ट दिसत आहे. ही प्राचीन माता पुन्हा जागी झाली आहे. सर्व वैभवासह पुनश्च आपल्या सिंहासनावर आरूढ झाली आहे. शान्तिमंत्रांनी आणि आशीर्वचनांनी तिच्या आगमनाची ग्वाही त्रिभुवनाला देऊया!

आता जबाबदारी आपली आहे. त्यांच्या स्वप्नातला समर्थ भारत घडवण्यासाठी आपण काय करायला हवे आहे? याचेही उत्तर स्वामीजींच्या संदेशात आपल्याला सापडते. ते म्हणतात, 'हिंदुस्थानचे राष्ट्रीय ऐक्य म्हणजे विखुरलेल्या आध्यात्मिक शक्तींचे ऐक्य. संपूर्ण देशाला एकच धर्मचैतन्य व्यापून असले पाहिजे. इष्ट दैवतांची निवड करण्याचे स्वातंत्र्य हेच तर हिंदू जीवनपद्धतीचे मर्म आहे. परंतु कोणत्याही संप्रदायाचे असलो तरी सर्व हिंदूंना वंद्य असलेली काही समान तत्त्वे आहेत. ती स्मरून आपल्यातील बारीक-सारीक मतभेद आणि भांडणे यांना आपण तिलांजली दिली पाहिजे. आणि विखुरलेल्या सर्व शुभ शक्ती संघटित केल्या पाहिजेत.'

बलसंपन्न, नेतृत्वगुणसंपन्न, अनुशासित, ध्येयगामी आणि त्यागासाठी तत्पर असे तरुण हे कार्य नक्कीच करू शकतात. राष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने हाच संकल्प घेऊन स्वामीजींना सांगूया 'मातृभूमीच्या हाकेला प्रतिसाद देऊन फक्त एकोणचाळीस वर्षांच्या आयुष्यात केवढं प्रचंड कार्य तुम्ही केलंत. आणि 'उठा जागे व्हा, कार्य करा, श्रेष्ठ आदर्श डोळ्यासमोर ठेऊन त्यासाठी सर्वस्व समर्पण करा' अशी स्फूर्तिदायक साद घातलीत, आता तुम्ही घातलेल्या सादाला प्रतिसाद देणं हे आमचं कर्तव्य आहे. आम्ही संघटित प्रयत्नांनी या कार्याला मूर्त रूप देण्याचा नक्कीच प्रयत्न करू'







# देशभक्ती



**‘भक्ति’ हा शब्द उच्चारला की, आपल्या मनांत देवभक्ती किंवा ईश्वरभक्ती हीच कल्पना उद्‌भवते, भक्ति केवळ ईश्वराचीच असते अशी आपली दृढ भावना आहे. परंतु पुढे पुढे ‘भक्ति’ या कल्पनेचा विस्तार होऊन मातृभक्ती, पितृभक्ती, गुरुभक्ती, इ. असा भक्ति कल्पनेचा विस्तार होत गेला. तरीपण प्रामुख्याने ‘भक्ति’ केवळ देवाची, ईश्वराची हीच दृढतर जनभावना आहे.**

-द.तु. नन्दापुरे (गुरुजी)

**श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम्।**
**अर्चनं वंदनं दास्यं सख्यं आत्मनिवेदनम्॥**

भगवान श्रीविष्णुचे श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवा, अर्चना, वंदन, दास्य, सख्य, आणि आत्मनिवेदन असे भक्तीचे नऊ प्रकार सांगितलेत. यालाच नवविधा भक्ती किंवा नवधा भक्ती म्हणतात, हे सर्व नऊहि प्रकार श्री विष्णूंच्या (म्हणजेच आपल्या कोणत्याहि इष्ट देवतेच्या) भक्तीचेच प्रकार मानतात.

ह्या नऊपैकी कोणत्याहि विधीने (रीतीने) आपल्या इष्ट देवतेची (किंवा माता, पिता, गुरूंची) भक्ती हाच ‘भक्ति’चा सामान्य अर्थ आहे. परंतु पुढे कालान्तराने ‘भक्ति’ ही एवढीच मर्यादित राहिली नाही. पुढे मातृभूमि किंवा जन्मभूमिभक्ती, राष्ट्रभक्ती, देशभक्ती, असे भक्तिप्रकार निर्माण झालेत. आपल्या देशास, जन्मभूमीस किंवा राष्ट्रास देवता मानून त्यांना भक्तियोग्य मानण्यात येऊ लागले. अर्थात हा देशभक्तीचा प्रकार तत्कालीन स्थितीनुसार उदय पावला. आपल्या मातृभूमीवर जेव्हा परकीय (म्हणजे परदेशीय किंवा परधर्मीय) राज्यकर्ते राज्य करतात, स्वकीय किंवा स्वदेशीय बांधवांना गुलाम बनवितात, त्यांचा छळ करतात, जेव्हां ‘स्वराज्य’ न राहता परराज्य होते अशा अवस्थेमध्ये स्वजन व स्वदेशाविषयी प्रेम व परकीय व जुलमी राज्यकर्त्याविषयी क्रोध, तिरस्कार व शत्रुभावना निर्माण होते, अशावेळी देशभक्ती, देशप्रेम मूळ भूमिपुत्रांच्या अन्तःकरणात निर्माण होते. ती भावना म्हणजेच देशभक्ती किंवा राष्ट्रभक्ती.

ईश्वरभक्ती प्रमाणेच नवविधा भक्ती हि कमी-अधिक प्रमाणात देशभक्तीतहि दिसून येते. ‘देश’ ही संज्ञा भौगोलिक असून ‘राष्ट्र’ ही संज्ञा सामाजिक आहे. परकीय आक्रमणापूर्वी आपल्या देशात देशभक्ती किंवा राष्ट्रभक्ती या भावना नसाव्यात असे वाटते.

**‘माता भूमिः पुत्रोऽहं पृथिव्याः ।** अशी वचने प्राचीन साहित्यात आहेत. परंतु त्यांत आजच्या प्रमाणे ‘देशभक्ति-भावना’ नाही, कारण त्यावेळी ‘स्वराज्य’ होते, परराज्य नव्हते.

**देशभक्ति**

आज ज्या प्रकारे देशभक्ति भावना आपण जनमानसात पाहतो, ती भावना आपल्या देशात सुमारे दोनशे वर्षापूर्वी निर्माण झाली. इ.स. १८२० पर्यंत आपल्या देशात सर्वत्र मुस्लीम व हिन्दु राज्यकर्त्यांची छोटी-छोटी राज्ये होती. त्या राज्यकर्त्यांच्या आपसात लढाया होऊन एकमेकांचे प्रदेश ताब्यात घेणे म्हणजे जिंकणे हेच चालत असे, जनजीवनावर ह्या सत्ताबदलाचा फारसा परिणाम होत नव्हता. क्वचित जनतेत परधर्मीय म्हणून झगडे,


हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे
यांच्या जयंती निमित्त मन: पूर्वक शुभेच्छा!
तुमच्याकडे आत्मबल असेल तर
जगाच्या पाठीवर कुठेही जा
तुम्हाला मरण नाही.
With Best Compliments
A
Well Wisher





असंतोष होई, परंतु त्यास व्यापक देशभक्तीचे स्वरूप नव्हते, 'नाविष्णुः पृथिवीपतिः। अविष्णु म्हणजे ईश्वरत्व नसलेली व्यक्ती पृथ्वीपती (राजा) होऊ शकत नाही, अशी त्यावेळी जनभावना होती. क्वचित परधर्मिया-विरुद्ध स्थानीय स्वरूपाचे झगडे (युद्ध नव्हे) होत असत, परंतु त्यांस देशव्यापी स्वरूप नव्हते.

इ.स. १८२० मध्ये पुण्याच्या शनिवार वाड्यावर इंग्रजांचा युनियन जॅक फडकला व आपला संपूर्ण देश ब्रिटिश राज्यकर्त्यांचा गुलाम बनला. 'गुलामी' ही भावना त्यापूर्वीच्या काळात बहुधा नव्हती. येथे खेदाने नमूद करावे लागते, की आपला एकसंध भारत देश ब्रिटीशांनी निर्माण केला. आपल्या देशातील जनतेत राष्ट्रभावना ही ब्रिटीशांनीच निर्माण केली. 'राष्ट्र' कल्पना सुध्दा आपल्या देशात पश्चिमी देशांकडूनच आली. परंतु ती आपल्या देशातील जनतेने स्वीकारली.

वेद-वाङ्मयातहि 'राष्ट्रा'चा उल्लेख आहे. परंतु तो आजच्या प्रमाणे आसेतुहिमाचल देशव्यापी नव्हता. १८२० पासून आपल्या संपूर्ण देशावर इंग्रजांचे एकछत्री राज्य सुरु झाले.

इंग्रजांच्या जुलमी राजवटीविरुद्ध अनेक ठिकाणी असंतोष व्यक्त झाला. त्याकाळी संपूर्ण देश एकसंघ असल्यामुळे तो राग देशात सर्वत्र पसरत असे. त्यामुळेच १८५७ साली इंग्रजांविरुद्ध स्थानिक राज्यकर्ते आणि सैनिक यांचा उठाव झाला. ते स्वातंत्र्य समरच होते. ते स्वातंत्र्य युद्ध अयशस्वी झाले, परंतु त्याद्वारे इंग्रजाविरुद्ध जनतेचा असंतोष कायमच होता, नव्हे, तो वाढतच होता, आणि त्याद्वारेच देशातील जनतेमध्ये देशप्रेम, इंग्रजांविषयी चीड व कोध, स्वराज्याची भावना, देशभक्तीची भावना निर्माण झाली. आणि त्यामुळेच आपल्या देशात ईश्वर भक्ती प्रमाणेच देशभक्ति असा एक नवीन भक्तिपंथ उदयास आला. देशभक्तीची सुरवात अशी आहे.

१८५७ च्या स्वातंत्र्य समरानंतर - जरी ते अयशस्वी झाले तरी - भारतीय जनमानसात देश भक्तीचा स्फुल्लिंग प्रकट झाला. त्यानंतर इंग्रज राजसत्ता व विरुद्ध भारतीय जनता क्षुब्ध होत राहिली. व्यक्तिशः व समूहशः इंग्रज - राजवटीविरुद्ध लोकक्षोभ प्रकट होऊ लागला. त्या लोक क्षोभापोटी अनेक इंग्रज अधिकाऱ्यांच्या हत्या करण्यात आल्यात, मदनलाल धिंग्रा, भगत सिंग, सुखदेव, राजगुरू, चाफेकर बंधु, वासुदेव बळवंत फडके, इ. क्रांतिकारकांची कार्ये सर्व लोक जाणतातच. या सर्व क्रांतिकारकांना जनतेची अप्रत्यक्ष साथ होतीच.

**सन १७६२ ते १७७४**

या काळात बंगाल प्रांतात स्थानिक संताळ लोकांनी तत्कालीन इंग्रजी शासकांविरुद्ध उठाव केला. 'संन्याशांचे बंड' म्हणून तो उठाव इतिहासात प्रसिद्ध आहे, त्या उठावात संताळांनी इंग्रजांचा खजिना लुटला होता. पुढे तो उठावहि अनेक कारणाने अयशस्वी झाला व इंग्रजांची सत्ता बंगाल, बिहार व ओरिसा प्रान्तात पसरली.

थोर बंगाली कादंबरीकार बंकिमचन्द्र चॅटर्जी यांनी १८८० साली त्या संन्याशांच्या उठावावर 'आनंदमठ' ही कादंबरी लिहिली. श्री. बंकिमबाबू तत्कालीन ईस्ट इंडिया कंपनीमध्ये मोठ्या पदावरील अधिकारी होते. त्यांच्यावर त्या अधिकार पदामुळे बरीच बंधने होती. ती बंधने सांभाळूनच त्यांना 'आनंदमठ' लिहावे लागले. आनंदमठ ही भारतमातेची भक्ती शिकविणारी एक आगळी वेगळी कादंबरी आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात याच कादंबरीने अनेक बंगाली तरुणांना देशभक्तीचा पाठ दिला. आणि भारताच्या स्वातंत्र्य सैनिकांना सदैव प्रेरणा देणारे 'वन्दे मातरम्' हे गीत या कादंबरीचा प्राण आहे.

'वन्दे मातरम्' हे गीत १८८५ साली सर्वत्र ज्ञात झाले. आणि ते सर्व देशभर गाजले. क्रांतिकारक आणि स्वातंत्र्य प्रेमींचे अत्यंत प्रेरणादायी गीत झाले, 'वन्दे मातरम्' हे वेद मंत्राहूनहि वंदनीय असा मंत्र झाला. अनेक क्रांतिकारक 'वन्देमातरम्' अशी घोषणा देत फासावर चढलेत. 'वन्देमातरम्' चा अर्थ 'मातेस नमस्कार' असा आहे. या ठिकाणी माता म्हणजे मातृभूमी भारत माता. या गीतात भारतमातेस दुर्गा मातेच्या स्वरूपात मानले आहे. त्या काळात दुर्गामाता स्वरूपी भारतमातेची चित्रेहि सर्वत्र झळकू लागली होती. 'वन्दे मातरम्' ह्या गीतामुळे आणि घोषणेमुळे संपूर्ण देशातील जनता देशभक्तीने भारली.

**स्वराज्य : लोकमान्य टिळक**

१८८५ साली सर ॲलन ह्यूम या इंग्रज अधिकाऱ्याने देशान्तर्गत कारभारास मार्गदर्शक म्हणून स्थानिक लोकनेते व विद्वतजनांची एक सभा स्थापन केली. इंडियन नॅशनल काँग्रेस' असे त्या सभेचे नाव, (सध्या सर्वत्र काँग्रेस या नावाने चालू असलेला काँग्रेस हा राजकीय पक्ष.) स्वातंत्र्यपूर्व काळात 'काँग्रेस' केवळ शासनास मार्गदर्शक संस्था होती. पुढे लोकमान्य टिळक राष्ट्रीय काँग्रेसमध्ये आले आणि त्यांनी थातुर मातुर सुधारणापेक्षा देशांस पूर्ण स्वराज्याचीच मागणी केली. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे.' अशी त्यांची गर्जना होती. त्यासाठी त्यांनी' 'होमरूल लीग' स्थापन केली. त्यामुळे स्वराज्य आणि स्वातंत्र्याच्या मागणीस वेग मिळाला. 'वन्दे मातरम्' ह्या गीताला व घोषणेला त्यामुळे अधिक बळ मिळाले, जनमानसात 'देशभक्ती अधिकाधिक दृढमूल होऊ लागली.



**स्वामी विवेकानन्द**


१८९३ साली स्वामी विवेकानन्द अमेरिकेत शिकागो येथे सर्व धर्म परिषदेकरिता गेलेत. सुमारे चार वर्षे ते युरोप-अमेरिकेत राहिलेत आणि तिकडील लोकांना भारत देश, भारताचा धर्म, वेदान्त, तत्वज्ञान, हिन्दुधर्म, इ.बाबत प्रबोधित केले. १८९७ साली ते भारतात परत आलेत. सर्वत्र त्यांचे अत्यंत आदराने भव्य स्वागत झाले. मद्रास येथे 'भारताचा भावी काळ' यावर दिलेल्या भाषणात ते स्पष्ट सांगतात - 'आगामी पन्नास वर्षात आपली थोर भारत माता हीच आपली आराध्य देवता असली पाहिजे, अन्य सर्व देवता काही काळ आपल्या मनातून दूर राहू द्या, आपला समाज हेच एकमेव जागृत दैवत आहे. बाकी सर्व देव निद्रिस्त आहेत, व्यर्थ अशा देवतांच्या मागे आपण धावत आहोत.' असा रोखठोक आदेश स्वामीजीनी जनतेस दिला. तो त्यांचा अधिकार होता.

**महात्मा गांधीः देशसेवा**

१९१५ साली महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेमधील कार्य संपवून भारतात आलेत. आपल्या देशातील तळागाळातील लोकांना स्वराज्याची व स्वातंत्र्याची जाण महात्मा गांधीजींनी करून दिली. बिहारातील, चंपारण्य जिल्ह्यातील निळीच्या कामगारांवरील अन्यायाचे निवारण, मीठाचा सत्याग्रह, चरख्याद्वारे वस्त्र स्वावलंबन, अस्पृश्यता निवारण, स्वदेशी वस्तूंची निर्मिती व त्यांचा वापर, ग्रामोद्योगास चालना इ. लोकांच्या दैनंदिन जीवनाचे व जिव्हाळ्याचे प्रश्न त्यांनी सोडविण्यासाठी अथक प्रयत्न केलेत. देश भक्ती पेक्षाहि देशसेवेस त्यांनी प्राधान्य दिले. त्यामुळे जनतेच्या देशभक्तीस देशसेवेची कृतिशील जोड मिळली. महात्मा गांधीजींच्याच काळात राजकीय व सामाजिक जननेत्यांस 'देशभक्त' (दे.भ.) म्हणण्याची प्रथारूढ झाली. सुमारे दीडशे वर्षांपासून चालत आलेल्या भारतीय जनतेच्या देशभक्तीचा प्रमुख उद्देश देशाची स्वतंत्रता, परदास्यातून मुक्तता हाच होता. त्यासाठी देशालाच देव किंवा देवता किंवा माता मानू लागलेत. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी स्वतंत्रतेलाच 'भगवति' मानून वंदन केले आहे.

**'जयोस्तुते श्री महन्मंगले शिवास्पदे शुभदे।**
**'स्वतंत्रते भगवति' त्वामहं यशोयुतां वन्दे ॥**

**॥ वन्दे मातरम् ॥**
**भारत माता की जय । ॥ जय हिन्द ॥**



# पुस्तक परिक्षण

# कवींसाठी मार्गदर्शक गाईड

कवी गझलकार, समीक्षक, विजय जोशी सर काव्यक्षेत्रात काव्यगुरु म्हणून ओळखले जातात. त्यांचे ४ कविता संग्रह प्रकाशित झाले आहेत. 'वृत्तबद्ध' कविता ते गझल (तंत्र आणि मंत्र) हे त्यांचे कवितेवरील पाचवे पुस्तक आहे. आजवर त्यांनी ५० च्या वर वृत्त व गझल कार्यशाळा आयोजित केल्या आहेत. कार्यशाळांमुळे अनेक कवींना वृत्तबद्ध कविता आणि गझलबद्दल मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे शिष्यगण फक्त महाराष्ट्रातच नाही तर महाराष्ट्राबाहेर आणि सातासमुद्रापलिकडेही पसरलेले आहेत. 'आ|जळीतील शब्दफुले' हा स्वरचित कवितांचा कार्यक्रम त्यांनी त्यांच्या दोन साथीदारासोबत निर्माण केला आहे व त्याचे आजवर ५०च्या वर प्रयोग झाले आहेत. अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलन व इतर अनेक सम्मेलनात त्यांनी निमंत्रित कवी म्हणून आपल्या कविता सादर केल्या आहेत. काव्यप्रेमी शिक्षक मंचच्या गझलप्रेमी शिक्षक मंच ह्या शाखेचे सर अध्यक्ष आहेत. त्यांच्या मार्गदर्शनामुळे त्यांचे अनेक शिष्य वृत्तबद्ध कविता व चांगल्या गझला लिहू लागले.




त्यांचे हे नवीन पुस्तक मराठी साहित्याचा, कवितांचा आणि गझलांचा अभ्यास करणाऱ्या प्रत्येक काव्यप्रेमीने वाचावे असे सर्वोत्तम पुस्तक आहे. खऱ्या अर्थाने ते कविता आणि गझलांचे पाठ्य पुस्तक आहे. प्राथमिक शाळेतल्या विद्यार्थ्यांपासून तर वरिष्ठ काव्यप्रेमी नागरिकांना सर्वांना उपयुक्त ठरेल असे हे पुस्तक आहे. मराठी व्याकरणाचा थोडक्यात आढावा घेऊन हे पुस्तक वळते ते थेट मात्रांकडे. मात्रा म्हणजे काय? त्या कशा मोजाव्या, लघू, गुरु शब्द कसे ओळखावे. जोडाक्षराचे वजन कसे पहावे ह्या सर्वांचे सह उदाहरण मार्गदर्शन करण्यात आले आहे. विविध वृत्तांचे प्रकार व त्यामधील कविता देखील प्रभावीपणे सादर केल्या आहेत. कवितेमध्ये लयीला फार महत्त्व असते. यतीभंग झाल्यास लय तुटते. शब्दांशी कसरत केली की लय तुटते ह्या संबंधी देखील त्यांचे मार्गदर्शन मोलाचे आहे.

पाठ्यपुस्तकात जसे सरावासाठी स्वाध्याय किंवा प्रश्न असतात तसे सरांनी मात्रा मोजण्यासाठी, मात्राबद्ध कवितांच्या सरावाचे स्वाध्याय दिले आहेत. मात्रा मोजतांना नेहमीच्या चुका टाळण्यासाठी त्यांनी उत्तरेदेखील दिली आहे.

प्रत्येक कवीला वाटत असते आपली कविता वृत्तबंध आणि छंदबद्ध असावी त्यासाठी आपण अनेक कवींच्या कवितांचा अभ्यास करतो, त्यातील बारकावे पहातो. सदर पुस्तकात ह्या संदर्भातले मार्गदर्शन रेडी रेकनरसारखे मिळते.

अक्षरछंद रचनांबद्दलचे मार्गदर्शन मोलाचे आहे. अष्टाक्षरी कवितांवर छान मार्गदर्शन केले आहे.

अक्षरगण वृत्ते व त्यातील निवडक वृत्ते ह्याबद्दल कविता व गझला सादर करुन त्यांनी सखोल मार्गदर्शन केले आहे.

गझल तंत्राबद्दल लिहितांना ते मराठी गझलेचा इतिहास नमूद करतात. माधव ज्युलियन आणि सुरेश भटांचा आवर्जून उल्लेख करतात. गझलेतील रदिफ, कवाफी, अलामत, गझलियत ह्याबद्दल ते सोप्या भाषेत मार्गदर्शन करतात.

त्यांच्या अनेक स्वरचित गझला आणि कविता ह्या पुस्तकात अभ्यासासाठी दिल्या आहे. एकंदरीत हे पुस्तक म्हणजे कविता आणि गझलांचा अभ्यास करणाऱ्या सर्व कवींसाठी मार्गदर्शक गाईड आहे.

**वृत्तबद्ध कविता ते गझल (तंत्र आणि मंत्र)**
लेखक - विजय जोशी (विजो)
प्रकाशक - अथर्व प्रकाशन, डोंबिवली
भ्रमणध्वनी - ९८९२७५२२४२
प्रथम आवृत्ती डिसेंबर २०२२
किंमती रु. २००/-

शब्दांकन
**डॉ. मिलिंद शेजवळ**
मुलुंड, मुंबई
मो. ९८९२९३२८०३





# पाकिस्तानी लष्कराची भारत विरोधी भूमिका यापुढेही कायम राहील, देवशर यांची भूमिका

भारताच्या बाबतीत बहुतेक सर्वच पाकिस्तानी लष्कर प्रमुखांचे एकमत असते. २४ नोव्हेंबर २०२२ रोजी पाकिस्तानचे नवे लष्करप्रमुख जनरल सय्यद असीम मुनीर यांनी पाकिस्तानचे प्रधानमंत्री शहाबाज शरीफ यांची त्यांच्या निवासस्थानी इस्लामाबाद येथे भेट घेतली.



**कोणत्याही नवीन लष्कर प्रमुखांची नेमणूक हा भारतासाठी सावधगिरीचा इशारा असतो. त्या अनुषंगाने जनरल सय्यद मुनीर यांच्या नियुक्तीबद्दल आपण काय सांगाल?**

वैयक्तिक रित्या सांगायचं झालं तर कोणताही लष्करप्रमुख पाकिस्तानी

With Best Compliments From



GYAN PRAKASH SINGH
Managing Director

MSF
Modern V.R. Security Force (India) Pvt. Ltd.
Security & Risk Management Services
An ISO 9001:2008, SRM800 : ISO 10002:2004 Certified Company

MODERN INFORMATICS
e-surveillance, Networking & ICT Infrastructure Services
An ISO 9001:2008, SRM800 : ISO 10002:2004 Certified Company

MODERN
FACILITIES MANAGEMENT PVT. LTD.
Integrated Facilities Management Solutions
An ISO 9001:2008, SRM800 : ISO 10002:2004 Certified Company

Corporate Office : 6th floor, Atlanta Centre, Sonawala Road, Goregaon (East), Mumbai – 400 063
Phone : 022-40645555 | Fax : 022-40645566 | Email: corporate@modernforce.com
www.modernforce.com | www.moderninformatics.com | www.modernfacilities.co.in



सैन्याचे भारताविषयीचे आधीपासून चालत आलेले धोरण बदलू शकत नाही. मग त्यांची नियुक्ती नव्याने झालेली का असेना. त्यामुळे पाकिस्तानचे नवनियुक्त लष्करप्रमुख सुद्धा त्याच धोरणाचा अवलंब करतील जे मागील ७० वर्षांपासून पाकिस्तानने भारतविरोधी आखलेलं आहे. थोडक्यात नव्या लष्करप्रमुखांकडून फार काही अपेक्षा नाहीत. भारताविषयीचं पाकिस्तानचं धोरण झटक्यात बदलणार नाही. तेव्हा आपणच सावध असायला हवे कारण जनरल असीम मुनीर यांना नियंत्रण रेषेवर (LOC) काम करण्याचा अनुभव आहे. आणि जेव्हा पुलवामा हल्ला झाला तेव्हा ते इंटर सर्विस इंटेलिजन्सचे डायरेक्टर जनरल होते.

**पुलवामा हल्ला झाला त्यावेळी मुनीर ISI चे प्रमुख होते. आता पाकिस्तानचे नवे लष्करप्रमुख म्हणून नेमणूक झाल्यावर भारताने त्यांच्या कार्यकाळात कशा प्रकारे सावधगिरी बाळगायला हवी ?**

फक्त मुनीर लष्करप्रमुख झाले म्हणून सावधगिरी बाळगायची असे नाही. तर भारताने नियंत्रण रेषेवरील पाकिस्तान कडून होणाऱ्या प्रत्येक कारवाईला चोख उत्तर देण्यासाठी नेहमी सज्ज राहायला हवे. जम्मू काश्मीर मध्ये दहशतवादी कारवाया सुरूच आहेत. पण त्याहूनही आणखी काही मोठे होऊ नये याची काळजी घ्यायला हवी. त्यामुळे नेहमीपेक्षा अधिक सावध राहणं गरजेचं आहे.

**जनरल मुनीर हे धार्मिक वृत्तीचे आहेत. कुराण त्यांना तोंडपाठ आहे. या गोष्टीचा पाकिस्तानी सैन्यावर काही परिणाम होईल का ? ते कडक शिस्तीचे लष्करप्रमुख असतील का ?**

भक्त असणे आणि कठोर शिस्तीचे असणे यात फरक आहे. आतापर्यंत तरी त्यांनी कोणतेही टोकाचे पाऊल उचललेले नाही. त्यांना कुराण पूर्ण पाठ आहे याचा अर्थ असा नाही की ते कडक शिस्तीचे असतील. धर्माचा अभिमान हा असायलाच हवा. पण तो रास्त असायला हवा.

**तुलना करायचीच झाली तर त्यांची इतर पाकिस्तानी लष्कर प्रमुखांशी कशी तुलना करता येईल?**

सर्वच माजी पाकिस्तानी लष्कर प्रमुखांचे भारताविषयीचे धोरण सारखेच होते. त्यामुळे मुनीर याहून काही वेगळे करतील अशी अपेक्षा नाही. त्यांची काम करण्याची पद्धत कदाचित वेगळी असू शकते. पण पाकिस्तानचे भारतविरोधी धोरण कायम राहील हे नक्की.

**पुन्हा एकदा सक्रिय झालेल्या इम्रान खान यांना पाकिस्तानी सेना कसे तोंड देईल?**

जनरल मुनीर हे देशांतर्गत कारवाईवर जास्त लक्ष देतील. सर्वप्रथम इम्रान खान यांनीच त्यांच्या कारवाईने खराब केलेली पाकिस्तानी लष्कराची प्रतिमा मुनीर यांना सुधारावी लागेल. त्यांना सैन्यात एकजूट निर्माण करावी लागेल. कारण सैन्यात फूट पडली आहे. त्यानंतर इम्रान खान अजूनही पाकिस्तानी सैन्याशी संघर्ष सुरु ठेवतात का हे पाहावे लागेल. जसे त्यांनी बाजवांच्या कार्यकाळात केले होते. इम्रान खान यांनी बाजवा यांना देशद्रोही म्हटले होते.

इम्रान खान सुद्धा पूर्वीचेच धोरण कायम ठेवतात की वागण्यात बदल करून सैन्याला सहकार्य करतात ते पाहावे लागेल. इम्रान यांनी ते प्रसिद्ध असल्याचे सिद्ध केले आहे. पण जर त्यांनीच पाकिस्तानी सैन्यावर हल्ला केला तर त्यांची प्रसिद्धी घातक ठरू शकते. त्यामुळे जोपर्यंत इम्रान खान स्वत:ला सिद्ध

करत नाहीत तोपर्यंत पाकिस्तानी सैन्य त्यांच्याविषयी सावधगिरी बाळगेल.

**जनरल बाजवा हे गेल्या ७ दशकांपासून सैन्याच्या राजकारणातील हस्तक्षेपाविषयी बोलत होते. ते यापुढे असेही म्हणाले होते की यापुढे पाकिस्तानी सैन्य कोणत्याही राजकीय गोष्टीत हस्तक्षेप करणार नाही. आताच्या परिस्थितीत पाकिस्तानी सैन्य राजकारणात हस्तक्षेप करणार नाही हे शक्य आहे का?**

देशाच्या राजकारणात पाकिस्तानी सैन्य हस्तक्षेप करणे पूर्णत: बंद करेल अशी अपेक्षा ठेवणे कठीणच आहे. कारण गेल्या ७० वर्षांपासून हेच सुरु आहे. पाकिस्तानी सैन्याने राजकारणातील हस्तक्षेप एकदम बंद केला तर तो राजकारण्यांसाठीही धक्काच ठरणार आहे. पाकिस्तानी सैन्याला राजकारणात हस्तक्षेप करण्यापासून थांबवायचे असेल तर आधी राजकारण्यांना त्यांचे वागणे सुधारावे लागेल.

सध्या पाकिस्तानातील नेते त्यांना काही अडचण आल्यास सरळ पाकिस्तानी सैन्याच्या मुख्यालयाकडे धाव घेतात. त्याऐवजी त्यांनी आपल्या समस्यांची उत्तरं सभागृहात शोधायला हवीत. त्यांनी तसे केले नाही तर मात्र पाकिस्तानी सैन्याला राजकारणात हस्तक्षेप करावा लागेल. त्यामुळे दोन्ही बाजूंची परिस्थिती कठीण आहे.

**जनरल बाजवा लष्करप्रमुख म्हणून ६ वर्षांच्या कार्यकाळात कोणता वारसा मागे ठेऊन गेले आहेत?**

त्यांनी इम्रान खान यांना सत्तेत आणले. आणि त्यांना प्रसिद्धी मिळवून दिली. तर पाकिस्तानी सैन्याने सुरक्षा, परराष्ट्र धोरण, आणि संरक्षण यांची काळजी घेतली. पण बाजवा अयशस्वी ठरले. हे अपयश ते मागे सोडून जात आहेत. दुसरे म्हणजे त्यांच्या कार्यकाळात डागाळलेली पाकिस्तानी लष्कराची प्रतिमा.

ही प्रतिमा सुधारण्यासाठी नव्या लष्करप्रमुखांना खूप कष्ट घ्यावे लागणार आहेत. बाजवा यांच्या कार्यकाळात दहशतवाद उफाळून आला. त्यांनी केलेल्या भ्रष्टाचारामुळे ,कमावलेल्या संपत्तीमुळे पाकिस्तानी लष्कराचे नाव खराब झाले.

नवनियुक्त जनरल मुनीर यांनी सध्या भारतावर लक्ष केंद्रित करण्यापेक्षा देशांतर्गत समस्या सोडवाव्यात. त्यांच्यासमोर (TTP) तहरीक ए तालिबान पाकिस्तान ही समस्या उभी आहे. TTP ने हल्ले करण्यास सुरुवात केली आहे.





# ‘भारत @१००’साठी सप्तसूत्री

**ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या वयाला आज ८० वर्षे पूर्ण होत आहेत. संशोधन आणि बौद्धिक संपदेच्या क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करणारे डॉ. माशेलकर ‘अंजनी माशेलकर फाउंडेशन’च्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रातही कार्यरत आहेत. देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत असताना, स्वातंत्र्याच्या शताब्दीच्या वेळी देश कसा असावा, याबद्दलचा त्यांनी मांडलेला हा विचार. सर्वांगीण विकासाची सप्तसूत्री त्यांनी यामध्ये विशद केली आहे.**

**- डॉ. रघुनाथ माशेलकर**



देशाच्या स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव सध्या सुरू आहे. आपण ‘इंडिया@७५’ साजरा करीत आहोत. त्याच बरोबर आणखी २५ वर्षांनी म्हणजे जेव्हा स्वातंत्र्याला शंभर वर्षे पूर्ण होतील, त्यावेळचा भारत कसा असेल म्हणजे ‘इंडिया @१००’ याचीही चर्चा सुरू झाली आहे. स्वातंत्र्यानंतरच्या कालावधीत काय केले आणि पुढील पाव शतकात काय करणार आहोत, याची चर्चा नक्कीच व्हायला हवी; परंतु हे करताना देशातील वास्तव लक्षात घ्यायला हवे. आपल्याकडील शहरीकरण वाढत असले, तरी बहुतांश लोकसंख्या अजूनही खेड्यांत राहते हे विसरून चालणार नाही. ‘इंडिया’ आणि ‘भारत’ या दोन संज्ञा वेगवेगळ्या अर्थाने वापरणे आपल्याकडे नवीन नाही. त्याचाच आधार घेऊन बोलायचे झाल्यास, असे म्हणता येईल, की ‘इंडिया @ ७५’ची चर्चा ‘भारत @ ७५’शिवाय करता येणार नाही. त्यामुळे भारताबद्दलही बोलायला हवे. तसे केले तरच देशाच्या शताब्दीचा व्यापक विचार करता येई शकेल.

करोना साथरोगाच्या काळातील आपला अनुभव ताजा आहे. संपूर्ण जगावर हे संकट आले असले, तरी भारताला त्याचा मोठा फटका सहन करावा लागला. विशेषतः येथील गरिबांचे जगणे मुश्कील होऊन गेले. करोनामुळे लाखो बांधव दारिद्र्यात लोटले गेले. वंचना, भेदभाव, बेरोजगार, मानवी अडचणी यांत वाढ झाली आहे. देशातील ७० टक्के लोक खेड्यांत राहतात आणि सतरा टक्के लोक झोपडवस्त्यांत राहतात. या सर्वांचा विचार आपल्याला करावाच लागेल. त्यांना विसरून चालणार नाही; त्यांना वगळून देशाची प्रगती होणार नाही; उलट विषमता वाढण्याचा धोका आहे. त्यामुळे आपण ‘भारत @१००’बोलल्याशिवाय ‘इंडिया @ १००’बद्दल कसे बोलू शकतो?

आपल्या स्वप्नातला ‘भारत @१००’ कसा असेल? माझ्यासाठी तो पुढील सात तत्त्वांवर आधारित असायला हवा : संतुलित (बॅलन्स्ड), सुसंस्कृत (कल्चर्ड), सुविद्य (एज्युकेटेड), समृद्ध (फ्ल्युएंट), सुशासित (वेल गव्हर्न्ड), सुरक्षित (सिक्युअर्ड) आणि स्वानंदी (हॅपी).

**- संतुलित भारत** : आपण संतुलित अर्थव्यवस्था, वातावरण, पर्यावरण, समानता आणि नीती असलेल्या भारताचे स्वप्न पाहू शकतो का? अशा भारतात संपूर्ण लिंगसमानता असेल. हे आपले अंतिम स्वप्न का असू नये? वर्गरहित आणि जातरहित भारताचे स्वप्न आपण पाहू शकतो का?

**- सुसंस्कारित भारत** : भारताने आपली समृद्ध संस्कृती, वारसा आणि मूल्ये विशेषतः सर्वसमावेशकता आणि सहिष्णुता यांचे जतन, संवर्धन आणि प्रसार करायला हवा. असा भारत जो आपल्या धर्मासह इतर धर्मांचाही आदर करील. यातील काही मूल्ये अलीकडच्या काळात आपण गमावत असल्याचे पाहून मला दुःख होते.

**- सुविद्य भारत** : या भारतात मूल्याधारित शिक्षण असेल. चांगला माणूस घडविण्यासाठी सर्वांगीण शिक्षण असायला हवे.

**- समृद्ध भारत** : मध्यम उत्पन्नाच्या सापळ्यातून भारताने बाहेर पडावे आणि ४० लाख कोटी डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट गाठावे. त्याच वेळी सर्वसमावेशक प्रगतीचे उद्दिष्टही पूर्ण करायला

हवे, जेणेकरून कोणीही मागे राहता कामा नये.

– **सुशासित भारत** : यामध्ये मतैक्य, कायद्याचे राज्य, पादर्शकता आणि जबाबदारी यांच्या आधारावर शासन चालावे. सर्व लोकशाही मूल्यांचे संरक्षण व्हायला हवे. यात नागरिकांना अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य असावे आणि अभिव्यक्त झाल्यानंतर त्याच्या स्वातंत्र्याबद्दल चिंता वाटायला नको.

– **सुरक्षित भारत** : अंतर्गत आणि बाह्य बाबतीत भारत सुरक्षित असावा. यामध्ये अन्न सुरक्षा, आरोग्य सुरक्षा आणि ऊर्जा सुरक्षा यांचा समावेश होतो. असमानता, अल्पसंख्याकांची उपेक्षा वाढल्याने समाजिक सौहार्द बिघडते आणि समाजात मागे पडलेल्यांची असुरक्षितता वाढते. त्यामुळे सुरक्षित भारताबद्दल सर्वांगीण दृष्टिकोन असायला हवा.

– **स्वानंदी भारत** : या भारतात केवळ मूठभर नव्हे, तर सर्व १४० कोटी नागरिकांच्या चेहऱ्यावर हास्य असावे. अंतर्गत आणि बाह्य शांततेतून हा आनंद यायला हवा.


या प्रत्येक सूत्रांचा विचार केला, तर तुमच्या असे लक्षात येईल की 'भारत @१००' आपण गांधीवादी तत्त्वांशिवाय उभारू शकत नाही. आता संतुलित भारताचे उदाहरण पाहू. गांधीजींचा अस्पृश्यतेविरुद्धचा लढा सर्वज्ञात आहे. त्यातूनच वर्गरहित समाजाचा आपला विचार आला आहे. भारतीय महिलांना समान अधिकार मिळावेत यासाठीचा गांधीजींचा आग्रह ही सर्वज्ञात आहे. त्यातूनच लिंगसमानतेचा विचार महत्त्वाचा ठरतो. प्रत्येकाच्या गरजेनुसार सर्व काही पुरेसे आहे. मात्र, हव्यासासाठी नाही, असे गांधीजी म्हणत. त्यातूनच प्रेरणा घेऊन अर्थव्यवस्था, वातावरण, पर्यावरण, समानता आणि नीती या पाच मुद्द्यांवर समानतेचा मुद्दा यात मांडला आहे.

गांधीवादी मूल्यांचे संवर्धन, प्रसार आणि अवलंब झाला, तरच या सात सूत्रांच्या अंमलबजावणीत यश येईल, असे म्हणता येईल. त्यामुळेच 'भारत @ १००'चे आपले स्वप्न साध्य करण्यासाठीचे प्रयत्न महत्त्वाचे ठरतील. सर्व चांगल्या गोष्टींची पुनरावृत्ती व्हायला हवी. निस्वार्थ सेवा हे गांधीवादी तत्त्व आपल्या स्वप्नातील 'भारत @ १००' साध्य करण्यासाठी आशेचा किरण आहे.

(जमनालाल बजाज स्मृती पुरस्काराच्या वेळी केलेल्या भाषणातील संपादित अंश. अनुवाद : सुरेंद्र डोळ)


# Flames of Freedom

STIRRING LIVES OF 112 REVOLUTIONARIES !




- Swatantrya Veer Savarkar's colleagues in his first Trial and punishment inflicted on them.
- Remembrance Day of nearly 350 Revolutionaries.
- Madanlal Dhingra's Statement before he was hanged.
- Rejoinder to Gandhiji's article titled 'Cult of the Bomb' in 'Young India.'
- Extracts from the works of wellknown Marathi and English writers.
- Information regarding 'Komagatamaru', 'Abhinav Bharat', 'Gadar Movement' Kakori Conspiracy,
- English version of 'Vande Mataram'.
- Original version of 'Vande Mataram'
- Original version of National Anthem 'Jana Gana Mana'.

*A perfect gift for students of English Medium*

PRICE Rs.250/-

Please buy 10 copies or more and get 20% discount
No Postege cost • Please send your cheque to :

**Vande Mataram Foundation**

311, 3rd Floor, Shree Krishna Commercial Centre, Udyog Nagar, S. V. Road, Goregaon (West), Mumbai - 400 104. Tel.: (022) 40129656
Email : info.cmasters@gmail.com | **www.vandemataramfoundation.co.in**

# श्रेष्ठ भारत!



श्री दत्तात्रय होसबाळे

रा. स्व संघाचे सरचिटणीस श्री दत्तात्रय होसबाळे यांनी म्हटले आहे की भारताच्या राजकारणात खूप बदल होत आहेत. यापुढेही होत राहतील. जसं की राजपथाचे नाव बदलून 'कर्तव्य पथ' करण्यात आले. याचाच अर्थ आपला देश घराणेशाहीतून किंवा वसाहतवादाच्या परंपरेतून हळू हळू बाहेर येत आहे.

सरचिटणीसांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा सुद्धा उल्लेख केला. एका व्याख्यान मालेचे उदघाटन करताना ते बोलत होते.

पंतप्रधानाच्या कार्यालयातून येणाऱ्या पत्रांवर आता, हिंदू दिनदर्शिकेप्रमाणे दिनांक दिला जातो. राजपथाला आता कर्तव्य पथ म्हणून संबोधले जाणार असून पंचम जॉर्जच्या पुतळ्याच्या ठिकाणी सुभाषचंद्र बोस यांचा पुतळा बसवला आहे असे होसबाळे यांनी सांगितले.

ही व्याख्यानमाला 'भारतीय विचार संस्थान न्यास' यांच्यातर्फे आयोजित करण्यात आली होती. आणि विषय होता. 'भारत श्रेष्ठ बनाने मे प्रबुद्ध जन की भूमिका'.

श्री होसबाळे यांनी एक आठवण सांगितली. ते म्हणाले की मार्क टूली नावाचा ब्रिटिश पत्रकार म्हणाला होता, भारतातले लोक सध्या ब्रिटिशांनी घालून दिलेल्या शासकीय यंत्रणेप्रमाणे काम करत आहेत. पण लवकरच त्यांनी स्वत:च्या गरजेप्रमाणे एक यंत्रणा बनवण्याची गरज आहे.

भारताला आता जागतिक स्तरावर वाखाणले जात आहे. आणि अमृत काल (येणारी २५ वर्षे) हाच श्रेष्ठ भारत घडवण्याच्या दृष्टीने महत्वाचा आहे.

अंतराळ संशोधन क्षेत्रात भारताने मिळवलेले यश हे जगासाठी एक सर्वोत्तम उदाहरण आहे. जागतिक स्तरावर पाचवा सर्वात मोठा देश म्हणून ओळख मिळाल्यावर जगभरातील अर्थतज्ज्ञ भारताकडे आता एक होऊ घातलेली आर्थिक महासत्ता म्हणून पाहत आहेत, असे होसबाळे म्हणाले.

केंद्रीय अन्वेषण विभागाचे डायरेक्टर ऋषीकुमार शुक्ला यांनीही या व्याख्यानमालेत आपले विचार मांडले. ते म्हणाले 'जी -२० शिखरपरिषदेचे अध्यक्षपद भूषविण्याची संधी भारताला मिळाली आहे. भारतासाठी आपली संस्कृती जगाला दाखवण्याची ही एक चांगली संधी आहे.'

# जगण्याची कारणं (purpose) हरवत चालली आहेत का?

प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्याचं एक ध्येय ठरलेलं असतं. त्याच्या जगण्याची काही कारणं असतात. प्रयोजन असतं. मध्यंतरी सुप्रिया नावाची माझी मैत्रीण 'purpose' या पुस्तकासाठी सहलेखनाचं काम करणार असल्याचं सांगायला माझ्याकडे आली. ती हे अगदी सहजपणे बोलून गेली. पण माझं मन मात्र आजपर्यंत कधीच विचार न केलेल्या विषयाचा विचार करण्यात गुंतलं.

आजकाल जी मंडळी काम करत आहेत, 'नोकऱ्या करत आहेत.' त्यांना आपण हे काम का करतोय हेच माहित नसतं. परिणामी त्यांच्या जगण्याची कारणंच हरवत चालली आहेत. फक्त तरुण आणि शिकलेले लोक याला अपवाद असतील असं मला वाटतं.

एखाद्या व्यक्तीच्या आयुष्याचं ध्येय काय असावं हे पुन्हा व्यक्ती सापेक्ष आहे. कोणाला आर्थिक सुबत्ता हवी असते. म्हणजेच कमी वेळात खूप काही मिळवायचं असतं. त्या व्यक्तींना सतत चर्चेत राहायला आवडतं. तर कोणाला आशिया खंडातील सर्वात श्रीमंत व्यक्ती व्हायचं असतं. कोणाला तरुण वयातच यशस्वी स्टार्टअप सुरु करायचं असतं. तर कोणाला आरोग्य, शिक्षण किंवा इतर क्षेत्रातील होतकरूंना मदत करायची असते. पण बाकीच्या लोकांची आयुष्य मात्र निरुद्देश असतात. समुद्रातील वादळात भरकटलेल्या एखाद्या जहाजासारखी.

आपण फक्त दिवसामागून दिवस वर्षानुवर्षे असेच जगत राहतो. आज काय कोणाचं लग्न झालं. कोणाची कामात बदली झाली. उद्या काय कोणाला कामात बढती मिळाली. आपल्या



आयुष्यात मात्र स्वतःचं असं मोठं ध्येय असणारे खूप कमी लोक असतात. त्याबाबतीत मला पोलीस खात्यातील पोलिसांचा, संरक्षण दलातील सैनिकांचा, सीमेवर सुरक्षा करणाऱ्या जवानांचा नेहमीच हेवा वाटत आला आहे. जेन गुडॉल नावाच्या लेखिका म्हणतात ''आपल्या आयुष्यात जर सर्वात वाईट गोष्ट कोणती असेल तर ती म्हणजे ध्येयवादी नसणं.''

६० वर्षांच्या माझ्या कामाच्या अनुभवानंतर मी आयुष्यातील ध्येयांविषयी विचार करण्यास सुरुवात केली आहे.

पहिला मुद्दा म्हणजे दुर्लक्ष. लोक एकच गोष्ट वर्षांनुवर्षे करत राहतात. पण त्यांना माहितीच नसतं की आपण ती गोष्ट का करतोय. रेल्वे मध्ये काम करणाऱ्या एका व्यक्तीचा अनुभव मी वाचला. रेल्वे च्या कारखान्यातून तो ४० वर्षांच्या सेवेनंतर निवृत्त होत होता. त्याच्या निरोपसमारंभाच्या वेळी व्यवस्थापकांनी त्याला विचारले. ४० वर्ष तुम्ही काम केलंत. पण काम करण्याचा आनंद



तुम्हाला मिळाला का ? अर्थातच त्याने होकारार्थी उत्तर दिलं.

त्याचं काम काय होतं तर यार्डात उभ्या असलेल्या गाडीच्या चाकांवरती हातोडीने ठोकून बघणे. दिवसभर तो हेच काम करायचा. आणि तेच करण्यात त्याला आनंद वाटायचा. त्याला हे तरी माहित होतं का की चाकावर हातोडी मारून आलेल्या आवाजावरून ते चाक बदलावं लागणार आहे की नाही याचा निर्णय घ्यायचा असतो. तर नाही. म्हणजेच ४० वर्ष त्या गाडीतून प्रवास करणारे प्रवासी भाग्यवान म्हणायला हवे. की ४० वर्षात गाडीचा एकही अपघात झाला नाही. ४० वर्षात त्याच्यावर कधी दुरुस्ती करण्याची वेळच आली नाही. त्याला हातोडीने मारल्यावर येणारा चाकांचा आवाज माहितीच नव्हता. कारण त्याला तसे प्रशिक्षण दिले गेले नव्हते. ४० वर्षात दिवसातून २० वेळा तरी त्याने चाकांवर हातोडी मारली असेल पण काय उपयोग? थोडक्यात अज्ञानात आनंद असा प्रकार झाला.

**दुसरं कारण म्हणजे भिती.**

लुवी अजायी नावाचे लेखक म्हणतात. ''भिती आपल्याला आपल्या ध्येयांपर्यंत पोहचू देत नाही''. बरेच लोक ध्येय निश्चित करायला, त्याप्रमाणे योजना आखायला आणि पुढे जायला घाबरतात. त्यांना त्यांच्या comfort zone मध्ये राहायला आवडते. त्यांना अपरिचित क्षेत्रात पाऊल ठेवायचे नसते. माझ्याच एका नातेवाईकाने ३५ वर्ष एकाच फॉरेन कंपनीत जुनियर अकॉउंटन्ट म्हणून काम केले. आणि ३५ व्या वर्षी तो सिनियर अकॉउंटन्ट म्हणून निवृत्त झाला. तेच काम, थोडासा वाढलेला पगार. पण तो त्याच्या comfort zone मध्ये आनंदी होता. त्याच्या आयुष्यात कुठलंच ध्येय नव्हतं.

**तिसरं कारण म्हणजे कमकुवत पाया.**

नीतिमूल्य जपणारा आयुष्याचा पाया घडवला गेला नाही. जर मुलांना चांगल्या सवयी लावल्या नाहीत, उत्तम संस्कार केले नाहीत, स्वार्थ आणि निस्वार्थी भावना यातील फरक ओळखायला शिकवले नाही तर मुलांसमोर कोणताही आदर्श असणार नाही. परिणामी ध्येयही असणार नाही.

ज्ञानी माणसाचे लक्षण काय आहे? तर डोक्याने विचार करणे आणि मनापासून समजून घेणे.- जेन गुडॉल.

भारताच्या राजकारणाची सध्याची स्थिती पाहता अजून खूप लांब जायचं आहे असच म्हणावं लागेल. २०२२ साली बुडीत कर्जखात्यांची संख्या २ लाख कोटींपर्यंत पोहोचणे हे वाईट आहे. भारताचे माजी राष्ट्रपती जेव्हा राष्ट्रपती पदावर असताना घेतलेल्या आपल्याच चुकीच्या निर्णयाचे समर्थन करतात. तेव्हा ध्येयवादी असण्याविषयी प्रश्नच पडतो.

**चौथे कारण म्हणजे बदलण्याची क्षमता.**

आपले आयुष्य हे कधीच साधे सरळ नसते. ते कायम खाचखळग्यांनी भरलेले असते. आपल्या ध्येयापर्यंत पोचायला जर अडचणी येत असतील तर काळानुसार आपण आपल्या दृष्टीकोनात, ध्येयापर्यंत पोचायच्या मार्गात बदल करायला हवा. कधी बदल पटकन होईल, तर कधी हळू हळू होईल. आपल्याला दोन्ही परिस्थितीत समतोल साधता यायला हवा. कॉर्पोरेट एगजीक्यूटिव्ह पासून सरळ स्टार्टअप सुरु करण्यापर्यंत येणे हा केवढा मोठा बदल आहे.

आयुष्याचे ध्येय शोधताना या ४ गोष्टी जमल्या, स्वत:च्या मनाशी संवाद साधता आला. नवीन दृष्टिकोन मिळाला, आपण कुठे चाललो आहोत, कशासाठी याची उत्तरं मिळाली तर ध्येयापर्यंतचा तुमचा प्रवास आनंददायी होईल. वाटेत तुम्हाला असेही लोक भेटतील जे तुमच्यापेक्षा हुशार असतील. तेव्हा स्वत:ला कमी लेखू नका. आपल्या देशासाठी प्राण देणाऱ्या क्रातिकारकांचे आदर्श डोळ्यासमोर असू द्या. महात्मा गांधी, सरदार पटेल इत्यादी.

मदर तेरेसा, बाबा आमटे आणि त्यांच्या कुटुंबातील २ पिढयांनी कुष्ठरोग्यांची सेवा करण्यात आयुष्य खर्ची घातले. काही असेही लोक आहेत ज्यांच्याबद्दल अजून कोणाला फारसे माहित नाही. जसे डॉ रवी आणि अंकुली. ख्रिश्चन मेडिकल कॉलेज वेल्लोर येथून शिक्षण घेऊन लग्न केल्यानंतर दोघांनी आदिवासींच्या सेवेसाठी आयुष्य घालवले. जमशेदजी टाटा, अझीम प्रेमजी यांच्यासारखे उद्योजक व्यवसाय पण करतात आणि आपल्या नफ्यातील काही हिस्सा समाजोपयोगी कामाला देतात.

हे सगळे खरोखरच आपल्या देशाचा मजबूत पाया आहेत. कारण समाजात बदल घडवून आणण्याची क्षमता त्यांच्यात आहे.

श्री वाल्टर व्हिएरा हे Institute of management consultant of india चे सभासद आहेत. Corporate executive म्हणून त्यांनी १४ वर्षे काम केले आहे. १९७५ साली भारतात त्यांनी Marketing consulting ची सुरुवात केली. सल्लागार म्हणून त्यांनी ४ खंडात कामे केली आहेत. ४५ देशांच्या समूहाचे ते पहिले आशियायी अध्यक्ष आहेत. त्यांनी १६ पुस्तके लिहिली आहेत. तसेच व्यवसाय या विषयावर ते विविध वृत्तपत्रातून स्तंभलेखन करतात. अमेरिका, आशिया आणि युरोप खंडात गेली ४० वर्षे Visiting professor म्हणून जातात. त्यांनी लिहिलेली पुस्तके Marketing in Digital data सहलेखक ब्रियन अल्मेडा, Customer value starvation kills सहलेखक श्री गौतम महाजन. आता ते एका NGO चे काम बघतात. Consumer education and research society of india चे ते अध्यक्ष आहेत.




# 'ट्रायल बाय फायर'

**अर्थात उपहार मधील अग्नितांडव.**
**(एक अस्वस्थ करणारं पुस्तक आणि वेब सिरीज)**

**- राजीव जतकर**

१३ जानेवारी २०२३ ला नेटफ्लिक्स वर प्रदर्शित होणारी 'ट्रायल बाय फायर' ही वेबसिरीज, याच महिनात माझ्या वाचनात आलेलं 'ट्रायल बाय फायर' हे सुन्न करणारं पुस्तक आणि याच महिन्यात म्हणजे ११ ते १७ जानेवारीला महाराष्ट्र शासनाच्या ऊर्जा विभागतर्फे साजरा होणारा विद्युत सुरक्षा सप्ताह हा एक विलक्षण योगायोगच म्हणावा लागेल. १३ जून १९९७ मध्ये म्हणजे २६ वर्षांपूर्वी दक्षिण दिल्ली मधील उपहार नावाच्या सिनेमागृहाच्या तळघरात असलेल्या दिल्ली विद्युत बोर्डाच्या (DVB) ट्रान्सफॉर्मरने अचानक पेट घेतला आणि भीषण अग्नी तांडव झालं. अनेक लोक मृत्युमुखी पडले आणि शेकडो जखमी झाले. भारतातल्या सर्वात भीषण अग्निकांडापैकी ही एक घटना मानली जाते. या घटनेची दाहकता प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचावी म्हणून 'ट्रायल बाय फायर' हे नीलिमा आणि शेखर कृष्णमुर्ती लिखित इंग्रजी भाषेतील पुस्तक 'पेंग्विन बुक्स इंडिया प्रा. लि.' या प्रकाशन संस्थेनं २०१६ मध्ये प्रसिद्ध केलं. २०१९ मध्ये ह्या पुस्तकाची हिंदी आवृत्ती देखील प्रकाशित झाली. बांधकाम आणि विद्युत क्षेत्रात काम करणाऱ्या माझ्यासारख्या अनेकांना ह्या दुर्दैवी घटनेची थोडीफार माहिती असतेच. तथापि ह्या भीषण घटनेची तपशीलवर माहिती नसण्याची दाट शक्यता आहे. ह्या दुर्दैवी घटनेदरम्यान नेमकं काय घडलं? हे सर्वसामान्यांना माहिती व्हावं या साठी हे पुस्तक आणि नेटफ्लिक्स वरील वेब सिरीज अतिशय महत्वाची ठरते.

१३ जून १९९७ हा दिल्ली शहरातील एक सर्वसामान्य दिवस! नेहेमीप्रमाणेच धुक्याची जाड चादर हळू हळू बाजूला सारत दिल्ली जागी होत होती. सर्वसामान्य लोकांप्रमाणे नीलिमा आणि शेखर कृष्णमूर्ती या सुखी कुटुंबाचा दिवस देखील सुरु झाला. कृष्णमूर्ती दाम्पत्याची १७ वर्षाची मोठी मुलगी 'उन्नति' कॉम्पुटर वर काहीतरी करत बसलेली आणि १३ वर्षांचा धाकटा मुलगा 'उज्वल' वडिलांबरोबर टीव्ही गेम्स खेळत बसला होता. नीलिमा नेहेमीप्रमाणेच स्वैपाकघरात व्यस्त! अचानक निलीमाला आठवण झाली की आज आपण मुलांना सिनेमा दाखवायचं कबूल केलंय. उन्नतीला सिनेमा बघायची अतिशय आवड होती. मग नीलमने सकाळच्या गडबडीतच दक्षिण दिल्लीतील उपहार चित्रपटगृहामध्ये फोन करून आजच सुरु झालेल्या 'बॉर्डर' या चित्रपटाची दोन तिकिटे काढली. दुपारचा ३ ते ६ चा फर्स्ट डे-फर्स्ट शो पाहण्याची मजा काही औरच असते ना? उज्वल आणि उन्नती जाम खुश होते. १९७१ च्या भारत पाकिस्तान युद्धाच्या पार्श्वभूमीवरील आणि सनी देओल आणि इतरही अनेक प्रतिथयश अभिनेत्यांचा 'बॉर्डर' हा सिनेमा बघायची दोन्ही मुलांना कमालीची उत्सुकता होती.

त्या दिवशी नीलम यांच्या पतीने म्हणजे शेखरने जेवणासाठी चिकन करी बनवलेली होती. सर्व कुटुंबाने एकत्रपणे खेळीमेळीत दुपारचे जेवण घेतलं. मुले एकमेकांच्या खोड्या काढत जेवत होती. जेवणानंतर सिनेमाला घरातून बाहेर पडताना उन्नतीने उज्वलला त्याचा अस्थम्याचा इन्हेलर बरोबर घेण्याची आठवण केली. मुलं घराबाहेर पडली. नीलिमा सांगतात ' मुलांना मी त्यावेळी शेवटचं पाहिलं...

**अग्नितांडव**

दुपारी तीन वाजता बॉर्डर सिनेमाचा पहिला शो सुरु झाला. उज्वल आणि उन्नती यांची तिकिटे वरच्या मजल्यावरील बाल्कनी मधे होती. सर्वजण चित्रपटात रंगून गेले. सुमारे ५ वाजता मध्यंतरानंतर सिनेमा हॉल मध्ये धूर येऊ लागला. प्रेक्षक अस्वस्थ होऊ लागले. त्यांचा श्वास घुसमटू लागला. मुख्य हॉल मध्ये आग पोहोचली. मग एकीकडे आगीचे चटके, ज्वाळा आणि दुसरीकडे वाढत जाणारा धूर यामुळे मात्र लोकांचा धीर सुटला. त्यातच हॉल मधली वीज गेली. कुणालाच काय होतंय ते कळेना. पॅनिक होऊन लोक सैरावैरा पळू लागले. चेंगराचेंगरी झाली. लोक खिडक्यांची तावदाने फोडून खाली उड्या मारू लागले. बऱ्याच वेळाने अग्निशामक दलाला कुणीतरी फोन केला, पण त्यावेळी दिल्लीच्या ग्रीनपार्क भागात ट्राफिक जाम होता. त्यामुळे मदत पोहोचायला उशीर झाला. त्यामुळे मृतांची आणि जखमींची संख्या वाढली. या दुर्घटनेत तब्बल ५९ लोकांचा मृत्यू झाला, त्यात २३ लहान मुले होती. त्यात एक महिन्याचं एक बाळ देखील होतं. शेकडो लोक जखमी झाले. या अग्नितांडवात उन्नती आणि उज्वल यांचा देखील धुरात गुदमरल्यामुळे मृत्यू झाला. उज्वल ला त्याच्या जवळ असलेल्या इन्हेलरचा काहीही उपयोग झाला नाही...

**का आणि कशी घडली ही घटना?**

त्या दिवशी सकाळी सहा वाजता या इमारतीच्या तळघरात असलेल्या दिल्ली विद्युत बोर्डाच्या (DVB) ट्रान्सफॉर्मर मध्ये काहीतरी बिघाडामुळे ठिणग्या उडून छोटीशी आग लागली होती. देखरेख करणाऱ्या वायरमन, फोरमन मंडळींनी सदर आग तात्पुरती डागडुजी,

दुरुस्ती करून विझवली होती अशी देखील माहिती नंतरच्या तपासात पुढे आली आहे. त्या दिवशी ३ वाजून ५५ मिनिटांपासून ५ वाजेपर्यंत दिल्ली विद्युत बोर्डाने लोड शेडींग जाहीर केले होते. त्यानुसार ते सुरु झाले. चित्रपटाच्या मध्यंतरानंतर म्हणजे ४ वाजून ५५ मिनिटांनी वीज पुन्हा सुरु झाली आणि नेमके त्याच वेळी या तळघरातील ट्रान्सफॉर्मर मध्ये स्पार्किंग सुरु झाले. असे स्पार्किंग केबलच्या कंडक्टर मधील लूज कनेक्शन मुळे झालेले असण्याची खूप दाट शक्यता असते. हा लूज असलेला कंडक्टर ट्रान्सफॉर्मर मधून बाहेर निघून आला आणि त्यातून बाहेर पडणाऱ्या ठिणग्यांमुळे ट्रान्सफॉर्मर मध्ये स्फोट झाला. ट्रान्सफॉर्मर मधील ऑइल तळघरात आजूबाजूला उडाले आणि तळघरात चुकीच्या आणि नियमबाह्य पद्धतीने उभ्या केलेल्या गाड्यांनी पेट घेतला. तळघरात अग्नितांडव सुरु झाले. या आगीतून प्रचंड धुराचे आणि आगीचे लोळ जिन्या वाटे, एअर कंडिशनरच्या डक्ट मधून वरच असलेल्या सिनेमा हॉल मध्ये शिरू लागले.

सिनेमा हॉल मधील बाल्कनीच्या खालच्या भागातले प्रेक्षक सुदैवाने दरवाजे उघडून कसेबसे बाहेर पडू शकले, पण बाल्कनी मधील प्रेक्षक दुर्दैवी ठरले, कारण बाहेर पडण्यासाठी असणारे सर्व दरवाजे बाहेरून बंद (लॉक) करण्यात आले होते. त्यामुळे बाल्कनी मधील प्रेक्षक बाहेर पडू शकले नाहीत. धुराने श्वास गुदमरून अनेक मृत्यू झाले. चेंगराचेंगरी झाली. बाल्कनी मधील दरवाज्याजवळ नियमबाह्य पद्धतीने सुमारे ५२ अतिरिक्त खुर्च्या लावण्यात आल्या होत्या. व्ही.आय.पी. प्रेक्षकांसाठी स्वतंत्र प्रायव्हेट बॉक्स बसवण्यात आलेले होते. त्यामुळे एक्झिट दरवाजांचे मार्ग निमुळते झाले होते. त्यामुळे गोंधळात भर पडली. बाल्कनीत प्रेक्षक पूर्णपणे अडकले होते. एकच गोंधळ उडाला.

**निष्काळजीपणाचे परिणाम**

ह्या उपहार चित्रपटगृहाच्या मॅनेजरला ह्या आगीची माहिती समजली तेंव्हा आग आटोक्यात आणण्याऐवजी तो ह्या सिनेमाचा जमा झालेला गल्ला घेऊन कुठेतरी निघून गेला. त्याने आगीची माहिती अग्निशमन दलाला कळवलीच नाही. त्यामुळे सुमारे ५ वाजता लागलेल्या आगीची माहिती अग्निशमनदलाला जवळजवळ ५ वाजून २५ मिनिटांनी म्हणजे २५ मिनिटे उशिरा मिळाली. त्यातच अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचताना त्यांना ट्राफिक जाम चा सामना करावा लागला. त्यामुळे देखील मृतांची आणि जखमींची संख्या वाढली. सुरक्षेच्या नियमानुसार या चित्रपटगृहाच्या इमारतीमधील बसवण्यात आलेली अग्निशमन यंत्रणा देखभाली अभावी पूर्णपणे निकामी झालेली होती. फायर एस्टिंग्विशर्स अस्तित्वातच नव्हते. या संपूर्ण इमारती मध्ये कुठल्याही प्रकारचे आपत्कालीन दिवे लावलेले नव्हते. त्यामुळे अंधारातून मार्ग काढताना गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली.

ह्या भयंकर अग्नितांडवाची माहिती नीलम आणि शेखर यांना त्यांच्या मुलीच्या मित्राने विशालने दिली. नीलम आणि शेखर घटनास्थळी अक्षरश: धावले. तिथल्या गर्दीत ते मुलांना शोधत राहिले. बऱ्याच वेळाने जखमींना हलवण्यात आलेल्या एम्स रुग्णालयात त्यानी धाव घेतली. तिथे मृतांच्या गर्दीत स्ट्रेचरवर उन्नतीचे आणि उज्वलचे कलेवर त्यांना दिसले आणि त्यांच्या डोळ्यासमोर अंधारच पसरला. आईवडिलांना आपल्या मुलांचा मृत्यू पाहण्यासारखं मोठं दु:ख ते काय असू शकतं ? आता मुले या जगात नाहीत, आता जगायचं तरी कशाला? आता कुणासाठी जगायचं? नीलम आणि शेखरच्या दु:खाला पारावार उरला नाही. त्याही परिस्थितीत उन्नतीच्या मृत शरीरावरुन हात फिरवताना दु:खावेगाने रडणाऱ्या नीलमच्या लक्षात आले की उन्नतीच्या गळ्यातले नेकलेस आणि कानातले कुणीतरी ओरबाडून नेले होते. विकृत मनुष्यस्वभावाची नीलम यांना किळस आली. नीलमच्या मनातील दु:खाची जागा क्रोधात रूपांतरित होत होती.

**कायदेशीर लढाई**

मुलांच्या अशा भयंकर मृत्यूनंतर नीलम आणि शेखर हे दांपत्य दु:खाने पार कोलमडून गेले. मात्र थोडे सावरल्यावर नीलम कृष्णमूर्ती यांच्या मनात अनेक शंका फेर धरून नाचू लागल्या. या आगीची जास्त झळ फक्त बाल्कनीतील प्रेक्षकांनाच का बसली? दुर्घटनेला कारणीभूत असलेल्या ट्रान्सफॉर्मरची देखभाल का झाली नव्हती? देखभालीची जबाबदारी कोणाची? इमारतीतील सर्व सुरक्षा साधने जागेवर का नव्हती? याला जबाबदार कोण? अग्निशमन दल घटनास्थळी उशिरा का आले? अशा एक ना अनेक शंका नीलम यांना सतावू लागल्या. त्यांची खात्री पटली की ही घटना म्हणजे एक मानवनिर्मित घटना आहे. मोडलेले नियम आणि प्रशासनाच्या गलथान कारभाराचा हा परिपाक आहे. जशी जशी जास्त माहिती मिळू लागली तस तसे नीलम यांना उपहार इमारतीच्या मालकांचा राग येऊ लागला. 'आपल्या मुलांसाठी आपण कायदेशीर लढा द्यायलाच हवा' असा निश्चय या धाडसी दाम्पत्याने केला.

उपहार अग्नितांडवाची चौकशी सुरु झाली. **२२ जुलै १९९७** रोजी पोलिसांनी उपहारचा मालक सुशील आणि गोपाळ अंसल यांना मुंबईतून अटक केली. त्यानंतर दोनच दिवसांनी म्हणजे **२४ जुलैला** दिल्ली पोलिसांनी हे गंभीर प्रकरण सी.बी.आय. कडे सुपूर्त केलं. इकडे दोषींना जास्तीत जास्त शिक्षा व्हावी म्हणून नीलम आणि शेखर कृष्णमूर्ती यांनी पुढाकार घेऊन **A.V.U.T.** म्हणजेच **'असोसिएशन ऑफ व्हिक्टिम्स ऑफ उपहार ट्रॅजिडी'** नावाची संस्था काढली. या आगीत मृत्यू पावलेल्या व्यक्तींचे नातेवाईक या संस्थेचे सदस्य झाले. सगळे शोकाकुल नातेवाईक आता एकत्रितपणे न्यायालयीन लढा देऊ लागले. या लढ्यात नीलम कृष्णमूर्ती यांचा महत्वाचा भाग होता. नीलम यांनी लढा सुरु झाल्यावर आता गुन्हेगारी कायदा, सुरक्षा यंत्रणांचे नियम, कोर्टाच्या कामांच्या पद्धती आणि त्यातील कामांचे बारकावे वगैरे गोष्टींचा



अभ्यास सुरु केला. सी.बी.आय. नं सुशील आणि गोपाळ अंसल या भावांसमवेत १६ जणांवर (यात चित्रपटगृहाच्या सुरक्षेचे नियम धाब्यावर बसवणारे कर्मचारी, अश्या असुरक्षित इमारतीला परवानग्या देणारे भ्रष्टाचारी सुरक्षा निरीक्षक, दिल्ली विद्युत बोर्डाचे (DVB) चे अधिकारी, कर्मचारी यांचा समावेश होता.) आरोपपत्र दाखल केलं. **२० नोव्हेंबर २००७** मध्ये कोर्टाने अंसल बंधूंसह १२ आरोपींना दोषी ठरवून दोन वर्षांची शिक्षा सुनावली.

पण इमारतीचे मालक सुशील आणि गोपाळ अंसल ही राजकीय वर्तुळात उठबस असलेली मोठी मात्तब्बर मंडळी. दिल्ली विद्युत बोर्डाच्या अधिकाऱ्यांना देखील 'ट्रान्सफॉर्मर च्या देखरेखीत निष्काळजीपणा' दाखावल्याबद्दल आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले गेले. पण ही मंडळी छोट्या छोट्या शिक्षा भोगून बाहेर आली. AVUT संस्थेनं म्हणजेच पीडितांच्या संघटनेनं हायकोर्टाच्या या निर्णयाला सुप्रीम कोर्टात आव्हान दिले. या आव्हानानंतर २०१५ मध्ये अंसल बंधूंना प्रत्येकी ३० कोटींचा दंड ठोकून सोडून दिलं. यावर सीबीआय ने केलेल्या पुनर्विचार याचिकेवर अंसल बंधूंना पुन्हा १ वर्षाची शिक्षा झाली. ७५ वर्षांच्या सुशील अंसल त्यांच्या जास्त वयामुळे सोडून देण्यात आलं. या कोर्टाच्या निर्णयावर नीलिमा कृष्णमूर्ती यांनी निराशा व्यक्त केली. निकाल ऐकल्यावर त्या म्हणाल्या 'कोर्टाच्या या निकालानंतर मी माझ्या हातातली कागदपत्रे फेकली आणि कोर्टाच्या बाहेर येऊन पहिल्यांदाच खूप रडले'. त्या दिवसाची आठवण सांगताना त्या खूप भावुक झाल्या होत्या. कृष्णमूर्ती दांपत्याचा हा न्यायालयीन लढा तब्बल २१ वर्षे चालला.

अर्थात निराश न होता त्यांनी 'सुशील अंसल यांनी किमान त्यांना सुनावलेली शिक्षा भोगून पूर्ण करावी' याकरिता सुप्रीम कोर्टात अजून एक अपील केलं आहे. कोर्ट त्यांच्या या अपिलावर कधी सुनावणी घेईल याची त्यांना कल्पना नाही....

**वेब सिरीज : भयानक अनुभव.**

आत्ता नुकतीच म्हणजे १३ जानेवारी २०२३ रोजी 'ट्रायल बाय फायर' या नीलिमा आणि शेखर कृष्णमूर्ती लिखित पुस्तकावर आधारित वेब सिरीज नेटफ्लिक्स वर प्रदर्शित झाली आहे. दिग्दर्शक प्रशांत नायर, रणजित झा आणि अवनी देशपांडे यांनी अतिशय प्रभावीपणे या वेब सिरींजची मांडणी केली आहे. 'राजश्री देशपांडे' यांनी नीलिमा कृष्णमूर्ती यांची भूमिका कमालीची सुंदर वठवली आहे. शेखर कृष्णमूर्ती यांच्या भूमिकेत 'अभय देओल' प्रभावी कामगिरी करतो. काहीसा मागे पडलेला असा हा उत्तम अभिनेता आहे. 'आशिष विद्यार्थी', 'रत्ना पाठक', 'अनुपम खेर', 'शिल्पा शुक्ल', 'राजेश तेलंग', 'सिद्धार्थ भारद्वाज' अश्या मान्यवर, प्रतिथयश, अनुभवी अभिनेत्यांमुळे ही वेब सिरीज एका वेगळ्याच उंचीवर जाते.

वेब सिरीज बघताना हे उपहार अग्निकांड कसे चित्रित केले असेल याची मला उत्सुकता होती. ती अंगाचा थरकाप उडवणारी आगीची घटना वेब सिरीजच्या शेवटच्या ७ व्या भागात येते. त्यानंतर सिरिज संपून घटनेचा इम्पॅक्ट आपल्या मनाचा ताबा घेतो आणि तो बरेच दिवस राहतो. मन सुन्न होते. कृष्णमूर्ती दांपत्यांचं पुस्तक या दुर्दैवी घटनांच्या बारीक बारीक तपशिलांनी भरलेलं आहे. मात्र वेब सिरिजला वेळेचं बंधन असल्याने वेब सिरीज मध्ये घटनेतील बारकावे नाहीत, मात्र आवश्यक ती नाट्यमयता जरूर आहे. ही नाट्यमयता या माध्यमाची गरज असते, त्यामुळे या घटनेला समांतर घडणाऱ्या, पण काही प्रत्यक्षात न घडलेल्या अशा छोट्या छोट्या घटना, घडामोडी घडतात. पण त्यामुळे या वेब सिरिजचं महत्व कमी होत नाही. थोडक्यात दोन्हीही माध्यमातून समोर आलेली ही दुर्दैवी घटना (पुस्तक आणि वेब सिरिज) पाहून प्रेक्षक आणि वाचक अंतर्मुख होतो. प्रत्येकाने ट्रायल बाय फायर हे पुस्तक आणि वेब सिरिज या दोन्ही माध्यमातून ही अग्नितांडवाची घटना समजावून घेतली पाहिजे, अनुभवली पाहिजे.

-दिल्लीतलं उपहार सिनेमागृह अजूनही मोडकळीस आलेल्या अवस्थेत उभं आहे. २६ वर्षांपूर्वी झालेल्या अग्नितांडवाच्या खुणा आजही ह्या वास्तूवर दिसतात. नीलिमा यांच्या शेवटच्या याचिकेवर कोर्टाचा निर्णय लागल्याशिवाय ते पाडताही येत नाही.

-सुरक्षेच्या नियमांप्रती शासकीय यंत्रणा आणि नागरिकांमध्ये असलेली प्रचंड उदासीनता, समाजात खोलवर झिरपलेली भ्रष्टाचाराची कीड, माणसांमध्ये पैसे मिळवण्याचा वाढलेला हावरटपणा, कासवाच्या गतीनं काम करणारी न्यायव्यवस्था अशा गोष्टींची भेदक जाणीव वाचकांना आणि प्रेक्षकांना या निमित्ताने होत राहते.

-अजून एक महत्वाचे... भारतातल्या अनेक मोठ्या शहरातील इमारतीच्या तळघरातील ट्रान्सफॉर्मर्स देखरेखीविना अजूनही चालू आहेत. स्वत:चा स्फोट होण्याची ते वाट पाहत आहेत...

### मायक्रोबायोम (मित्रसूक्ष्मजीव) उपचार पद्धती

# रोगांशी लढण्यासाठीची नवी उपचार पद्धती



**- डॉ अशोक कुमार**
अध्यक्ष, चीफ रिसर्च अँड डेव्हलपमेंट, इप्का लॅबॉरेटरीज.

**(अनुवाद - श्री नारायण वाडदेकर)**

मायक्रोबायोम उपचार पद्धती ही रोगांवर उपचार करण्यासाठी एक उत्कृष्ट उपचार पद्धती आहे पण मानवी रुग्णांना या पद्धतीने उपचार देण्यापूर्वी या पद्धतीवर आणखी संशोधन होणे गरजेचे आहे. कोणत्याही व्यक्तीला आपण सहानुभूती दाखवली किंवा निस्वार्थी मनाने मदत केली तर त्या व्यक्तीला बरे वाटते. समोरच्या व्यक्तीबद्दल आपुलकीची भावना निर्माण होते. मनातून होणाऱ्या या सुखद भावनेचं शब्दांत वर्णन करणं कठीण असते.

लोकांना रोज योगासने किंवा व्यायाम केल्याने थोडावेळ तरी ताजेतवाने वाटते. हे ताजेतवाने वाटणे सुरुवातीला शरीरातील एन्डॉर्फिन या संप्रेरकाशी संबंधित आहे असे वाटले होते. पण संशोधनातून आता असे उघड होत आहे की एनन्डामाइड (आनंदामाइड) सारख्या आपल्या शरीरात तयार होणाऱ्या छोट्या मेदाम्लअमाइड साखळ्यांनी बनलेल्या एन्डोकॅनॉबिनॉइड्सचा या प्रसन्न वाटण्याशी काहीतरी संबंध असावा. आपल्या शरीरातील मेदाम्ले (Fatty acids) आणि पेशीपटलांवरील कॅनॉबिनॉइड संवेदी ग्राहकरेणू (रिसेप्टर्स) एकमेकांत पृष्ठभाग अडकू शकतील असे परस्पर-पूरक आकाराचे असतात. गांजात सापडणाऱ्या टीएचसी (Tetrahydrocannabinol) आणि सीबीडी सारख्या संयुगांनी ते संवेदी ग्राहक रेणू प्रेरित आणि कार्यान्वित केले जातात. वैज्ञानिक , विवेकनिष्ठ पद्धतीने अभ्यास करून मित्रसूक्ष्मजीवांनी निर्मिलेल्या रसायनांचा परिणाम जाणून मगच रोगावर उपचार केलेले बरे - असा दृष्टिकोन सायकोएन्डोक्रायनॉलॉजी (१२६. १०५१७३ - २०२१) या जर्नलमध्ये पुढे आणण्यात आला.

२०२१ याच वर्षात 'गट मायक्रोबिया' जर्नलमध्ये (१९९७५५९, २०२१) प्रकाशित झालेल्या आणखी एका शोधनिबंधात एक विशेष मुद्दा मांडला होता. तो म्हणजे व्यायाम केल्यामुळे अन्नमार्गातील सूक्ष्मजीव समुदायात लक्षणीय बदल दिसतात. सूक्ष्मजीवांनी स्रवलेल्या क्षोभकारक (pro-inflammatory) द्रव्यांचे प्रमाण कमी होते आणि क्षोभशामक द्रव्यांचे प्रमाण वाढते. कॉलिन्सेला ही सूक्ष्मजीवांची प्रजाती क्षोभकारक द्रव्ये निर्माण करते. एन्डोकॅनॉबिनॉइड्सचे वाढलेले प्रमाण आणि क्षोभकारकांच्या प्रमाणातील घट तसेच क्षोभशामकांच्या प्रमाणातील वाढ यांचा संबंध असावा असे दिसते. क्षोभ शमणे ही क्रिया कर्करोग, हृदयरोग होऊ नयेत किंवा झाल्यास त्यांची तीव्रता कमी ठेवण्यास उपयोगी ठरते. 'एनन्डामाइड' किंवा 'आनंदामाईड' हा शब्द कोठून आला. 'आनंद' हा संस्कृत शब्द आहे. तो आपल्या सर्वांना परिचित आहे. आनंदा शब्दावरून आनंदामाईड हे नाव ठेवण्यात आले. आनंद म्हणजे हर्ष.

**सजीवांच्या आतड्यातील सूक्ष्मजीवसमुदाय -**

मानवी शरीरातील मोठ्या आतड्याचे सीकम, कोलन आणि रेक्टम असे तीन भाग असतात. त्यातील कोलन (Colon) हा भाग सर्वात लांब भाग असतो. त्याच्या आतील मुलायम शोषक अस्तराच्या पृष्ठभागाचे क्षेत्रफळ अंदाजे २२ चौ. फूट (म्हणजे २ चौ.मीटर) असते. कोलनमध्ये माणसाच्या शरीरात असणारी एकूण सूक्ष्मजीव समुदायातील सुमारे ९५% सूक्ष्मजीववस्ती आढळते.

माणसाच्या शरीरात मुख्यत: मोठ्या आतड्यात साधारणपणे १००,०००,०००,०००,०००,००० एवढ्या प्रचंड संख्येने सूक्ष्मजीव असतात. एका प्रौढ माणसाच्या शरीरातल्या सूक्ष्मजीव समुदायातील पेशींचे वजन सुमारे २०० ग्रॅम भरते. तसेच मानवी शरीरात अंदाजे ४००० प्रकारचे सूक्ष्मजीव म्हणजे - विषाणू, जीवाणू, बुरशी अशा प्रकारच्या पेशी असतात. यातील एकेका प्रकारच्या पेशींची संख्या, वर दाखवल्याप्रमाणे अब्जावधी असते.

HOTEL CITY POINT

Synonym for all Conveniences

# happy diwali

Perfect place with Perfect Arrangements for
engagements / birthday parties for 100 - 250 guests
Conference & Banquet Halls

**There is nothing like it, if the place provides for holding Corporate conference or Social get togethers ...**



Theme Parties

**Located in center of the City**

**8 Kms. from Domestic Airport**

**11 Kms. from International Airport**

**Choice of 3 magnificent A/c Halls**

**Designed for corporate Events or Social get togethers**



Engagement Ceremony


Corporate Events


**Suitably decorated or arranged to provide you with perfect setting for any events**

**Food and Service to satisfy any guest**

Dadar T.T. Circle, Mumbai - 40001 Mob: 9820926275
Email : info@hotelcitypoint.com or on-line reservations www.hotelcitypoint.com

निरनिराळ्या प्रकारचे विषाणू,जीवाणू, कवकांचे म्हणजे बुरशीचे प्रकार असतात. आपल्याला अन्नमार्गातील जीवाणूंबद्दल थोडीफार माहिती असते, पण विषाणूंबद्दल फारच कमी माहिती असते.

१८८५ मध्ये लुई पाश्चर या वैज्ञानिकाने भाकित केले होते की जीवाणूविरहित प्राणी मरतील. तरीही २१व्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत माणसाच्या शरीरातील सूक्ष्मजीव काही हानिकारक द्रव्ये तयार करतात. ती द्रव्ये आपल्या मानसिक आणि शारीरिक आरोग्याला धोकादायक ठरू शकतात अशीच धारणा होती.



सर्व आजारांची सुरुवात आतड्यापासून होते हे साधारण २००० वर्षांच्याही आधी हिप्पोक्रॅटसने केलेले विधान पूर्ण सत्य नाही. पण आज वैज्ञानिक हे विश्वासपूर्वक सांगू शकतात की आपल्या शरीरातील सूक्ष्मजीव माणसाचे आरोग्य उत्तम राखण्यास मदत करतात.

आपण जे पदार्थ खातो आणि जसा विचार करतो तसे आपले शरीर बनते. एखाद्याचा आहार त्या माणसाच्या शरीरात असणारे सूक्ष्मजीव समुदाय कसे राहतील हे ठरवतो या तत्वाला पुष्टी देणारा अधिकाधिक पुरावा सापडतो आहे. तसेच आहाराइतकेच एखाद्या व्यक्तीचे कुटुंबातील, समाजातील लोकांशी संबंध कसे आहेत याचे महत्व ही लक्षात येत आहे. जी व्यक्ती इतरांशी घनिष्ठ आणि दीर्घकालीन संबंध ठेवून असते, उदा. विवाहित जोडपे - तिच्या शरीराच्या आत असणाऱ्या सूक्ष्मजीव समुदायांत विपुल विविधता असते; एकाकी इतरांपासून फटकून राहणाऱ्या व्यक्तीत तसे आढळत नाही.(सायंटिफिक रिपोर्टस - ९,७०३,२०१९) शरीरांतर्गत सूक्ष्मजीव समुदायातील विविधता आणि संख्याघनता जास्त असण्याचा बुद्धीमत्ता, सूज्ञता, सहानुभूती, सामाजिक आधार यांची पातळी उच्च असण्याशी संबंध असतो. एकाकी, इतरांपासून फटकून राहणाऱ्या व्यक्तीत तसे आढळत नाही असा निर्वाळा युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, सॅन डिॲगोतील 'फ्रंट सायकिॲट्री'जर्नलने (२०२१.१२.६४८४७५) दिला आहे. अशा संशोधनांमुळे हे लक्षात येते की आपल्या शरीराच्या आत चांगल्या दर्जाचे सूक्ष्मजीव समुदायांची वस्ती टिकवण्यासाठी केवळ अन्नच नाही तर समाधानकारक सामाजिक आंतरसंबंध असणे ही जरुरीचे आहे. 'लॅबरुटस्' (३०-०३-२०२१)

**सजीवांतील सूक्ष्मजीवसमुदाय आणि मानसिक आरोग्य**

आपल्या आतड्यात सूक्ष्मजीवांना राहण्यासाठी जागा मिळते तसेच आतड्याच्या भिंतीत स्वायत्त गणता येईल, दुसरा मेंदूच म्हणता येईल अशी आंत्र चेतासंस्था असते. तिला आपल्या कामासाठी केंद्रीय चेतासंस्थेवर अवलंबून राहावे लागत नाही.

आपल्याला भीती वाटते तेव्हा'पोटात बाकबुक होते' असे आपण म्हणतो ती संवेदना आतड्यातील चेतासंस्था सचेत आहे म्हणूनच निर्माण होते.

सुडो नामक संशोधकाने २००४मध्ये 'जर्नल ऑफ फिजिऑलॉजी' मध्ये आतड्यातील चेतासंस्था आणि केंद्रीय चेतासंस्था एकमेकांकडे दुतर्फा जीवरासायानिक संवेगांचे आदान-प्रदान करतात हे मान्य केलेच. त्यासाठी आतड्यातील चेतासंस्था आणि केंद्रीय चेतासंस्थाना दहावी केंद्रीय चेता (व्हेगस वा भ्रमणचेता) उपयोगी पडते असे निवेदन केले.

पण त्याही पुढे जाऊन प्रथमच सूक्ष्मजीव विरहित उंदीर, सूक्ष्मजीव सहित उंदरांपेक्षा लवकर आणि सहज तणावग्रस्त होतात असे दाखवले. अशा आशयाचा, आतड्यातील चेतासंस्था आणि केंद्रीय चेतासंस्थातील दहावी केंद्रीय चेता (व्हेगस) हे मेंदू आणि आतड्यातील सूक्ष्मजीव समुदाय यांच्या मधील दुवा (संपर्कसूत्र) असते हे क्रायन (Cryan)च्या संशोधन चमूने पीएनएएस २०११ मधील शोधनिबंधात स्पष्ट केले.

बायफिडोबॅक्टिरियम, स्ट्रेप्टोकॉकस, लॅक्टोबॅसिलस, लॅक्टोकॉकस सारख्या जीवाणूंनी युक्त अशा दह्याचे (योगर्टचे) महिनाभर सेवन (गॅस्ट्रोएनटिरॉलॉजी, २०१३.१३९४.४०१) केले आणि त्याचा यादृच्छिक (रँडम) नियंत्रित नमुन्यामधील मेंदूतील संवेदना ग्रहण आणि भावना नियंत्रण केंद्रावरील परिणाम पाहिला. तसेच अन्नमार्गात कोप्रोकॉकस आणि डायालिस्टर या जीवाणूंची संख्या कमी असणाऱ्या प्राण्यांतील आरोग्य आणि मानसिक स्थितीशी तुलना केली. तेव्हा सूक्ष्मजीव प्रकार आणि संख्याघनता यांचा मेंदू, मानसिक स्थिती, अवसाद (डिप्रेशन) ग्रस्तता यांचा परस्परसंबंध दर्शवितात. फ्लेमिश गट फ्लोरा प्रकल्पात देखील (नॅचरल मायक्रोबियल, २०१९. डीओआय १०.

१०३८.एस/४१५६४-०१८-०३३७-एक्स) आतड्यातील सूक्ष्मजीवसमुदाय आणि माणसाचे मानसिक आरोग्य - मेंदूचे रोग यांचा संबंध असतो हे अधोरेखित केले आहे.

**मायक्रोबायोम (मित्रसूक्ष्मजीव)**
**आशादायक उपचार पद्धती-**

आतड्यातील सूक्ष्मजीवसमुदाय आणि माणसाचा मेंदू यांचा अक्ष, आणि अवसाद (डिप्रेशन), छिन्नमनस्कता (शायझोफ्रेनिया), नैराश्य असे मनोविकार यांचा संबंध असतो हे वरील निवेदनावरून स्पष्ट होते. तरीही सूक्ष्मजीवसमुदाय मानवी मनोविकार निर्माण होण्यात किंवा मानसिक आरोग्य उत्तम ठेवण्यात कसा हातभार लावत असतील हे अजून कळलेले नाही. परंतु सूक्ष्मजीवसमुदाय मानवी मानसिक आरोग्य घडण्यास-बिघडण्यास कारणीभूत ठरतो असे मानले तर अनेक प्रश्न आपल्या मनात येतात. उदा. आतड्यातील सूक्ष्मजीवसमुदाय माणसाच्या रोगांवर उपचारपद्धतीसाठी उपयोगी पडेल का?

स्मृतिभ्रंश (अल्झायमर)आणि पार्किन्सन यासारख्या चेतापेशीऱ्हास रोगांवर सध्या तरी औषधे नाहीत. आतड्यातील सूक्ष्मजीवसमुदायात हेतुपूर्वक बदल घडवून आणून रोगांवर उपचार करता येतील का? आतड्यातील सूक्ष्मजीवसमुदाय माणसाच्या रोगांवर उपचारपद्धतीसाठी उपयोगी पडेल का?


'नेचर एजिंग' (१.६६६.६७ -२०२१) जर्नल मधील शोधनिबंधात उल्लेखल्याप्रमाणे सूक्ष्मजीवसमुदाय उपचारपद्धती उंदरांत रोग प्रतिकार शक्ती वाढवण्यासाठी आणि मेंदूचा काही भाग पुनरुज्जीवित करण्यासाठी उपयोगी पडतो. मग माणसात ही उपचारपद्धती माणसाला वार्धक्य टाळण्यास किंवा घड्याळाचे काटे उलटे फिरवून वृद्धाना तरुण बनवण्यात यशस्वी ठरेल का? या प्रश्नाचे उत्तर 'बहुधा हो' असेच असेल. कारण जगभर यासंदर्भात मिळालेले सैद्धांतिक ज्ञानातून रोगोपचारासाठी प्रत्यक्ष व्यावहारिक लाभ कसा मिळवता येईल याचा अभ्यास चालू आहे. एका व्यक्तीच्या विष्ठेतून मिळवलेले मित्रसूक्ष्मजीवसमुदाय दुसऱ्या व्यक्तीच्या शरीरात स्थलांतरित करता येतात (Fecal Microbial Transplantation - FMT) म्हणजे एफएमटी फायदेशीर ठरले आहे.

**एफएमटी आणि पार्किन्सनचा रोग**

पार्किन्सनचा रोग झालेल्या माणसांच्या विष्ठेतून मिळवलेले मित्रसूक्ष्मजीवसमुदाय उंदरांच्या अन्नमार्गात प्रविष्ट झाल्यास 'सेल' या जर्नल मधील अहवालानुसार उंदरांतील पार्किन्सनची रोगलक्षणे जास्त तीव्रतेने प्रकट होतात. परंतु निरोगी माणसांच्या विष्ठेतून मिळवलेले मित्रसूक्ष्मजीवसमुदाय उंदरांच्या अन्नमार्गात प्रविष्ट झाल्यास मात्र उंदरांतील पार्किन्सनच्या रोगलक्षणांत कोणताही लक्षणीय बदल आढळत नाही. याचा अर्थ मित्रसूक्ष्मजीवसमुदाय आणि चेतापेशी ऱ्हास एकमेकांशी निगडीत असतात. ('द सेल'१६७. १४६९ १४८०, २०१६) तरीही यातून असा निष्कर्ष काढता येणार नाही की आपण मायक्रोबायोम्सचा पार्किन्सन रोगावर निश्चित उपचार करण्याच्या जवळ येऊन ठेपलो आहोत.

**एफएमटी आणि इन्शुलीन संवेदनशीलता**

हल्लीच प्रकाशित झालेल्या 'नेचर मेडिसिन' (२७, १२७२-१२७९, २०२१) या जर्नल मधील,संशोधन निबंधात एक विवेचन आले आहे. त्यानुसार निरोगी माणसांच्या विष्ठेतून मिळवलेले मित्रसूक्ष्मजीवसमुदाय एकदाच तोंडावाटे अतिस्थूल आणि चयापचय संलक्षण (सिंड्रोम) दाखवणाऱ्या रोग्यांना दिले. तसेच औषध रोग्यांच्या दुसऱ्या गटाला त्यांच्या समाधानासाठी (प्लासिबो परिणामासाठी) देऊन पण त्याना तसे उघड न करता दिले आणि परिणामांची तुलना केली. तेव्हा खरोखरीचा मित्रसूक्ष्मजीवसमुदाय दिलेल्या रोग्यांना फायदा झालेला आढळला. ही बाब सूक्ष्मजीवसमुदाय रोगोपचारासाठी उपयोगी पडू शकेल असा विश्वास दृढ करते.



### एफएमटी आणि सीआरडीआय (FMT and cRDi)

वारंवार होणारे क्लॉस्ट्रिडियम डिफिसिल जीवाणूचे संक्रमण सूक्ष्मजीवसमुदाय रोगोपचाराने बरे करता येते. असे याद्रुच्छिक (रँडम) वैद्यकीय चाचण्यांतून (आधार क्लिनिकल एंडोस्कोपी शपर्वीलेंू ५२,१३७ -१४३,२०१९) सिद्ध झाले आहे. त्यामुळे अशा रोगोपचार पद्धतीचा उपयोग दुय्यम रोगोपचार पद्धती म्हणून विचाराधीन आहे. अशाच रोगोपचार पद्धतीचा अन्नमार्गाच्या अन्य विकारांसाठी विशेषत: यकृतक्षोभातून होणाऱ्या मेंदूविकृतीवर करावा असे घाटत आहे.

### एफएमटी आणि संज्ञान

कोवळ्या वयाच्या उंदरांच्या विष्ठेतून मिळवलेले मित्रसूक्ष्मजीवसमुदाय प्रौढ उंदरांमध्ये रोपित केल्यास अशा प्रौढ उंदरांमध्ये संज्ञानप्राप्ती वाढते हे लक्षात आले. त्यातून प्रेरणा घेऊन मोशन स्टडीज हा प्रकल्प क्वाड्रम इन्स्टिट्यूट बायोसायन्सिसने (Motion Study, sponsored - Quadram Institute Biosciences) प्रायोजित केला. त्यात इस्ट ॲन्गिलिया प्रदेशातील साठ वर्षांवरील नागरिकांच्या अन्नमार्गामधील सूक्ष्मजीवसमुदायाचा मागोवा घेणे आणि ज्येष्ठांचे संज्ञान यांतील संबंध शोधण्याचे काम सुरु आहे. अन्नमार्गामधील सूक्ष्मजीवसमुदायात घट झाली तर मेंदूच्या कामावर विपरीत परिणाम होतो का? संज्ञानप्राप्तीतही घट होते का? हे पाहणे त्यात चांगला बदल घडवून आणणे. ते न जमल्यास निदान अशा व्यक्तींच्या संज्ञानप्राप्तीत आणखी घट होणार नाही ही काळजी घेणे यासाठी प्रयास होत आहेत.

### एफएमटी आणि कर्करोगांवरील उपचार

हल्लीच प्रकाशित झालेल्या'नेचर'या जर्नलमधील शोधनिबंधात निवेदन केल्यानुसार सूक्ष्मजीवसमुदायाचा परिणाम कर्करोगाच्या गाठींच्या वाढीवर, उपचारांमुळे होणाऱ्या सहदुष्परिणामांवर आणि रोगप्रतिक्षमता संस्थेने कर्करोगग्रस्त पेशी हुडकून काढण्यावर होत असतो. या शोधनिबंधात असेही म्हटले आहे की काही लोकांत तरी एफएमटीमुळे रोगप्रतिक्षमता संस्था असणाऱ्या प्रतिरोधाची धार कमी होते. जगभरात सध्या किमान तीस चाचण्या विविध संशोधन संस्था आणि औषधी कंपन्यांतर्फे (नेचर,६०७,४३६-४३९,२०२२).

घेतल्या जात आहेत. शिबा मेडिकल सेंटर,मधील कर्करोगतज्ज्ञ डॉ. बोर्सी यांनी आतापर्यंत सुमारे तीस कर्करोग्यांवर एफएमटी उपचार केले आहेत. या अनुभवाच्या आधारावर ते म्हणतात की एफएमटी उपचार पद्धती पारिस्थितिकी कर्करोगशास्त्राचे जणू काही एक नवे दालन उघडून देत आहे. अशा अभ्यासातून आपले कर्करोगाच्या गाठी, कर्करोगाचे रुग्ण,त्यांची रोग प्रतिक्षमता, त्यांच्या शरीरात वसत असलेले सूक्ष्मजीव याबद्दलचे ज्ञान वाढेल आणि त्याचा कर्करोग उपचार अधिक प्रभावी करण्यात होईल.

### एफएमटी आणि कोव्हिड १९ उपचार

'गट' (अन्नमार्ग या अर्थी) ७० ६९८-७०६, २०२१ मध्ये प्रकाशित झालेल्या जर्नलमधील एका शोधनिबंधात सूचित केल्यानुसार सूक्ष्मजीवसमुदायाच्या संख्येचा ऱ्हास झाल्यास गंभीर स्वरूपाचा कोव्हिड १९ होऊ शकतो असे आढळले. याउलट कोव्हिड १९ मुळे सूक्ष्मजीवसमुदायाच्या संख्येचा ऱ्हास होऊ शकतो, हे ही समजले. आतड्यातील सूक्ष्मजीवसमुदायाच्या क्रियांचा लाभ घेऊन अनेक गंभीर रोगांचे परिणाम सौम्य करता येतात हा एक नवाच उपचार उदयास येत आहे. .


### पुढील वाटचाल

एफएमटीचा, चयापचय संलक्षण असणाऱ्या रुग्णांना, इन्शुलीन संवेदनशीलता वाढवण्यास फायदा झाला. तसेच वारंवार होणारे क्लॉस्ट्रिडियम डिफिसिल जीवाणूंचे संक्रमणही, सूक्ष्मजीवसमुदाय उपचाराने बरे करता येते, हे सिद्ध झाले याचा, नजीकच्या भविष्यात दुहेरी लाभ होईलसे दिसते. एक तर काही रोग रासायनिक औषधांविना केवळ एफएमटीने मित्रसूक्ष्मजीवसमुदायांचा लाभ घेऊन बरे करता येतील. दुसरे म्हणजे मित्रसूक्ष्मजीवसमुदायांच्या मदतीने रोग होणारच नाही इतके आरोग्य चांगले ठेवता येईल. परंतु मित्रसूक्ष्मजीव समुदायांच्या जीवनक्रिया आणि त्यांची माणसांत रोग होऊ न देण्यातली वा बरे करण्यातील भूमिका यांचा सखोल अभ्यास होण्याची नितांत गरज आहे. त्यातूनच अधिक जास्त विज्ञानाधारित, गुणदायी, शासनसंस्थांकडून अधिकृत सूक्ष्मजीवसमुदाय रोगोपचार पद्धती रुग्णांना उपलब्ध होईल. असे कधी होईल याची निश्चित कालमर्यादा सांगता येणे कठीण आहे. कारण अभ्यास,त्यातून अनुमान, रोगोपचार पद्धतीच्या कार्यक्षमता चाचण्या, पद्धतीला शासन संमती अशा पायऱ्या पार पाडाव्या लागतील. तरीही एक गोष्ट निश्चित की आहार आणि अन्नमार्गात वसणारा सूक्ष्मजीवसमुदाय घनिष्ट संबंध आहे. आहार चांगला तर अन्नमार्गातील सूक्ष्मजीवसमुदाय भले. त्यातून मनःस्वास्थ्य आणि भावनिक परिपोष चांगला! तेव्हा आपण सर्वांनी नम्रता, कृतज्ञता अशा गुणांची कास धरून उत्तम आनंदमय जीवनशैली अंगीकारणे सर्वांच्या हिताचे आहे. चला तर शुभस्य शीघ्रम् !

# चित्रपट अभ्यासक सुधीर नांदगावकर यांचे निधन

**श्री सुधीर नांदगावकर हे माझे परममित्र होते. संघाचे स्वयंसेवक, जनसंघ व नंतरच्या भाजपाचे निष्ठावान कार्यकर्ते, छपाई व प्रचार यातील निष्णात उद्योजक, नाटक-सिनेमा याची आवड जपून छपाईचा छोटा उद्योग चालवण्याची धडपड करणारे सुधीर नांदगावकर खूप गप्पिष्ट, निगर्वी पण प्रचंड मेहनती पत्रकार, लेखक, उद्योजक होते. एक घनिष्ट मित्र कायमचा दुरावला याचे दुःख आहे. पण तो समृद्ध जीवन जगला याचे समाधान आहे.**

**- सतीश सिन्नरकर**



प्रभात फिल्म सोसायटीचे संस्थापक, चित्रपट अभ्यासक सुधीर नांदगावकर यांचे नुकतेच प्रदीर्घ आजाराने निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते. पन्नासहून अधिक वर्ष ते प्रभात चित्रपट मंडळाचे काम पाहात होते.

सुधीर नांदगावकर यांनी आयुष्यातील एक अविभाज्य आणि महत्वपूर्ण काळ हा चित्रपट संस्कृतीचा प्रचार व प्रसार करण्यासाठी व्यतीत केला. चित्रपट संस्कृतीचा प्रचार व प्रसार व्हावा आणि जगभरातील चांगल्या दर्जाचे चित्रपट इथल्या मराठी रसिकांना पाहता यावेत व त्यावर एकत्रित चर्चा व्हावी यासाठी त्यांनी प्रभात चित्र मंडळ या त्यांच्या फिल्म सोसायटी चळवळीमार्फत केलेली धडपड आणि मेहनत वाखाणण्याजोगी आहे. परदेशी चित्रपट म्हणजे हॉलिवूडचे चित्रपट या समजातून बाहेर काढून जगभरातील चित्रपटांच्या विविध जागतिक प्रवाहांशी मराठी रसिकांना जोडण्याचे काम त्यांनी केले.

प्रभात चित्र मंडळ या मुंबईतील फिल्म सोसायटीमार्फत येथील मराठी रसिकांना तसेच साहित्य, संगीत, नाटक या क्षेत्रातील जाणकारांना या चळवळीशी जोडले. मुंबईतील सर्वात जुनी फिल्म सोसायटी 'प्रभात चित्र मंडळ', 'फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटी ऑफ इंडिया' आणि चित्रपट समीक्षकांची आंतरराष्ट्रीय संघटना 'फिप्रेस्की' यांमध्ये त्यांचा महत्वपूर्ण सहभाग होता. रात्रंदिवस झटणारा कार्यकर्ता आणि उत्तम संघटक अशी सुधीर नांदगावकर यांची ख्याती झाली.

सुधीर नांदगावकर यांच्या फिल्म सोसायटी चळवळीचे महत्वाचे पैलू म्हणजे दर्जेदार चित्रपट विषयक मजकूर देणारे 'वास्तव रूपवाणी' हे नियतकालिक. तसेच 'मामी' आणि 'थर्ड आय आशियाई चित्रपट महोत्सव' हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्त्वपूर्ण आणि नावाजलेले दोन चित्रपट महोत्सव. भारतीय तसेच जगभरातील विविध क्षेत्रातील आणि प्रवाहातील चित्रपटांचे चित्रीकरण या महोत्सवांमधे करण्यात आले. रसिकांना आणि मराठी चित्रपट सृष्टीतील जाणकारांना ते पाहता व अभ्यासता आले.

सामान्य माणसांमध्ये चित्रपट रुजवण्यात सुधीर नांदगावकर यांचे मोठे योगदान आहे. सामान्य माणसांना चित्रपटाशी जोडण्यासाठी त्यांनी मोलाचे प्रयत्न केले. चित्रपटांविषयी दर्जेदार आणि परखड लिखाणामुळे आणि चित्रपटक्षेत्रातील त्यांच्या सखोल अभ्यासामुळे सिनेसृष्टीत त्यांचा नावलौकिक आहे. नांदगावकर यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, जावई, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. मुंबईत मामी फिल्म फेस्टिवल सुरू करण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा होता.

# वर्ष २०२२ मधील सर्वात मोठे ६ सुपरहिट चित्रपट.

हिंदी चित्रपट सृष्टीसाठीं वर्ष २०२२ हे संमिश्र प्रतिसादाचे ठरले. या वर्षात काही चित्रपटांना तिकीटबारीवर हाऊसफुल्लचा बोर्ड बघायला मिळाला तर काही चित्रपट सपशेल आपटले.

२०२१-२२ मध्ये कोविडमुळे सगळीकडेच शुकशुकाट पाहायला मिळाला. त्यानंतर आता कुठे हिट चित्रपट प्रकाशित व्हायला सुरुवात झाली आहे. तीन बॉलीवूड चित्रपटांनी २ करोडचा व्यवसाय केला तर काही दाक्षिणात्य चित्रपट जोरदार चालले.

२०२२ मधील सर्वोत्कृष्ट ६ चित्रपटांची यादी खालील प्रमाणे.

## KGF Chapter 2 (हिंदी)

**बॉक्स ऑफिस कमाई**
**४३४.७० करोड**

या चित्रपटाने त्याच्या हिंदी आवृत्तीत भरपूर व्यवसाय केला. मूळ कन्नड भाषेतील चित्रपटापेक्षा हिंदी भाषेत या चित्रपटाने चांगली कमाई करून दाखवली. 'बाहुबली द कनक्लुजन' या चित्रपटाच्या नंतर ५०० कोटीची कमाई करणारा हा दुसरा चित्रपट. या चित्रपटाने ४०० कोटींची कमाई केली.







## RRR (हिंदी)

**बॉक्स ऑफिस कमाई**
**२७४.३१ कोटी**

'तो आला, त्याने पाहिलं आणि त्याने जिंकलं'

RRR ने सगळ्याच भाषांत बॉक्सऑफिस वर चांगली कमाई केली. हा चित्रपट ३०० कोटी कमावेल अशी अपेक्षा होती. पण ३०० कोटींच्या जवळपास गेला हेही नसे थोडके.


बाळासाहेब ठाकरे यांना जयंती निमित्त
|| विनम्र अभिवादन ||
शिवसेना
उद्धव बाळासाहेब ठाकरे
अनुरुद्र विठल नारकर
अंकुर एन्टरप्राईझेस • साई इलेक्ट्रीक कॉर्पोरेशन
सुमित्रा चॅरिटेबल ट्रस्ट (चेअरमन) फणसगांव पंचक्रोशी शिक्षण संस्था मुंबई अध्यक्ष
१८ जानेवारी
मा. श्री रवींद्र वायकर साहेब,
मा. राज्यमंत्री
परभणी जिल्हा संपर्क प्रमुख कार्यसम्राट आमदार
आपणांस उदंड आयुष्याच्या
हार्दिक शुभेच्छा
शिवसेना देवगड तालुका संपर्क प्रमुख - समाज सेवक व उद्योजक जोगेश्वरी (पूर्व), मुंबई
शिवसेना व्यापार विभाग जोगेश्वरी विधानसभा संघटक श्री महालक्ष्मी महादेव सेवामंडळ अध्यक्ष


हिंदू हृदयसम्राट शिवसेनाप्रमुख सरसेनापती
बाळासाहेब ठाकरे यांच्या
जयंती निमित्त
त्रिवार अभिवादन!
दिनदयाल बोहरा (दिनेश)
शिवसेना सह संपर्क प्रमुख राजस्थान
शिवसेना उपशाखाप्रमुख (वॉर्ड ४५)
विशेष कार्यकारी अधिकारी (SEO)
शिवसेना
उद्धव बाळासाहेब ठाकरे
बि - ३/१७, महेश नगर, एस.व्ही.रोड, गोरेगाव (प), मुंबई - ४०० ०६२





## गंगुबाई काठियावाडी

**बॉक्स ऑफिस कमाई १२९.१० कोटी**

२०२२ चा पहिला हिट चित्रपट गंगुबाई काठियावाडी अनेक अर्थांनी खास होता. टाळेबंदी संपल्यावर लगेचच हा चित्रपट प्रदर्शित झाला. चित्रपटगृह पूर्ण क्षमतेने सुरु व्हायची होती अशात हा चित्रपट प्रदर्शित करणे म्हणजे जोखमीचे काम होते. प्रेक्षक चित्रपटगृहाकडे जातील की नाही याची खात्री नव्हती. तरीही संजय लीला भन्साळी दिग्दर्शित या चित्रपटाने १०० कोटी कमावले.







## जुगजुग जियो

**बॉक्स ऑफिस कमाई**
**८५.२५ करोड**

वर्षभरात जिथे मोठमोठ्या चित्रपटांना ५० करोडचा टप्पा गाठता आला नाही तिथे श्री राज मेहता यांच्या जुग जुग जियो चित्रपटाने ७५ कोटींची कमाई केली. नितु कपूर, अनिल कपूर, वरुण धवन, कियारा अडवाणी असे कलाकार असलेल्या या चित्रपटाने १०० कोटींची कमाई केली असती. पण चित्रपटाला सुरुवातीला हवा तितका प्रतिसाद मिळाला नाही.

## कंतारा (हिंदी)

**बॉक्स ऑफिस**
**कमाई ८५ करोड**

कंताराच्या प्रदर्शनाची फारशी हवा झाली नाही. पण तरीही एकदा चित्रपट पाहून आलेल्या प्रेक्षकांनी याची एकमेकात प्रसिद्धी केली. आणि चित्रपटाची कमाई दिवसेंदिवस वाढत गेली.







## विक्रम वेधा

**बॉक्स ऑफिस कमाई ७७.५१ करोड**

विक्रम वेधाला या यादीत स्थान मिळाले कारण हा चित्रपट १० सर्वात जास्त कमाई करणाऱ्या चित्रपटांपैकी एक आहे म्हणून. त्याच्या यशामुळे नाही. हितिक रोशन आणि सैफ अली खान ने अभिनय केलेल्या या चित्रपटाकडून मोठ्या अपेक्षा होत्या. पण हा चित्रपट तिकीटबारीवर आपली जादू दाखवू शकला नाही. २०२२ मध्ये जे चित्रपट तिकीटबारीवर आपटले त्यापैकीच एक विक्रम वेधा होय.

# सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील भारताचा भविष्यकाळ कसा असेल?




**खाजगी क्षेत्रातील कंपन्यांशी भागीदारी करण्यापासून ते हवामान बदलाची तयारी करण्यापर्यंत सरकार सर्वच करत आहे. आता उच्च दर्जाची आरोग्य यंत्रणा उभारण्यासाठी सरकारने पुढील ३ गोष्टी सुद्धा करायला हव्यात. मागील बऱ्याच काळापासून भारतातील प्राथमिक आरोग्य क्षेत्राला मोठ्या आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. जसे की आर्थिक पाठबळ नसल्याने कमी किंमतीचा वैद्यकीय माल वापरणे, प्राथमिक औषध उपचार वेळेवर न मिळू शकणे, नवीन डॉक्टरांची रोडावत चाललेली संख्या इत्यादी. पण गेल्या पाच वर्षात भारतात प्राथमिक उपचारांच्या दर्जात सुधारणा होत आहे.**

वर्ष २०१७-१८ मध्ये सरकारने नवीन राष्ट्रीय आरोग्य धोरण बनवले. ज्यात प्राथमिक आरोग्य सेवेचे महत्व अधोरेखित करण्यात आले होते. त्याचबरोबर त्यामध्ये दीड लाख आरोग्य केंद्रांची सुरुवात करण्याची तरतूद होती. जेणेकरून आरोग्याची काळजी घेणे हे सर्वसामान्य माणसाच्या आवाक्यात येऊ शकेल. प्राथमिक आरोग्य सुविधांसाठी खेड्यातील लोकांना रुग्णाला घेऊन उपचारांसाठी जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागते. ती वणवण कमी करण्यासाठी आणि जिथे गावकुसात प्राथमिक आरोग्य सेवांची कमतरता आढळते, अशा भागांसाठी ही तरतूद महत्वाची आहे.

देशाच्या विविध भागात सध्या १,३०,००० आरोग्य केंद्रे कार्यरत आहेत. २०२२ अखेरीपर्यंत ही संख्या दीड लाखापर्यंत जाण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर सरकार राष्ट्रीय डिजिटल आरोग्य अभियाना अंतर्गत डिजिटल आरोग्य सुविधा सुरु करणार आहे. या योजनेचे उद्दिष्ट रुग्णाच्या माहितीची योग्य पद्धतीने नोंद ठेवणे, हेल्थ कार्ड तयार करणे, आणि डिजिटल पेमेन्ट द्वारे सर्व विमा कंपन्या जोडणे हे आहे.

त्याचप्रमाणे सरकार १०० हुन अधिक वैद्यकीय महाविद्यालये सुरु करणार आहे आणि जिल्हा रुग्णालयांनाही अद्ययावत वैद्यकीय सामग्री पुरवणार आहे.

**या धोरणातील तरतुदी प्रत्यक्षात आणून सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात उत्तम सुविधा पुरवण्यासाठी सरकारने आणखी काय करायला हवे?**

सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात कल्पकता आणण्यासाठी खाजगी क्षेत्राबरोबर भागीदारी करणे.

मागील ८ वर्षात आरोग्य सुविधा तळागाळातल्या लोकांपर्यंत पोचवण्यासाठी सरकारने 'आयुष्मान भारत' प्रधानमंत्री जन आरोग्य योजना सुरु केली. (ज्यामध्ये कमी उत्पन्न गटातील लोकांना सुद्धा विमा घेता येईल अशी तरतूद आहे.) आणि आयुष्मान भारत आरोग्य केंद्र आणि उपचार केंद्र सुरु करण्यात आली. ज्यात गावखेड्यातील लोकांना वैद्यकीय सुविधा पुरवण्यात येतात. त्याचप्रमाणे खाजगी क्षेत्रात सुद्धा उपचार पद्धती सुधारण्यासाठी तसेच नवीन तंत्रज्ञानाच्या साहाय्याने रुग्णांचा त्रास कसा कमी करता येईल याकडे लक्ष दिले जात आहे. सरकार आणि खाजगी क्षेत्र या दोघांनी मिळून काम केले तर काय होते हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. महामारीच्या काळात आपण खाज़गी आणि सरकारी क्षेत्रांनी

मिळून चांगली कामे केल्याचे आपण पाहिले आहे.

स्वस्थ अलायन्स फीडिंग इंडिया यांच्या मार्फत जवळपास ५० हजारच्या वर ऑक्सिजन मीटर भारतभर वितरित केले. सरकारी यंत्रणा वापरून जिथे जास्त आवश्यकता होती तिथे आधी पोचवले गेले. IIT ने सुद्धा या प्रकल्पाला तांत्रिक पाठिंबा दिला.

Co-win चे संकेतस्थळ सुरु करण्यात खाजगी क्षेत्राने सरकारला मदत केली.

फोटो- चांगली प्राथमिक उपचार पद्धती दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्यातील उपचार पध्दतींवरचा ताण कमी करण्यास मदत करते.

एकाच वेळी जास्त क्रिया करण्यापेक्षा परिणामांवर लक्ष केंद्रित करा.

आता जरी सरकारने समाजातील लहानातल्या लहान घटकापर्यंत आरोग्य सेवा देण्यावर लक्ष केंद्रित केले असले तरी नवनवीन योजना आमलात आणून  त्या योजनांचा लाभ जनतेला दीर्घकाळापर्यंत कसा मिळत राहील हे पाहिले पाहिजे. चांगली प्राथमिक उपचार पद्धती दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्यातील उपचार पध्दतींवरचा ताण कमी करण्यास मदत करते.  त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होण्यास मदत होते. आणि आरोग्यविषयक एकूण खर्च कमी होऊ शकतो.

एकूण प्रगती किती झाली हे जरी सांगता येत नसले तरी झालेल्या प्रगतीचा आढावा घेऊन त्याप्रमाणे पुढील योजना तयार करणे गरजेचे आहे. त्यामुळे काही चुका झाल्या तरी सुरुवातीच्या टप्प्यात दुरुस्त करता येतील आणि गुणवत्ता आणखी वाढवता येईल. भारताने त्यादृष्टीने पावले टाकण्यास आगोदरच सुरुवात केली आहे. नीती आयोगाच्या कार्यालयाने नुकतीच एक योजना आमलात आणली. ज्यामुळे आपल्याला उत्पादन केलेल्या वस्तूवर एकूण किती खर्च झाला ते कळू शकेल. यात आरोग्य मंत्रालयाचा सुद्धा समावेश आहे.

त्याच्या पुढची पायरी म्हणजे अर्थसंकल्पानुसार धोरणांमध्ये बदल करणे. त्यामुळे सरकारला उत्पादनावरील खर्च नियंत्रणात आणता येईल. या नवीन सुधारणा केल्यावर खरोखरच आरोग्य क्षेत्राला चांगले दिवस येतात का हे पाहावे लागेल.

निर्णय क्षमता सुधारण्यासाठी आणखी काय काय करता येईल. याचे उत्तम उदाहरण म्हणजे Impact bonds. या योजने अंतर्गत गुंतवणूकदार  देणगीदारांना पैसे पुरवतात. जर अपेक्षित परिणाम साधला गेला तर गुंतवणूक दारांना झालेल्या नफ्यातील काही हिस्सा देण्यात येतो. हे एखाद्या इन्सेन्टिव्ह प्रमाणे असते. त्यामुळे सेवा पुरवणारा तत्परतेने सेवा देतो. या क्षेत्रात सुद्धा भारताने प्रगती करण्यास सुरुवात केली आहे. उत्कृष्ट health impact bond च्या अंतर्गत ५०० हुन अधिक आरोग्य सुविधांच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यात आली असून बाळंतपणातील सोयी सुविधांच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यात आली आहे. २०२१ मध्ये या बॉण्ड चे यशस्वी परिणाम दिसले. या अंतर्गत राजस्थान मधील ४०० हुन अधिक आरोग्यसेवांच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यात आली. या योजने अंतर्गत साडेचार लाख गर्भवती स्त्रियांना वैद्यकीय सुविधा पुरवण्यात आल्या. तर ५ वर्षांच्या काळात १३ हजारहून अधिक नवजात शिशूंचे प्राण वाचवण्यात यश आले.

**भविष्यातील संकटासाठी आतापासून तयारी करा.**

हवामान बदलामुळे लोकांच्या तब्येतीवर परिणाम होतो आहे. तब्येत जर जास्त खराब झाली तर मृत्यूही ओढवू शकतो. एका अभ्यासानुसार हवेतील उष्णतेमुळे   वेळेआधी प्रसूती, जन्माच्या वेळी बाळाचे वजन कमी असणे अशा सारख्या समस्या उदभवत आहेत. वायुप्रदूषणामुळे सुद्धा प्रसूतीत समस्या उदभवू शकतात. वेळेआधी प्रसूती झाली तर शिशूंवर परिणाम होतात.

एका अभ्यासानुसार या दशकाच्या शेवटी उष्णता एवढी वाढलेली असेल की त्यामुळे जन्म मृत्यू दर सहापटीने वाढलेला असेल. हवामान बदल आणि आरोग्य हे परस्परांशी कसे संबंधित आहेत यावर आता पुष्कळ संशोधन झाले आहे. Cop 27 या कार्यक्रमात हवामान बदल आणि आरोग्याचे महत्व या विषयावर भर देण्यात आला आहे. अवेळी हवामान बदल हा आता नेहमीचाच झाला आहे. त्या पार्श्व भूमीवर जास्त काळजी घ्यावी लागणार आहे. आता आपल्या आरोग्य यंत्रणेला हवामान विषयक बदलांना तोंड देणे. त्याचवेळी हवामान बदलामुळे निर्माण झालेल्या आव्हानांना तोंड देण्यासाठी काम करत असलेल्या लोकांबरोबर काम करणे ही दुहेरी जबाबदारी आहे.

उदा. ज्या भागात वणवा किंवा पूर येतो अशा भागात आरोग्य केंद्र सुरु करणे त्याचबरोबर आपत्कालीन परिस्थितीला कसे तोंड द्यावे याचे प्रशिक्षण केंद्रावरील कर्मचाऱ्यांना देणे आवश्यक आहे. हवामानबदलांमुळे येणाऱ्या समस्यांवर मात करण्यासाठी आरोग्यसेवेची गुणवत्ता वाढवणे ही आता काळाची गरज आहे.

SDG आणि cop 27 च्या उद्देश्यपूर्तीसाठी मजबूत प्राथमिक आरोग्य यंत्रणा तयार करणे आवश्यक आहे. वैद्यकीय सेवा सुविधांच्या क्षेत्रात भारताने गेल्या काही वर्षात केलेली प्रगती नोंद घेण्याजोगी आहे. महामारीच्या काळात खाजगी क्षेत्र तसेच सरकारी क्षेत्र दोघांनी वैद्यकीय क्षेत्राच्या बाबतीत मोलाचे धडे घेतले आहेत. आता याच अनुभवाचा वापर करून भविष्यातील आव्हानांना सामोरे जायचे आहे.

# METAL POWER

PRECISION SPECTROMETERS

Widest, most comprehensive and economical range of OES in the world

Proud recipient of

**NATIONAL AWARD 2019***

for its path-breaking innovation in Optical Emission Spectrometers

* National Award 2019 MSME Category | Technology Development Board

## Improve performance and profitability with solutions from the world's fastest- growing OES company

Using a spectrometer (OES) can help organizations make dramatic improvements in quality; from basic alloys like CI/SGI and Brass to the highest-purity metals, stainless steels etc., using the right OES helps firms improve process integrity, reduce rejections and drive dramatic improvements in productivity. All this also comes with significant savings; today, the payback period for a good OES is well under a year!

**Metavision 10008X**

Low- and sub-ppm analysis for 60+ elements



**Metavision 1008i³**

Low- and single-ppm detection of 55+ elements



**Metavision 1008i**

Class-leading performance to meet a wide array of needs



**MOSS**

Lowest cost OES in the world; Ideal for routine applications across



**Mobile OES**

Powerful, mobile solutions for positive material identification



**Handyman**

The ultimate storage solution



**Armour Safe**

The best possible protection



**Wireless RTDS**

Data transmission at its best with ~1km coverage from OES to the melting platform!



**CRMs**

Wide range of powder & solid reference materials



**Sample Preparation Machines**

For in-house preparation of the highest quality of sample surfaces



| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3,000+ spectrometer installations across 35+ countries | Over 30 years of dedicated service to the metals industry | Largest spectrometer company in India | The fastest growing spectrometer company in the world | Pan-India service network with over 35+ inhouse engineers |

METAL POWER ANALYTICAL PVT. LTD.

87, Metal Power House, Plot No. 14, Marol Co-operative Industrial Estate, Andheri (East), Mumbai - 400059. BHARAT (INDIA)

Board: +91 22 4083 0500

Email: sales@metalpower.net

Web: www.metalpower.net

# के. अण्णामलाई : मॅन ऑफ दि ईयर!



धनंजय कुरणे, कोल्हापूर

पंतप्रधान मोदी एखाद्या भारतीय नेत्याला आलिंगन देताना तुम्ही पाहिले आहे काय? क्वचित कधीतरीच असं दृश्य बघायला मिळतं. मोदी अशी जवळीक कुणाशी साधत नाहीत वा कुणाला साधू देत नाहीत. मात्र याला एका नावाचा अपवाद आहे. 'के. अण्णामलाई!' हा माणूस जेव्हा जेव्हा मोदींच्या समोर येतो तेव्हा ते त्याचं स्वागत आलिंगन देऊन करतात. काय कारण असेल याचं? मुळात हा 'अण्णा' आहे तरी कोण?

के. अण्णामलाई. वय ३८ वर्षे. भाजप तामिळनाडूचा अध्यक्ष! पण ही ओळख पुरेशी नाही .. किंबहुना इथपर्यंत पोहोचण्याचा त्याचा प्रवास अधिक महत्वाचा आणि रोमहर्षक आहे...

'अण्णा'चा जन्म 'करूर' या अती छोट्या खेड्यातला. आई-वडील गरीब शेतकरी. आपल्या मुलानं 'कॉलेजचं शिक्षण' घ्यावं ही त्यांची मनीषा! अण्णा हा 'कॉलेज'मध्ये जाणारा करूरचा पहिलावहिला मुलगा! त्यानं कोईमतूरला मेकॅनिकल इंजिनिअरिंगचं शिक्षण घेतलं. पण 'मोठं पॅकेज' मिळवण्यासाठी आणखी शिकणं आवश्यक होतं. त्याला लखनौच्या आयआयएम मध्ये एमबीएला प्रवेश मिळाला. लखनौमधलं आणि एकूणच उत्तर प्रदेशमधलं दारिद्र्य पाहून त्याला धक्का बसला. एकदा त्याला एका टपरीवर फक्त 'पाच रुपयात आठ पुऱ्या' खायला मिळाल्या. 'पाच रु मिळाले' म्हणून टपरीवाला खुष होता. हा अण्णासाठी एक 'शॉक' होता. एमबीए करताना तो पूर्ण यू. पी.फिरला.. विशेषतः पूर्वांचल! तिथं त्याला असंख्य बालमृत्यू आढळून आले. तो अतिशय अस्वस्थ झाला आणि त्याच सुमारास मुंबईला २६/११ चा हल्ला झाला आणि अण्णाचं जीवनच बदललं. 'आपण समाजसेवा देशसेवा करण्यासाठी सरकारी नोकरी करायची' असं त्यानं ठरवलं. एमबीए करता करता त्यानं युपीएससीची प्रिलीम दिली. नंतर मुख्य परीक्षा 'क्रॅक' केली. इंटरव्ह्यू दिला आणि तो आयपीएस उत्तीर्ण झाला.. पोस्टिंग कर्नाटकमध्ये मिळालं..

उडपीमध्ये एसपी असताना त्यानं आपली कारकीर्द गाजवली. तिथल्या कॉलेजात ड्रग माफियांचं जाळं होतं. ते अण्णानं मोडून काढलं. स्वतः 'स्पॉट'वर जाऊन तो गुंडांविरोधात कारवाई करत असे. लोकांनी त्याला 'सिंघम ऑफ उडपी' ही पदवी दिली. पण पुन्हा एक 'टर्निंग पॉईंट' आला.

'दहावीत शिकणाऱ्या एका मुलीवर' सामूहिक अत्याचार झाला आणि तिचा खून झाला. अण्णामलाई त्या स्पॉटवर गेला तेव्हा तिथे दहा हजार लोक जमले होते व दगडफेक चालू होती. या गुन्ह्यामागच्या कारणांचा त्यानं शोध घेतला. त्या मुलीच्या शाळेत फक्त दोन कॉम्प्युटर होते. ते आळीपाळीनं वापरायला मिळत. त्या दिवशी कॉम्पुटर वापरून शाळेतून बाहेर पडायला त्या मुलीला खूप उशीर झाला. अंधार पडला होता. तिच्या गावाकडे जायला संध्याकाळी सात नंतर बस नव्हती म्हणून ती एकटी चालत जात होती आणि हा दुर्दैवी प्रसंग घडला.

'आपण पोलीस नोकरीत राहून या असुविधा (कॉम्पुटर वा बसचा अभाव) दूर करू शकणार नाही' असं अण्णाला वाटू लागलं. याच दरम्यान 'सरकारी लायझन ऑफिसर' म्हणून त्याला कैलास मानसरोवर यात्रेला जावं लागलं. तब्बल ७० दिवस! आणि इथं तो पूर्णपणे बदलून गेला. 'जीवन बदलणारा निर्णय घेण्यासाठी' आवश्यक असलेली एक 'आध्यत्मिक ऊर्जा' त्याला मिळाली. त्याचा निर्णय पक्का झाला. परत येऊन त्यानं नोकरीचा राजीनामा दिला. (कदाचित या आध्यत्मिक 'कनेक्ट' मुळे तो मोदींचा लाडका असावा) मुख्यमंत्री येडुयेराप्पानी स्वतः विनंती करूनही त्यानं राजीनाम्याचा निर्णय बदलला नाही. नंतर एक वर्षं त्यानं सामान्य तरुणांसाठी 'Be the Leaders' हे फौंडेशन चालवलं.

मग 'दिल्लीतून' कळ फिरली. भाजपचे काही लोक त्याला भेटले. त्याला 'convince' केलं आणि त्यानं भाजपमध्ये प्रवेश केला. जिथं भाजप हा अत्यंत नगण्य पक्ष आहे तिथं असा निर्णय घेणं हे फारच धाडसाचं काम! मोदी-शहानीही जुलै २०२१ मधे अनेक ज्येष्ठ नेत्यांना डावलून त्याला तामिळनाडूचा प्रदेशाध्यक्ष केलं आणि नंतरच्या दीड वर्षात त्यानं तामिळनाडू मध्ये जे लोकप्रियतेचं वादळ निर्माण केलं ते अभूतपूर्व आहे. महाराष्ट्रात बसून त्याची नेमकी कल्पना येत नाही.

पण सध्या तो एखाद्या सिनेस्टार सारखा लोकप्रिय आहे. त्याच्या दीड वर्षातील कामगिरी वर स्वतंत्र लेख लिहावा लागेल. करुणानिधिंच्या गावात जाऊन त्यानं सभा घेतली. त्याला एक लाख लोक उपस्थित होते. परवा मोदी चेन्नईला गेले तेव्हाचा रोड शो रेकॉर्ड मोडणारा होता. तामिळ तरुणाई सध्या अण्णाच्या प्रचंड प्रेमात आहे. सध्या तो तिथल्या चर्चेचा कद्रबिंदू आहे. एप्रिल २०२३ पासून तो एक वर्षाची पदयात्रा काढणार आहे. सर्व २३४ मतदारसंघातून!

पण तिथलं राजकारण 'क्रूर' मार्गानं जाणारं आहे. अण्णाला 'संपवण्याचे' प्रयत्न डीएमकेने हरप्रकारे चालवले आहेत. जर अण्णामलाई 'सुरक्षित' राहिला तर २०२४ चे तामिळनाडूतील निकाल धक्कादायक असतील हे लिहून ठेवा आणि २०२६ च्या विधानसभेचे तर त्याहूनही 'शॉकिंग!'

'के.अण्णामलाई' हा माझ्या दृष्टीनं २०२२ चा 'मॅन ऑफ दि ईयर' आहे...

Scan this QR Code for Location, Project Walkthrough & Pre-Registration

CELEBRATING 32 Years

PARADISE® GROUP
Your World. Our Vision.
ISO - 9001: 2015 Certified Organization

# LAUNCHING
# DOMBIVLI'S THEMED WORLD INSPIRED BY DUBAI'S LIFESTYLE

JOIN US AT




HOMES STARTING FROM ₹48 LAKHS* ONWARDS

2-day Fun-filled Mega Carnival Highlights

International Artists Performances | Mesmerizing Magic Show
Non-stop Music, DJ and Dance | Kids Fun Rides and Swings | Exciting Games and Entertainment



SAMPLE FLAT READY FOR PREVIEW | WORK IN FULL SWING

Artist's Impression | *T&C Apply


An 18 Acre Mixed-use Township with Themed Luxuries and Extravagance

- Business & Retail Development
- 8 Magnificent G+35 Storey Residential Towers
- 1, 2, 2.5 & 3 BHK Global Luxury Homes
- Podium Indulgences spread across 6 Acres
- Lavish Club Life Experiences
- Global Lifestyle Experiences

SAI
WORLD DREAMS
DOMBIVLI

022 2783 1000
Email: enquiry@paradisegroup.co.in

Site Address: Sai World Dreams, Kalyan Shil Road, Dombivli.
Corporate Office: 1701, Satra Plaza, Plot No. 19 & 20, Sector - 19D, Vashi, Navi Mumbai | MAHARERA REG. NO. P51700035191 | https://maharera.mahaonline.gov.in




www.upl-ltd.com

UPL
OpenAg™